"अनुसूचित क्षेत्रामधील गट ग्रामपंचायतीच्या ग्रामस्थांचे ग्रामसभेतील योगदान"
विशेष क्षेत्र विक्रमगड तालुक्यातील आंबेघर तर्फे धरमपूर गट ग्रामपंचायत (जि. पालघर)

# संशोधन अहवाल

समाजकार्य विद्यानिष्णात पदवी अभ्यासक्रमाच्या परीपूर्ततेकरीता टिळक महाराष्ट्र विद्यापीठास सादर


संशोधक
पागी जानू जेठया

संशोधन मार्गदर्शक
डॉ.देवानंद व्हि.शिंदे
प्राध्यापक व विभाग प्रमुख
कुटूंब व बालकल्याण विभाग
कर्वे समाज सेवा संस्था,
१८, हिलसाईड, कर्वेनगर पुणे - ५२.

समाजकार्य विभाग
टिळक महाराष्ट्र विद्यापीठ,
गुलटेकडी,पुणे-३७


एप्रिल - २०१८

# घोषणापत्र

मी खाली सही करणार **श्री. जानू जेठ्या पागी** असे घोषित करतो की, **अनुसूचित क्षेत्रामधील गट ग्रामपंचायतीच्या ग्रामस्थांचे ग्रामसभेतील योगदान : विशेष क्षेत्र विक्रमगड तालुक्यातील आंबेघर तर्फे धरमपूर गट ग्रामपंचायत (जि. पालघर)** नावाचा प्रकल्प अहवाल **प्रा. डॉ. देवानंद व्हि. शिंदे** यांच्या मार्गदर्शनाखाली तयार करुन समाजकार्य विद्यानिष्णात पदवी अभ्यासक्रमाच्या परिपूर्ततेसाठी टिळक महाराष्ट्र विद्यापिठास सादर करीत आहे.

सदर संशोधनकार्य पूर्णत: माझे स्वत:चे मूळ काम असून कोणत्याही प्रकल्प अहवालाची नक्कल करण्यात आलेली नाही. सर्व दुय्यम तथ्य स्त्रोतांचा योग्य संदर्भ व उल्लेख संदर्भ सूचीमध्ये केलेला आहे.

ठिकाण :- पुणे

दिनांक :- /०६/२०१८

(जानू जेठ्या पागी)
संशोधक विद्यार्थ्यांचे नाव

# <u>प्रमाणपत्र</u>

प्रमाणपत्र देण्यात येते की, "**अनुसूचित क्षेत्रामधील गट ग्रामपंचायतीच्या ग्रामस्थांचे ग्रामसभेतील योगदानः विशेष क्षेत्र विक्रमगड तालुक्यातील आंबेघर तर्फे धरमपूर गट ग्रामपंचायत (जि. पालघर)** हा प्रकल्प अहवाल **श्री. जानू जेठ्या पागी** या विद्यार्थ्यांने माझ्या मार्गदर्शनाखाली तयार करुन समाजकार्य विद्यानिष्णात पदवी अभ्यासक्रमाच्या परिपूर्ततेसाठी सादर केलेला आहे. सदर प्रकल्प अहवाल टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, समाजकार्य विभागास सादर केला जात असून हा प्रकल्प यापूर्वी दुसऱ्या कोणत्याही विद्यापीठास किंवा शैक्षणिक संस्थेस सादर केलेला नाही.

ठिकाण :- पुणे

दिनांक :- १२/०६/२०१८

**(प्रा. डॉ. देवानंद व्हि. शिंदे)**
**संशोधन मार्गदर्शकाचे नाव व स्वाक्षरी**

# ऋणनिर्देश

टिळक महाराष्ट्र विद्यापीठाने समाजकार्य विद्यानिष्णात पदवी अभ्यासक्रम समाविष्ट केल्याने संशोधनाची जी मौलिक संधी मिळाली त्याबद्दल मी विद्यापीठाचा आभारी आहे.

प्रस्तुत संशोधन अहवाल पूर्ण करण्यास माझ्या ज्या निवेदकांनी त्यांचा अमूल्य वेळ खर्च करुन मला माहिती दिली त्याबददल मी त्यांचा सदैव आभारी आहे.

त्याचप्रमाणे प्रस्तुत संशोधन अहवाल यशस्वीरितीने व मर्यादित वेळेत पूर्ण होण्यासाठी वेळोवेळी मार्गदर्शन व संशोधनाप्रती सूचना करणाऱ्या **संशोधन मार्गदर्शक डॉ.देवानंद व्ही. शिंदे, कर्वे समाज सेवा संस्था, पुणे** यांचा मी आभारी आहे. त्यांच्या सहकार्या शिवाय हा संशोधन अहवाल पूर्णत्वास जाणे अशक्य होते. तसेच ज्या तज्ञांनी मला मार्गदर्शनपर मदत केली त्या सर्वांचे मी व्यक्तीश: आभार मानतो.

टिळक महाराष्ट्र विद्यापीठातील समाजकार्य विभागातील सर्व प्राध्यापक वर्गाचे विशेषत: **समाजकार्य विभागाचे विभागप्रमुख सहा. प्रा. डॉ. प्रकाश यादव** यांचा मी ऋणी आहे. व अभ्यासक्रमाचे कामकाज पाहणाऱ्या सर्व कर्मचारी वर्गांचे मी आभारी आहे.

या संशोधन प्रकल्पाच्या अध्ययनासाठी माझी पत्नी श्रीम. मोक्षदा यांनी मला जी साथ दिली त्याबद्दल तीचे आभार मानतो. व माझे आई, वडील व भाऊ यांचे सहकार्य व मार्गदर्शन लाभले त्याबद्दल मी त्यांचा आभारी आहे. तसेच श्री. अमर ढाले व अर्चना ढाले, माझे मित्र अपेक्षित चांदेकर आणि संशोधन अहवाल पूर्ण होण्यासाठी ज्यांनी मला कळत - नकळत मदत केली त्या सर्वांचे मी मन:पूर्वक आभार मानतो.

संशोधक : जानू जेठया पागी

# अनुक्रमणिका


| प्रकरण क्र. | प्रकरणाचे नाव | पान क्र. |
|---|---|---|
| | घोषणापत्र | I |
| | प्रमाणपत्र | II |
| | ऋणनिर्देश | III |
| | सारणीसूची | IV |
| | आलेखसूची | V |
| | प्रस्तावना | ०१-०२ |
| १ | अभ्यास विषयाची प्रस्तावना | ०३-६८ |
| २ | संदर्भ साहित्याचा आढावा | ६९-७४ |
| ३ | संशोधन पध्द्ती | ७५-८९ |
| ४ | अभ्यास क्षेत्राचा आराखडा | ९०-९२ |
| ५ | तथ्य विश्लेषण आणि अर्थ निर्वाचन | ९३-१६८ |
| ६ | निष्कर्ष, गृहितकृत्याची पडताळणी, शिफारसी अणि संशोधन विषयाचा सारांश | १६९-१७८ |
| | परिशिष्ठे | - |
| | अ) संदर्भ सूची | १७९ -१८० |
| | ब) मुलाखत अनुसूची | १८१-१९० |

# सारणी सूची


| अ.क्र | तपशील | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| १ | निवेदकांचे वय दर्शविणारी सारणी | ९३ |
| २ | निवेदकांची वैवाहिक स्थिती दर्शविणारी सारणी | ९४ |
| ३ | निवेदकांचे शिक्षण दर्शविणारी सारणी | ९६ |
| ४ | निवेदकांच्या कुटुंबातील माणसे दर्शविणारी सारणी | ९७ |
| ५ | निवेदकांचे उदरनिर्वाहाचे साधन दर्शविणारी सारणी | ९९ |
| ६ | निवेदकांचे वार्षिक उत्पन्न दर्शविणारी सारणी | १०० |
| ७ | निवेदकांच्या मते ग्रामसभेबददलचा नेमका अर्थ दर्शविणारी सारणी | १०१ |
| ८ | निवेदकांनी मांडलेली ग्रामसभा घेण्याबाबतची कारणे दर्शविणारी सारणी. | १०२ |
| ९ | निवेदकांना ग्रामसभा असल्याची माहिती देण्याचे स्त्रोत दर्शविणारी सारणी | १०३ |
| १० | निवेदकांच्या मते ग्रामसभा असण्याच्या अगोदर माहिती देण्याचा कालावधी दर्शविणारी सारणी | १०४ |
| ११ | निवेदकांच्या मते ग्रामसभा घेण्याचे ठिकाण दर्शविणारी सारणी | १०५ |
| १२ | निवेदकांच्या मते ग्रामसभेची गणपूर्ती होण्यास आवश्यक असलेली ग्रामस्थांची संख्या दर्शविणारी सारणी | १०६ |
| १३ | ग्रामसभेला विषयसूची वाचून दाखविण्याविषयीचे निवेदकांचे मत दर्शविणारी सारणी | १०७ |
| १४ | निवेदकांच्या मते ग्रामसभेला विषयसूची वाचणारी व्यक्ती दर्शविणारी सारणी | १०८ |
| १५ | निवेदकांच्या मते ग्रामसभेचे अध्यक्षपद भूषविणारी व्यक्ती दर्शविणारी सारणी | १०९ |
| १६ | निवेदकांच्या मते ग्रामसभेच्या वेळी मागील बैठकीचा आढावा घेण्याविषयीचे मत दर्शविणारी सारणी | ११० |
| १७ | निवेदकांच्या मते ग्रामसभेमध्ये कल्याणकारी योजनांची व नवीन आलेल्या कायद्यांची  माहिती देण्याविषयीचे मत दर्शविणारी सारणी | १११ |

| अ.क्र | तपशील | पृष्ठ क्र. |
| --- | --- | --- |
| १८ | निवेदकांच्या मते ग्रामसभेमध्ये साधारणपणे चर्चिले जाणारे विषय दर्शविणारी सारणी | ११२ |
| १९ | निवेदकांच्या मते पेसा कायदा म्हणजे काय याविषयीचे मत दर्शविणारी सारणी | ११४ |
| २० | निवेदकांच्या मते पेसा कायद्याअंतर्गत दिलेले अधिकार दर्शविणारी सारणी | ११५ |
| २१ | वनहक्क माहिती असलेल्या निवेदकांचे मत दर्शविणारी सारणी | ११८ |
| २२ | घरकूल योजनेचा लाभ मिळालेल्या विषयीचे निवेदकांचे मत दर्शविणारी सारणी | ११९ |
| २३ | निवेदकांच्या मते घरकूल योजनेसाठी लाभ मिळालेली रक्कम दिर्शविणारी सारणी | १२० |
| २४ | निवेदकांच्या मते घरकूल न मिळालेल्याची कारणे दिर्शविणारी सारणी | १२१ |
| २५ | निवेदकांच्या मते घरी शौचालय उपलब्ध नसण्याची कारणे दिर्शविणारी सारणी | १२३ |
| २६ | पिण्याच्या पाण्याच्या सुविधेविषयी निवेदकांचे मत दर्शविणारी सारणी | १२५ |
| २७ | ग्रामपंचायतीमधील पाडयांवरती शिक्षणाच्या सुविधेविषयीचे निवेदकांचे मत दर्शविणारी सारणी | १२६ |
| २८ | ग्रामपंचायतीमधील पाडयांवरती उपलब्ध असलेल्या शिक्षणाच्या सुविधा दर्शविणारी सारणी | १२७ |
| २९ | ग्रामपंचायतीच्या हददीमध्ये आरोग्य सुविधेच्या उपलब्धतेविषयी दर्शविणारी सारणी | १२८ |
| ३० | निवेदकांच्या मते ग्रामपंचायतीच्या हददीमध्ये आरोग्याची सुविधा उपलब्ध होण्यासाठी केलेले विशेष प्रयत्न दर्शविणारी सारणी | १२९ |
| ३१ | ग्रामपंचायतीच्या हददीमध्ये आरोग्याची सुविधा उपलब्ध नसल्याने ग्रामस्थांना इतरत्र आरोग्याच्या सुविधेसाठी जावे लागणारे अंतर व ठिकाण दर्शविणारी सारणी | १३० |
| ३२ | ग्रामपंचायतीच्या हददीमधील आरोग्याच्या सुविधेविषयी निवेदकांचे मत दर्शविणारी सारणी | १३१ |

| अ.क्र | तपशील | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| ३३ | निवेदकांच्या मते कुपोषणाचे प्रमाण कमी करण्यासाठी ग्रामपंचायतीने केलेले प्रयत्न दर्शविणारी सारणी | १३३ |
| ३४ | घरात विजेची सोय असल्याचे निवेदकांचे मत दर्शविणारी सारणी | १३४ |
| ३५ | विजेच्या सुविधेविषयी निवेदकांचे मत दर्शविणारी सारणी | १३५ |
| ३६ | ग्रामपंचायतीच्या हददीमधील पाडयांवरती अंगणवाडी सोय असण्याविषयी निवेदकांचे मत दर्शविणारी सारणी | १३६ |
| ३७ | निवेदकांच्या मते अंगणवाडीची पाहणी करणारे अधिकारी दर्शविणारी सारणी | १३७ |
| ३८ | निवेदकांच्या मते अंगणवाडीची पाहीणी करण्याचा कालावधी दर्शविणारी सारणी | १३८ |
| ३९ | ग्रामपंचायतीच्या हददीमधील पाडयांवरती रस्त्यांच्या उपलबध सुविधेविषयी निवेदकांचे मत दर्शविणारी सारणी | १३९ |
| ४० | निवेदकांच्या मते रस्ता तयार होण्यासाठी केलेले विशेष प्रयत्न दर्शविणारी सारणी | १४० |
| ४१ | निवेदकांच्या मते ग्रामपंचायतीने उपलब्ध करुन दिलेल्या रोजगाराच्या सुविधा दर्शविणारी सारणी | १४२ |
| ४२ | निवेदकांनी गावामध्ये रोजगार उपलब्ध व्हावा यासाठी केलेले विशेष प्रयत्न दर्शविणारी सारणी | १४३ |
| ४३ | निवेदकांच्या मते ग्रामसभेमध्ये ग्रामस्थांची उपस्थित न राहण्यामागची कारणे दर्शविणारी सारणी | १४५ |
| ४४ | निवेदकांच्या मते ग्रामपंचायतीच्या समित्यांमध्ये निवड झालेले सदस्य दर्शविणारी सारणी | १४७ |
| ४५ | ग्रामसभेला जास्तीत जास्त ग्रामस्थांनी उपस्थित राहावे असे निवेदकांचे मत दर्शविणारी सारणी | १४८ |
| ४६ | निवेदकांच्या मते ग्रामसभेला उपस्थित न राहणाऱ्या ग्रामस्थांना ग्रामसभेमध्ये झालेल्या चर्चेविषयी माहिती देण्याचे मत दर्शविणारी सारणी | १४९ |

| अ.क्र | तपशील | पृष्ठ क्र. |
| --- | --- | --- |
| ४७ | ग्रामपंचायतीच्या गावांमध्ये शिक्षण समिती नेमण्याविषयीचे निवेदकांचे मत दर्शविणारी सारणी | १५० |
| ४८ | गावातील शाळेला भेट देण्याविषयीचे निवेदकांचे मत दर्शविणारी सारणी | १५१ |
| ४९ | निवेदकांच्या मते ग्रामपंचायतीमधील माहिती असलेल्या समित्या दर्शविणारी सारणी | १५२ |
| ५० | निवेदकांच्या मते ग्रामपंचायतीमधील भांडणे - तंटे सोडविण्याची पध्दत दर्शविणारी सारणी | १५४ |
| ५१ | निवेदकांच्या मते ग्रामपंचायतीमध्ये अमली पदार्थांच्या निर्मितीवर आणि सेवन करण्यावर बंदी घातली जावी की नाही याविषयीचे मत दर्शविणारी सारणी | १५६ |
| ५२ | ग्रामपंचायतीमधील अमली पदार्थांच्या निर्मितीवर आणि सेवन करण्यावर बंदी घालण्यासाठी केलेले विशेष प्रयत्न किंवा करावयाचे प्रयत्न याविषयी निवेदकांचे मत दर्शविणारी सारणी | १५७ |
| ५३ | आठवडा बाजार करण्यासाठी ग्रामस्थांना जावे लागणारे गावापासूनचे अंतर दर्शविणारी सारणी | १५८ |
| ५४ | निवेदकांच्या मते गावात आठवडा बाजार भरण्यासाठी केलेले प्रयत्न दर्शविणारी सारणी | १५९ |
| ५५ | ग्रामपंचायतीचा विकास होण्याबददलचे निवेदकांचे मत दर्शविणारी सारणी | १६० |
| ५६ | निवेदकांच्या मते गावाचा विकास होण्यासाठी करावयाचे प्रयत्न दर्शविणारी सारणी | १६१ |
| ५७ | निवेदकांच्या मते ग्रामपंचायतीच्या परिसरात आढळणारी संसाधने दर्शविणारी सारणी | १६२ |
| ५८ | ग्रामसभेविषयीचे निवेदकांचे मत दर्शविणारी सारणी | १६४ |
| ५९ | ग्रामपंचायतीमधील पाडयांवरती ग्रामसभा होण्याविषयी निवेदकांचे मत दर्शविणारी सारणी | १६५ |
| ६० | ग्रामसभेमुळे गावचा विकास होण्याविषयी मत दर्शविणारी सारणी | १६८ |

# आलेख सूची


| अ.क्र | तपशील | पृष्ठ क्र. |
| --- | --- | --- |
| १ | निवेदकांच्या मते शिक्षणाचे प्रमाण दर्शविणारा आलेख | ९५ |
| २ | निवेदकांची दारिद्रयरेषेखालील कुटुंबांची संख्या दर्शविणारा आलेख | ९८ |
| ३ | निवेदकांच्या मते पेसा कायद्याविषयी माहिती असलेल्यांची संख्या दर्शविणारा आलेख | ११३ |
| ४ | पेसा कायद्यामुळे आदिवासी क्षेत्राचा विकास होण्यास मदत होईल याविषयीचे निवेदकांचे मत दर्शविणारा आलेख | ११६ |
| ५ | निवेदकांच्या मते वनहक्क माहिती असलेल्यांची संख्या दर्शविणारा आलेख | ११७ |
| ६ | घरी शौचालय बांधले असल्याविषयीचे निवेदकांचे मत दिर्शविणारा आलेख | १२२ |
| ७ | पाणी पिण्याच्या सुविधेचे स्त्रोत दर्शविणारा आलेख | १२४ |
| ८ | निवेदकांच्या मते ग्रामपंचायतीच्या अंतर्गत पाडयांवरती कुपोषणविषयी निवेदकांचे मत दर्शविणारा आलेख | १३२ |
| ९ | ग्रामपंचायतीने रोजगार उपलब्ध करुन दिला असल्याविषयीचे निवेदकांचे मत दर्शविणारा आलेख | १४१ |
| १० | निवेदकांची ग्रामसभेतील उपस्थिती दर्शविणारा आलेख | १४४ |
| ११ | निवेदकांचे ग्रामसभेमध्ये मुददा मांडण्याचे मत दर्शविणारा आलेख | १४६ |
| १२ | निवेदकांच्या मते ग्रामपंचायतीमध्ये भांडणे - तंटे होण्याबददलचे मत दर्शविणारा आलेख | १५३ |
| १३ | निवेदकांच्या मते ग्रामपंचायतीमध्ये अमली पदार्थांचे उत्पादन करण्याविषयीचे मत दर्शविणारा आलेख | १५५ |
| १४ | ग्रामपंचायतीमध्ये निवडून दिलेल्या लोकप्रतिनिधींच्या कामांविषयी निवेदकांचे मत दर्शविणारा आलेख | १६३ |
| १५ | ग्रामसभेचा फायदा होण्याविषयीचे निवेदकांचे मत दर्शविणारा आलेख | १६६ |
| १६ | ग्रामसभेमुळे निवेदकांना मिळालेला फायदा दर्शविणारा आलेख | १६७ |

# प्रस्तावना

सदर अभ्यास अनुसूचित क्षेत्र (आदिवासी भाग) असलेल्या भागातील ग्रामपंचायतीमध्ये करण्यात आला आहे.परंतू आदिवासी भाग म्हटल्याबरोबर आपल्या डोळ्यासमोर शहरापासून खूप दूर ज्या ठिकाणी पायाभूत सोय-सुविधांचा अभाव आणि मागासलेला भाग अशा येतो.अशा या भागाचा विकास करण्यासाठी व ग्रामीण भागाचा विकास करण्यासाठी पंचायत राज ही त्रिस्तरीय व्यवस्था लागू केली.या पंचायतराज व्यवस्थेमुळे व ७३ व्या घटनादुरुस्तीने ग्रामीण भागाचा विकास होण्यास मदत झाली.परंतु आदिवासी भागात पंचायतराज व ७३ व्या घटनादुरुस्तीच्या उद्देशाप्रमाणे फरक झालेला दिसून आला नाही.आदिवासी क्षेत्र हा ग्रामीण क्षेत्राच्या मानाने खूप भिन्न आहे. यास्तव या आदिवासी भागाचा विकास करण्यासाठी व आदिवासी लोकांना हक्क मिळवून देण्यासाठी आपल्या देशातील अनुसूचित क्षेत्रातील गावांना पंचायत क्षेत्रविस्तार कायदा १९९६ ने स्वयंशासनाचा अधिकार दिला आहे . या कायद्यामध्ये आदिवासींच्या जीवनामध्ये खूप मोठा बदल घडवून आणण्याची क्षमता आहे. तसेच त्यामुळे आदिवासी विकासाला चालना मिळणार आहे. केंद्र व राज्य शासनस्तरावर या हक्काच्या अंमलबजावणीसंबंधात अनेक उपाययोजना करण्यात येत आहेत. परंतू या कायद्याची माहिती आदिवासींना व संबंधित ग्रामस्तरावरील यंत्रणेला नसल्याने या कायद्याची अंमलबजावणी करण्यात अडचणी निर्माण होत आहेत. या कायद्याची माहिती संबंधितांना व्हावी म्हणून ती या संशोधन अहवालातून सादर करण्यात आली आहे.

या संशोधन अहवालामध्ये असलेली माहिती एकूण सहा प्रकरणामध्ये मांडण्यात आली आहे.

पहिल्या प्रकरणामध्ये आदिवासी जमातीची वैशिष्ट्ये, शासनाने व स्वयंसेवी संस्थांनी आदिवासी जमातीच्या विकासासाठी व इतर समाजाबरोबर आणि शहरी भागास जोडण्यासाठी केलेली कामे व योजना याविषयी विशेष: महाराष्ट्र शासनाने आदिवासींसाठी केलेले प्रयत्न मांडण्यात आले आहेत. तसेच पंचायत राज व्यवस्थेमधील ७३ व्या घटनादुरुस्तीची वाटचाल,

पंचायत राज आणि ग्रामसभा याविषयीची सविस्तर माहिती देण्यात आली आहे. आणि शेवटी पंचायत क्षेत्र विस्तार कायदा १९९६ याविषयी माहिती देण्यात आली आहे.

संशोधन अहवालासाठी वापरण्यात आलेल्या संदर्भ साहित्याचा आढावा आणि संशोधन कर्त्याने संशोधन करतेवेळी केलेल्या निरिक्षणांचा प्रकरण दुसऱ्यामध्ये उल्लेख केला आहे. प्रकरण ३ मध्ये संशोधन करण्यासाठी वापरण्यात आलेली संशोधन पध्दतीची मांडणी करण्यात आली आहे. तर प्रकरण ४ मध्ये संशोधन करण्यात आलेल्या अभ्यास क्षेत्राच्या आराखडयाची व संशोधनासाठी संशोधनकर्त्याने मुलाखत घेतलेल्या निवेदकांची यादी जोडण्यात आली आहे. व पाचव्या प्रकरणात संशोधनकर्त्याने तथ्थे संकलन केलेल्या माहितीचे पृथ्थकरण करुन त्याचे सारणीमध्ये आणि आलेखामध्ये केलेल्या मांडणीचे विश्लेषण केले आहे. आणि सहाव्या प्रकरणात संशोधनातून समोर आलेले निष्कर्ष आणि सूचना देण्यात आल्या आहेत. व शेवटी प्रश्नावली जोडण्यात आली आहे.

- जानू जे. पागी

# प्रकरण १ ले

# अभ्यासविषयाची प्रस्तावना

सदर प्रकरणामध्ये अनुसूचित जमातीमध्ये असलेले अज्ञान व त्यांची दिशा, केंद्र व राज्य शासनाने अनुसूचित जमातीच्या विकासासाठी केलेले प्रयत्न, पंचायतीराजमधील सत्तेचे झालेले विकेंद्रीकरण, ७३ व्या घटनादुरुस्तीची वाटचाल, त्रिस्तरीय पंचायतीराज व्यवस्था, ग्रामपंचायत, ग्रामसभा आणि पंचायत क्षेत्र विस्तार कायदा १९९६ याविषयी विस्तृत माहिती देण्यात आलेली आहे.

## १.१ आदिवासी समाज एक दशा - एक दिशा

आर्यांचे हिंदुस्थानात आगमन होण्यापूर्वीपासून आदिवासी हे या देशाचे रहिवासी होते. त्या काळी हा समाज टोळया-टोळयांनी राहत असे. आर्य लोकांनी हिंदुस्थान काबीज केल्यावर मात्र या टोळयांपैकी अनेक टोळया आर्यांशी एकरुप व समरस झाल्या, तर काही टोळया पराभूतही झाल्या. पराभूत झालेल्या टोळयांनी आपले अस्तित्व अबाधित राखण्यासाठी जंगलमय प्रदेशांचा व दऱ्याखोऱ्यांचा आश्रय घेतला. त्यामुळे भारतातील या आदिवासी लोकांना गिरिजन असे म्हटले जाते. तसेच हे सारे लोक इथलेच म्हणून त्यांना भूमिजन या नावानेही संबोधले जाऊ लागले. ही सारी मंडळी सतत अरण्यात वास्तव करुन असल्याने कोणी त्यांना अरण्यक या नावानेही ओळखु लागले. अलिकडे भारतीय संविधानाने त्यांना अनुसूचित जमाती म्हणजेच आदिवासी किंवा आदिम जमाती या नावाने संबोधावयास सुरुवात केली.

भारतात इंग्रजांचे आक्रमण होईतोपर्यंत या आदिवासी जमातींच्या सामाजिक/ सांस्कृतिक जीवनात कोणीही ढवळाढवळ केली नव्हती. वा तशी गरजही कुणाला भासली नव्हती. इंग्रज राजवट आल्यावार मात्र परिस्थिती बदलू लागली. इंग्रज आमदानीत समाजसुधारणेचे कट्टर पुरस्कर्ते गोपाळ गणेश गोखले यांनी इंग्रज सरकारला खडसावून विचारताना प्रश्न केला की, हे प्रशासन भारतातील आदिवासींच्या प्रश्नांकडे सहानुभूतीपूर्वक काही लक्ष देणार आहे काय? काही विचारणा करणार काय? अर्थात इंग्रजांना त्यात फारसा रस नव्हता. इंग्रज सरकारने निर्विकारपणे

त्या प्रश्नाचे उत्तर देताना म्हटले की, आदिमानव कसा होता हे दिसण्यासाठीच आदिवासी लोकांच्या मूळ स्थितीत बदल केला जाणार नाही. म्हणूनच हे सरकार आदिवासींच्या प्रश्नाकडे गंभीरपणे पाहणार नाही. थोडक्यात इंग्रज सरकारलाही आदिवासी समाज एखाद्या वस्तुसंग्रालयातील जपून ठेवल्या जाणाऱ्या वस्तूप्रमाणे जपायचा होता. आहे त्या व असतो त्याच स्थितीत परंतु पुढे लवकरच ही स्थिती बदलली. याच इंग्रजी आमदानीत ख्रिस्ती मिशनरी, मानवशास्त्रज्ञ तसेच जनगणना करणारे अधिकारी या आदिवासी लोकांत गटागटाने फिरु लागले हे सारे आदिवासी जरी हिदुस्थानवासी होते तरी त्यांना हिंदू धर्मात त्यांचा समावेश नव्हता. पारंपारिक चालत आलेल्या चातुवर्ण्य समाजव्यवस्थेत त्यांचा कुठेच समावेश झालेला नव्हता. या लोकांना शुद्र म्हणावे तरी हिंदू धर्मानुसार शूद्र गणलेल्या लोकांसारखी त्यांची स्थिती नव्हती. इंग्रज राजवटीत झालेल्या शिरगणतीत त्यांना प्राणीपूजक म्हणून संबोधले गेले. पुढे कालांतराने दळणवळणाच्या साधनात वाढ होत गेली. त्यामुळे हिंदू समाज व आदिवासी वर्ग यांच्यात सामाजिक व सांस्कृतिक स्वरुपाची देवाणघेवाण होऊ लागली. त्यांच्यातील भौगोलिक अंतर कमी होऊ लागले. आणि नंतर त्यांच्यातील हिंदू परंपरा लक्षात घेऊन त्यांना हिंदू म्हणूनही ओळखण्यात येऊ लागले. भारतीय समाजशास्त्रज्ञ डॉ. घुर्ये यांनी त्यांना मागासलेले हिंदू म्हणून त्यांचे वर्णन केले आहे. तर कोणी त्यांना भारतातील हिंदू धर्माचे आचरण करणाऱ्या वन्य जमाती असेही म्हटले आहे.

सन १९५६ च्या घटनानियम, जनजमाती दुरुस्ती यादीनुसार भारतात सुमारे ४०० जमातींची नोंद झाली, तर सन १९८१ च्या जनगणनेनुसार भारतीय लोकसंख्येत त्यांचे प्रमाण ७.५ टक्के एवढे आहे. या आदिवासी लोकांनी भारतातील सर्व मिळून १०० हजार चौरस मैलांचा भूप्रदेश व्यापलेला आहे, असे एका पाहणीत म्हटले आहे. या पार्श्वभूमीवर आज महाराष्ट्राचा विचार करता महाराष्ट्रातील १६.५ टक्के एवढे क्षेत्रफळ आदिवासी योजनेत मोडते आहे. महाराष्ट्रातील आदिवासींची संख्या (सुमारे) ७३.१८ लक्ष एवढी आहे. त्यापैकी ३७.३३ लक्ष आदिवासी म्हणजे सुमारे ५३ टक्के आदिवासी लोक आदिवासी उपयोजनेच्या क्षेत्रात येतात, तर १९९१ च्या जनगणनेनुसार आदिवासींची लोकसंख्या ९.२७ टक्के होती. आदिवासी समाजाचे

स्पष्टीकरण करताना डॉ. रिव्हर्स म्हणतात - आदिवासी हा समूह एक साधा सामाजिक समूह असून त्यातील सभासद एका समान बोलीभाषेचा वापर करतात. शिवाय ते युध्द वगैरे सारख्या उद्दिष्टपूर्तीसाठी एकत्रितही येतात. यापेक्षा डॉ. डी एन मुजुमदार यांनी या आदिवासी लोकांचे स्वरुप अधिक विस्तृतपणे विषद केले आहे. ते लिहितात- आदिम समाज म्हणजे सामान्यपणे एकच नाव धारण करणाऱ्या, एका विशिष्ठ भूभागावर वास्तव करणाऱ्या, एकाच प्रकारची बोली बोलणाऱ्या, विवाह संबंध व व्यवसाय या बाबतीत एकाच प्रकारचे निषेध नियम पाळणाऱ्या व निश्चितपणे एका विशिष्ट प्रकारची मुल्ये व विचार यांची जपणूक करणाऱ्या कुटुंबाचा समूह होय.

असा या आदिवासी लोकांबद्दल आजही परस्पर विरोधी मते व्यक्त केली जात आहेत. कोणाच्या मते हा वर्ग दारिद्रय, क्रौर्य व भिती यांच्या साम्राज्यात नांदत असतो. तर कोणाच्या मते तो अत्यंत सौम्य शांत व सुरक्षित जीवन जगणारा वर्ग आहे. आदिवासींना कायदा माहित नसतो, असे मत काही जणांनी व्यक्त केले, तर काहींनी त्यांना कायदा व रुढी यांचे गुलाम करुन टाकले आहे. काही अभ्यासक या लोकांना धार्मिक भावना व श्रध्दा बिलकुल नसतात असे म्हणतात, तर काहींच्या मते, या आदिवासी लोकांच्यात पवित्र भावना व कर्मकांड यांचे प्राबल्य असते. काहींनी या लोकांना साम्यवादी ठरवले तर काहींनी त्यांना व्यक्तीवादी म्हटले. तर काहींच्या मते, हे लोक म्हणजे घरेलू सदगुणांचा पुतळा होय. काहींना हा समाज आळशी वाटला तर काहींना सपळ व कामसू वाटला वरील मतांतराचा एकत्रित विचार करता, महानुभव पंथातील एक हत्ती व सात आंधळे यांच्या गोष्टीचे स्मरण होते. एका आंधळयाला हत्ती खांबासारखा वाटतो, तर दुसऱ्याला दोरीसारखा, एकाला सुपासारखा तर दुसऱ्याला मुसळासारखा थोडक्यात, ज्या आंधळयाच्या हाती त्या हत्तीचा जो अवयव आला त्याप्रमाणे त्यांनी हत्तीचे वर्णन केले. साऱ्यांचे एकत्रित वर्णन म्हणजे परिपूर्ण हत्ती, असेही म्हणता येत नाही. तिच गोष्ट आदिवासींच्या बाबतीतील. ज्यांना जसा अनुभव आला तसे त्याने या लोकांचे वर्णन केले. एवढे सर्व वर्णन करुनही आदिवासी लोकांची खऱ्या अर्थाने ओळख होईलच असही ठामपणे म्हणता येणार नाही. कारण या लोकांच्या बाबतीतील काही पूर्वग्रह आहेत. अशा या समाजात अनंत जाती-उपजमाती, प्रत्येकाचे आचर

धर्म, भावना, सण-उत्सव यात भिन्नता आढळते. तरीही हे सारे आदिवासीच आहेत. अशा या आदिवासींची थोडक्यात ओळख करुन घेताना त्यांच्या वैशिष्टयांवर दृष्टिक्षेप टाकावा लागतो.

**१) समान भूप्रदेश किंवा प्रादेशिक विलगता:-**सर्व सामान्य लोकांपासून बाहेर राहणारा हा समाज, समान्यत: दुर्गम अशा डोंगराळ प्रदेशात व वन्य जंगलातून राहतो. यातील प्रत्येक जमातीचा स्वतंत्र असा भूप्रदेश असतो. पायवाटेपेक्षा अधिक सुधारणा नसते. उलट यांच्या वस्तीकडे जाण्यात जंगले, झाडे-झुडपे, नदया, नाले, डोंगर व वन्य जनावरे यांचे अडथळेच अधिक असतात. अशा तऱ्हेने या लोकांनी जणू निसर्गाचीच तटबंधी आपल्याभोवती करुन घेतलेली असते.

**२) समान संस्कृती:-** सामान्यत: सर्वच आदिवासी लोकांचे खाणे-पिणे, पोशाख, रितीरिवाज, आचार-विचार यात साधर्म आढळते. एवढेच नव्हे तर त्यांच्या सांस्कृतिक कार्याचेही स्वरुप थोडयाफार अंतराने समानच असलेले दिसते. त्यामुळे सामाजिक जिवनात ऐक्यभाव व समान संस्कृतीचे दर्शन या आदिवासी जमातीतून होत असते.

**३) लोकसंख्येचे अल्प प्रमाण:-** या लोकांनी एकूण व्यापलेल्या प्रदेशाच्या तुलनेत त्यांची लोकसंख्या मात्र अत्यल्प असलेली दिसते. या लोकांची सामाजिक संपर्काची व्यप्ती मर्यादित असून, बाह्य जगाशी त्यांचा संबंध अल्प असतो.

**४) साधी तंत्रविद्या:-** आधुनिक यंत्रसामग्रीने सामान्य माणसाने आपले भौतिक जीवन समृध्द केलेले असले तरी या नवीन यंत्र - शोधांची माहिती आदिवासींना नाही. ते अद्यापही निसर्गाला आपल्या काबूत ठेऊन जीवन जगतात.

**५) स्वभाव:-** जंगलातील जीवन जगणाऱ्या आदिवासींना हिंस्र प्राण्यांच्या स्वभावाचीही जाणीव झालेली असते. त्यामुळे आदिवासी लोक जंगलात स्वैर वृत्तीने वागतात. उलट सुधारलेल्या लोकांचीच त्यांना भिती वाटत असते.

**६) भाषा:-** प्रत्येक जमातीची बोली भाषा जरी वेगळी असली तरी त्या सर्व भाषा लिखित स्वरुपाच्या नाहीत. एका टोळीत वा एका जमातीत समान भाषेचा वापर केला जातो.

उदा. गोंडांची - गोंडी, वारलीची - वारली, कोकणीची- कोकणी इ. अशा या भाषेने आपापले गट सांस्कृतिकदृष्टया जसे एकत्रित बांधून ठेवले आहेत, तसेच ते इतर भाषिकांपासून स्वतंत्रही ठेवले आहेत. या लोकांच्या भाषेचे आकलन सर्वसामान्य लोकांना (व सरकारलाही) होत नाही. या लोकांना मराठी भाषा समजते पण बोलता येत नाही. आणि आलीच तर त्यात अनेक चूका होत असतात. परिणामी या भाषेचे आकलन करुन घेण्यासाठी दुभाषिकाची गरज भाषते यांच्यातील संस्कृतीचे हस्तांतर करण्यासाठी त्यांची लोकगीते, लोककथा, लोकनृत्य, कोडी, म्हणी, उखाणी इ. गोष्टी मदतीस येतात.

**७) अर्थव्यवस्था:-** हा सारा समाज आपल्या नैसर्गिक पर्यावरणावरच अवलंबून असतो. त्यावरच त्याची उपजीविका अवलंबून असते. स्त्री व पुरुष नैसर्गिक दृष्टया लाभलेले लिंगद्वैभाजन आदिवासींच्या अर्थव्यवस्थेच्या बुडाशी असते. खरे तर हा साराच समाज दारिद्रयाचा सारखा व सम प्रमाणात अनुभव घेत असल्याने दरिद्रय असूनही हा समाज आर्थिक दृष्टया सुखी आहे. पोटापुरते अर्थोत्पादन हे त्यांचे साधे समिकरण आवश्यकतेपेक्षा जास्त म्हणजे शिलकी उत्पादन त्यांच्याजवळ आढळत नाही. व वस्तू विनिमयाच्या सहाय्याने ते परस्परांच्या गरजा भागवितात. त्यांची अर्थोत्पादनाची सामग्रीही अति अल्प व साधी असते. शिवाय व्यवसायिक विशेषीकरण नाही.

**८) समान धर्म:-**निसर्गाच्या सानिध्यात राहणारा हा आदिवासी समाज सामान्यत: निसर्गपूजा, पूर्वज, भूत-पिशाच्च, जादूटोणा, हिंस्त्र प्राणी या साऱ्या गोष्टींवर विश्वास ठेवणारा असाच असतो. गुढ दंतकथांवर त्यांचा प्रचंड विश्वास असतो. परंतु अलिकडे त्याचे प्रमाण काही प्रमाणात कमी होताना दिसते आहे.

**९) एकोप्याची भावना:-** एखाद्या विशिष्ट भूप्रदेशावर आदिवासीतील वेगवेगळया गटांचे लोक एकत्रित राहत असतील तर त्यांच्यात एकोप्याची भावना निर्माण होते. जसे आपल्या समूहाबद्दल

वा जमातीबद्दल त्यांना अभिमान निर्माण झालेला असतो, तसाच तो समूह केंद्राबद्दलही वाढलेला असतो. परस्परात सलोखा निर्माण करण्याची प्रवृत्ती साऱ्याच आदिवासी लोकांच्यात दिसून येते.

**१०) एकरक्तपणाची भावना:-** प्रत्येक आदिवासी जमातीला स्वतंत्र नाव आहे उदा. वारली, कोकणा, मल्हार कोळी, भिल्ल इ. यांतील प्रत्येक जमात ही अन्य जमातीपासून वेगळी असली तरी पूर्वी कोणे एके काळी आपल्या सर्वांची निर्मिती ही एकाच पूर्वजापासून झालेली आहे,अशी एक श्रध्दा या लोकांत आहे. या समान पूर्वजांमुळे ते परस्परांना रक्तसंबंधी मानतात. यामुळे या सर्व लोकांत एकप्रकारची आत्मीयता, प्रेम, ओढ, आपुलकी दिसून येते.

**११) न्यायव्यवस्था:-** प्रत्येक गावांत एक ग्राम प्रमुख असतो तो ओळखला जावा म्हणून त्याला काही मानचिन्हेही असतात. न्यायनिवाडयासाठी गावाच्या मध्यभागी गावची महासभा भरवली जाते. गाव प्रमुखाबरोबरच आणखी पंच मंडळीही निवाडा करण्यात सहभागी होतात. खरे तर गावाच्या प्रमुखाची अतिशय कडक नजर गावावर असल्याने गुन्हयांचे प्रमाण कमीच असते. असलेच तर सामान्यपणे अनितिचेच गुन्हे असतात. अशा गुन्हांना कडक शासन देण्यात येते न्यायसंस्थेचे अस्तित्व असूनही ती अलिखित स्वरुपाचे आहे. हे तिचे आगळेवेगळे वैशिष्टय होय.

**१२) विवाहसंस्था:-** विवाहाकडे धार्मिक संस्था या दृष्टीने न पाहणारा हा समाज, विवाह म्हणजे एक सामाजिक करार मानतो. युवागृहातूनच मुले-मुली आपला जीवनसाथी निवडत असल्याने बाल विवाह प्रस्थेला येथे थारा नाही. असे असले तरीही विवाहासाठी जोडीदार निवडताना अंतर्विवाहाचा व बहिर्विवाहाचा नियम लोकांना पाळावाच लागतो. यात अधिमान्य विवाहास प्राधान्य दिले जाते.

या समाजात अंतर्विवाह, बहिर्विवाह, अधिमान्य विवाह, एक विवाह, बहुपत्नी विवाह असे विवाहाचे विविध प्रकार जसे दिसून येतात तसेच आपल्या आयुष्याचा जोडीदार निवडण्याच्याही विविध पध्दती या समाजात आढळून येतात. ज्यात क्रमविवाह, सेवाविवाह, विनिमय विवाह, परीविक्षा विवाह, अपहरण विवाह, परिक्षा विवाह, समपलायन विवाह, घरघुशी अथवा दृढागमन विवाह इ. पध्दतींचा समावेश असलेला आढळतो.

**१३) अज्ञान:-** ज्ञानाच्या बाबतीत आदिवासी समाज अगदीच मागासलेला आहे. केवळ आपल्या रुढी-परंपरांचे ज्ञान झाले की ती व्यक्ती या समाजात ज्ञानी बनते. लौकीक जगातील ज्ञानाचा त्यांच्या जीवनाशी संबंध येत नसल्याने ते मिळविण्याचा प्रयत्न आदिवासी करीत नाही.

**१४) अंधश्रध्दा:-** मुळातच अज्ञानी /अडाणी असलेला हा समाज आपल्या अंधश्रध्देने मागासलेलाही असल्याचे जाणवते. शुभाशुभाच्या त्यांच्या कल्पना सामान्यांच्या आकलनापलीकडच्या ठरतात. वैद्यकीय व्यवसायावर विश्वास न ठेवणारा हा समाज उलटपक्षी जन्म, मृत्यू, वृध्दत्व, व्याधी, रोग-आजार, या प्रत्येक बाबतीत केवळ भगताचा सल्ला घेत आलेला आहे. परंतु सद्यपरिस्थितीत हा समाज जन्म, मृत्यू, वृध्दत्व, व्याधी, रोग-आजार वैद्यकीयांकडे जाऊ लागला आहे.

**१५) व्यवसाय:-** निसर्गात जन्मणारा - वाढणारा हा  समाज निसर्गाचाच अंकित होतो. त्याच्याच साहाय्याने तो आपले जीवन जगतो. एका एकरापासून ते पाच एकरापर्यंतच्या आपल्या शेतावर तो गुजराण करतो. ही शेती सामान्यत: दऱ्या-खोऱ्यांतील निकृष्ट प्रतिची असल्याने सामान्य पिकांचीच असते. शेतीसाठी त्यांना अवजारांची गरजच भासत नाही. जमिनीत नांगर घालणे वा खुरप्यांनी खुरपणे म्हणजे आपल्या मातेच्या (धरतीमातेच्या) शरीरात शस्त्रे खुपसण्यासारखे होय अशी त्यांची धारणा असते. शेतीच्या जोडीलाच अन्य व्यवसायात आदिवासी लोक डोंगरातील हिरडा, मध, मोराची पिसे, कवडया, मोहाची फुले, कंद इ. वस्तू जमा करुन मोठया शहरांत विकावयास नेतात. यांच्यातील काही लोक वेताच्या वस्तू, गवताच्या टोपल्या, देवाच्या प्रतिमा, मुखवटे इ. देखील बनवतात. (यात वारली लोकांनी मात्र आपल्यातील चित्रकलेला अधिक विकसित करण्याचा प्रयत्न चालविलेले आहे.) शेती करणाऱ्यांची शेती सावकाराकडे कित्येकदा गहाणही पडलेली असते.

**१६) करमणूक:-** विविध सणासुदीच्या निमित्ताने नृत्य करणे (उदा. ठाणे जिल्हयातील तारपा नाच, ढोल नाच, तूर नाच, गौरी नाच इ.) शिकार करणे, आणि त्याच बरोबरीने सर्व लोकांनी एकत्र येऊन गप्पा मारणे म्हणजे आजचा दिवस कशा आनंदात जाईल याकडे विशेष लक्ष असते.

## शासन व्यवस्था आणि आदिवासी समाज

सामान्यातल्या सामान्य माणसालाही आपल्या जीवनाविषयी आस्था असते. आपले जीवन शांततामय वातावरणात, सुरक्षततेसह आणि स्थिरतेने कसे जगता येईल याचा तो जसा विचार करतो, तसेच तो प्रयत्नही करीत असतो. जीवनात काही ध्येये, उदिदष्टये याबद्दल आग्रही असणारा माणूस त्या दृष्टीने प्रयत्नही बनतो. मग तो कोणत्याही समाजाचा असो. मागासलेल्या वा पुढारलेल्या समाजाचा प्रत्येकांची हीच प्रवृत्ती असते. आपल्या लौकिक व भौतिक जीवनाचा उपभोग आनंदाने घेता यावा ही त्यामागील प्रामाणीक भूमिका आणि असे जीवन कोणासही (त्यांच्या कुवतीनुसार) जगता यावे यासाठी व्यवस्था करण्याची जबाबदारी शासनाची असते. प्रत्येकाला त्याच्या विकासाचा दरवाजा उघडून देणे हे शासनाचे नैतिक व घटनेद्वाराही कर्तव्यच बनते. या पार्श्वभूमीवर या समाजातील आदिवासी समाजाचे सर्व घटकही कसे अपवाद ठरतील? उलट केंद्र व राज्य शासनांनी घटनेद्वारे स्वत:ला अनेक बंधने घालून घेऊन या समाजाच्या सर्वांगीण विकासावर भर दिलेला आहे.

**१) घटनात्मक तरतूदी:-** स्वातंत्र्योत्तर कालावधित या अनुसूचित जाती- जमातींच्या समस्यांचे निराकरण करण्यासाठी ज्या घटनात्मक तरतूदी केल्या आहेत त्यांचे स्वरुप असे. १) समतेच्या तत्त्वावर मुलभूत अधिकार दिले गेले. २) लोकसभा व विधानसभा यांसाठी लोकसंख्याच्या प्रमाणात प्रतिनिधित्व दिले गेले. ३) शासकीय व सार्वजनिक सेवेत या लोकांसाठी जागा राखीव ठेवण्यात आल्या. ४) आसाम, मध्यप्रदेश, बिहार, ओरिसा यांसारख्या राज्यांत या आदिवासींची लोकसंख्या मोठया प्रमाणात असल्याने त्या त्या राज्यांत कलम १६४ अन्वये अनुसूचित जमाती कल्याण मंत्रालय निर्माण करण्याची तरतूद केली गेली. ५) आदिवासींच्या कल्याणाकरीता राष्ट्रपतींना आपल्या अधिकारांत आदिवासी कल्याणकारी समिती नेमण्याची मुभा देण्यात आली. ६) राज्यपाल, प्रादेशिक परिषद, जिल्हा परिषद यांनाही आदिवासींबाबत कायदेविषयक अधिकार बहाल करण्यात आले.

**२) शैक्षणिक सवलती/ सुविधा:-** सरकारने आदिवासी भागात मोठया प्रमाणात आश्रमशाळा उघडून जणू या समाजाला शिक्षणाचे दालनच उघडून दिले आहे. शालेय शिक्षणाबरोबरच येथे

शिवण-विणकाम, हस्तव्यवसाय इ. व्यावसायिक सोय केली आहे. असे शिक्षण घेत असताना क्रमिक पुस्तकाचे मोफत वाटप, दुपारचे मोफत जेवण, मोफत गणवेश आणि अन्य शालेयपयोगी वस्तूंचा पुरवठा तसेच वसतीगृहाची मोफत सोय इ. चा लाभ या समाजाच्या मुलांना घेता यावा अशी सोय केली आहे. एवढेच नव्हे तर अनेक प्रकारच्या शिष्यवृत्त्या व परदेशगमनाच्या (शिक्षणासाठी) संधी उपलब्ध करुन दिल्या आहेत. लोकसेवा आयोगाचे मार्गदर्शन मिळण्याची सोय करण्यात आली आहे. जेणेकरुन या जाती-जमातीतील मुलांना आपला सर्वांगीण विकास करुन घेणे शक्य होईल.

**३) आर्थिक विकास:-** आजवर केवळ रानावनांतून आपले जीवन जगणारा हा समाज, अस्थिर व अशाश्वत स्वरुपाचे जीणे जगत होता. त्यांच्या जीवनाला स्थैर्य यावे यासाठी काही आर्थिक विकासाच्या काही योजना सरकारने राबविण्यास सुरुवात केली आहे. यांत त्यांना शेतीची अवजारे, मोफत बी-बियाणांचा पुरवठा, पाणीपुरवठा, सोईस्कर कर्जे इ. चा समावेश करता येईल. या शिवाय नवीन हस्तांतरावर बंधन घालून सरकाराने बिगर आदिवासींकडे ज्या आदिवासींच्या जमीनी गेल्या होत्या, त्या त्यांना परत मिळवून दिल्या. वेठबिगारी कायदा, किमान वेतन कायदा इ. गोष्टींची तरतूद करुन या लोकांचे आर्थिक जीवनमान वाढविण्याचे प्रयत्न सरकारने आर्वजून केले. कुटिरउद्योग (टोपल्या विणणे, दोर तयार करणे, पशुपालन, कुक्कुटपालन, डुक्करपालन, मधमाश्यापालन इ.) अधिक जोमाने करता यावे यासाठी कर्जे पुरवठयाची सोयही सरकारने उपलब्ध करुन दिली आहे. या व अशा योजनांसाठी शासनाने पंचवार्षिक योजनेत मोठया प्रमाणात निधी तरतूद करुन या समाजातील लोकांचे एकंदर जीवनमान उंचावण्याचा सर्वंकष प्रयत्न केला. तसेच सहकाराचे लोण या समाजाच्या घरापर्यंत पोहोचविले.

**४) स्वच्छता व निवास व्यवस्था :-** या आदिवासी समाजाला स्वच्छतेचे शिक्षण देणे हे प्राथमिक कार्य शासनाने केले व त्यासाठी सरकारने या लोकांसाठी स्वच्छ पाण्याचा पुरवठा (प्रसंगी त्यासाठी विहीरी खोदल्या, कूपे तयार केली) करुन दिला. त्याला अनूलक्षून मग प्राथमिक आरोग्य केंद्रे, कुष्ठरोग निवारण केंद्रे, प्रसूतीगृहे, बाल संगोपन केंद्रे इ. गोष्टींची सुविधा उपलब्ध करुन दिली. तसेच शासनाने इंदिरा आवास योजना राबवून पक्की घरे तयार करुन दिली.

**५) संपर्क सेवा:-** या समाजातील लोकांना आपली संर्वकष प्रगती करुन घेता यावी, त्यांचा प्रगत शहरांशी संपर्क निर्माण व्हावा यासाठी सरकारने कच्चे-पक्के रस्ते तयार केले. तसेच त्यासाठी आवश्यक त्या ठिकाणी पूल व बंधारे बांधून या लोकांच्या अडचणी दूर केल्या. तसेच या समाजासाठी सरकारद्वारे रेडीओ व दूरदर्शन, दूरध्वनी, टपाल व्यवस्था इ. आधूनिक सोयी उपलब्ध करुन दिल्या आहेत. आधुनिकतेकडे वाटचाल करण्यास मार्ग दाखविण्यात आला.

**६) बिगर सरकारी प्रयत्न:-** अनुसूचित जमातीतील लोकांसाठी स्वातंत्र्योत्तर काळात जरी जोमाचे प्रयत्न सूरु झाले असले तरी स्वातंत्र्यपूर्व काळापासूनच या समस्येची जाण असलेल्या अनेक संस्थांनी या कार्याला स्वत:ला वाहून घेतलेले होते. अर्थात, स्वातंत्र्यपूर्व काळात त्यांच्या कार्याला निश्‍चितच मर्यादा होत्या. अशा मर्यादा (आर्थिक/ शासकीय इ.) लक्षात घेऊनही ज्या खाजगी संस्थांनी याबाबत कार्य केले आहे, ते निश्‍चितच उल्लेखनिय आहे. यात विशेषत: भारतीय आदिम जाती सेवक संघ (दिल्ली),आंध्र राष्ट्र आदिम जाती सेवक संघ (नेल्लोर), ठक्कर बाप्पा आश्रम, इंडियन रेड क्रॉस सोसायटी, यांसारख्या संस्थांचा या कार्यातील वाटा मोठा आहे.

आज सरकार या गोष्टींवर प्रचंड खर्च करीत आहे. खर्चाचे प्रमाण आणि विकासाची गती यांची तुलना केल्यास आजही (स्वातंत्र्याच्या ६९ वर्षानंतरही) यात मोठी फारकत दिसून येते. खर्चाच्या तूलनेत या जाती-जमातींचा विकास दिसून येत नाही. ही गोष्ट मान्यच करावी लागेल अर्थात, यामागील कारणे शोधून काढल्यास ही गती अधिक सुधारेल हे नक्कीच. त्यासाठी या समाजाच्या सुधारणेची कळकळ असणारे नि:स्वार्थी कार्यकर्ते, अभ्यासू व कार्यक्षम अधिकारी यांचा समावेश असणारी मंडळे तयार करण्याची गरज आहे. यात आणखी एक महत्त्वाची गोष्ट म्हणजे खुद्द आदिवासी लोकांना विश्‍वासात घेऊन त्यांच्या भ्रामक कल्पना मोडीत काढीत, शिक्षणाची नवी दिशा दाखवीत त्यांची मने परिवर्तीत केली पाहिजेत. एकदा का त्यांच्या मनोवृत्ती बदलल्या की, विकासाचा हा रथ कोणताही अडथळा आला तरी थांबायचा नाही. असा विश्‍वास आहे.[१]

## महाराष्ट्र शासन आणि आदिवासी समाज

भारताच्या राज्यघटनेत अनुसूचित जाती-जमातींसाठी विशेष कल्याणकारी योजना राबविण्यात याव्यात, असे म्हटले आहे. साहजिकच त्या गोष्टीचे पालन करणे प्रत्येक राज्याचे नैतिक व कायदेशीर बंधन आहे. महाराष्ट्र राज्याने ही गोष्ट प्रत्यक्षात उतरवीत असताना त्यात लक्षणीय प्रगती केली आहे. महाराष्ट्राचे एकूण क्षेत्रफळ ३ लाख ७ हजार ७६२ चौ.कि.मी असून त्यापैकी १६.५ टक्के क्षेत्रफळ आदिवासी उपयोजनेत मोडते आहे, तर महाराष्ट्रातील ७३.१८ लक्ष आदिवासींपैकी ३७.३३ लक्ष म्हणजेच ५७ टक्के आदिवासी उपयोजना क्षेत्रात येतात. आणि त्या सर्वांना सर्वच योजनांचा लाभ मिळतो आहे. आदिवासी लोकांच्या बाबतीत अतिशय आस्थेवाईकपणे त्यांचा विकास करणारे राज्य म्हणून महाराष्ट्राचा बराच वरचा क्रमांक लागतो. यासाठी म्हणून महाराष्ट्र शासनाने आदिवासी संचालनालयाची स्थापना केलेली असून त्याद्वारे अनुसूचित जमातींसाठी स्वतंत्रपणे कार्यक्रम राबविले जातात. याशिवाय आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्थेची उभारणी करुन महाराष्ट्र शासनाने या लोकांच्या एकंदरीत सर्वच विकासासाठी एक जणू गतीमान यंत्रणाच निर्माण केली.[४]

या संचालनालयाद्वारे (म्हणजेच महाराष्ट्र शासनाद्वारे) आदिवासींच्या विकासासाठी आदिवासी उपयोजना सुरु करण्यात आली. या योजनेअंतर्गत कार्य म्हणजे, आदिवासी लोकांच्या समस्या समजावून घेऊन त्या सोडविण्यास मदत करणे, इतरांकडून (विशेषत:धनिक वर्गाकडून) होणारी पिळवणूक थांबविणे, आदिवासी क्षेत्रे व इतर क्षेत्रे यांच्यातील विकास अंतर भरुन काढणे व आदिवासींची आर्थिक तथा सामाजिक सुधारणेची गती वाढविणे. याकरीता राज्य सरकारने जिल्हा पातळीवर एका आदिवासी विकास अधिकाऱ्याची नेमणूक केली. आज हे अधिकारी आपल्या अन्य कर्मचाऱ्यांच्या सहाय्याने आदिवासींचे प्रश्न सोडवित आहेत.

या संस्थेच्या जबाबदारीतील दुसरा महत्वाचा टप्पा म्हणजे प्रशिक्षण खरे तर या लोकांना मूळातच शिक्षणाचा गंध नाही, तर प्रशिक्षण कसे द्यावयाचे, कसे प्रशिक्षित करावयाचे? हा प्रश्न होता परंतू या संचालनालयाद्वारे प्रशिक्षण संस्थेद्वारा आदिवासी मुलांच्या शिक्षणाचा कार्यक्रम प्रथम हाती घेतला त्यासाठी या आदिवासी समाजातील मुलांसाठी आश्रमशाळा निर्माण केल्या.

कोणत्याही पाडयापासून जास्तीत जास्त २ कि.मी अंतरावर अशा या आश्रमशाळांची निर्मिती केली. अशा या शाळांमधून शालेय शिक्षणाबरोबरच, त्यांच्यात श्रमप्रतिष्ठा, राष्ट्रप्रेम, राष्ट्रीय एकात्मता, स्त्री-पुरुष समानता, अंधश्रध्दा निर्मूलन यासारख्या नवनव्या गोष्टींच्या जाणीवा करुन देण्याचे कार्य सुरु केले गेले. हे सर्व शिक्षण सरकारने केवळ मोफत उपलब्ध करुन दिलेले आहे. त्यांच्यासाठी अनेक ठिकाणी वसतीगृहेही निर्माण केलेली आहेत. जी मुले वसतीगृहात राहू शकत नाहीत, त्यांच्यासाठी सरकार खास शिष्यवृत्त्या देते. जेणेकरुन त्यांच्याही विकासास खीळ बसू नये.

आदिवासी मुलांच्याबरोबरच प्रौढासाठीही काही विकास कार्यक्रम याच प्रशिक्षण संस्थेमार्फत चालविण्यात येतात. त्यात प्रौढ शिक्षण, तांत्रिक शिक्षण, वैज्ञानिक तत्त्वज्ञानमिमांसा इ. गोष्टींचा समावेश आहे. या सर्व गोष्टींसाठी या संस्थेचा अधिकारी व कर्मचारी वर्ग तर अपार कष्ट घेतोच, शिवाय समाजातील त्या-त्या विषयातील तज्ञ मंडळीना शिक्षकांना बोलावून या आदिवासी लोकांचे ज्ञान अद्यायावत करण्याचा प्रयत्न केला जातो. या साऱ्यांचा एकत्रित परिणाम म्हणजे, या आदिवासी लोकांच्यात शिक्षणाची गोडी वाढत आहे. त्यांच्यातील शिक्षितांचेही प्रमाण वाढत आहे. हीच मंडळी आता राखीव जागांची मदत घेऊन नोकऱ्याही करु लागली आहेत. थोडक्यात, सरकारद्वारे चालविल्या जाणाऱ्या सर्व योजनांचा फायदा घेत आज हा आदिवासी समाज प्रगतीच्या दिशेकडे वाटचाल करीत आहे. तीच गती आणखीही काही वर्षे पुढे जात राहीली तर कदाचित आदिमानव अवस्थेतील आदिवासी शोधावा लागेल आणि शोधूनही तो सापडेल की नाही हेही सांगता येणार नाही. अर्थात हे सारे श्रेय आणि यश महाराष्ट्र राज्य शासनाचेच.

आदिवासी उपयोजनेअंतर्गत ज्या प्रमुख गोष्टी राज्य शासनाने लक्षात घेतल्या, त्यात व्यक्तीगत लाभाचाही समावेश केलेला असल्याने आज आदिवासी समाज त्याद्वारे विकास करुन घेऊ शकतो.

सामाजिक विकासात राज्य शासनाने प्रत्येक पाडयापर्यंत जाणारे रस्ते, वीजपुरवठा, पिण्याचे पाणी, शेतीला आवश्यक असणाऱ्या पाण्याचा पुरवठा, शेतीचा कस वाढविण्यासाठी

उपाययोजना, खत पुरवठा, बी-बियाणांचा पुरवठा, फळे फुले यांच्या बागा तयार करण्यासाठीची सर्व मदत, लघुपाटबंधाऱ्याची निर्मिती, पशुसंवर्धन सेवा, दुग्धविकास प्रकल्प, कुटीरदद्योगाच्या अंतर्गत येणाऱ्या व्यवसायांना चालना इ. अनेक गोष्टीत लक्ष घालून त्यावर भरीव प्रमाणात खर्च केला आहे व आजही करीत आहेत. या समाजातील मुलांच्या शिक्षणासाठी विविध सोयी, शाळा, महाविद्यालये, नोकरीतील राखीव जागा, त्याच्यासाठी विशेष प्रशिक्षण केंद्रे इ. गोष्टींची उपलब्धता करुन सरकारने आपले धोरण निश्चित केले आहे. लोकशाही राज्यात प्रत्येकाला आपला विकास करुन घेण्यास समान संधी असली पाहीजे या तत्त्वानुसार सरकार कार्य करीत आहे व त्यास काही प्रमाणात प्रतिसादही मिळत आहे. यामुळेच नजीकच्या भविष्यकाळात सुधारलेला व पुढारलेला आदिवासी समाज बघायला मिळेल यात शंकाच नाही. असे म्हणण्याचे कारण म्हणजे जिथे विशेषत: भावनांचा संबंध असतो, त्या त्यांच्या धर्मनिष्ठेवर आधारलेल्या मूळ संस्कृतीला सरकारने धक्का लावलेला नाही.[१]

महाराष्ट्रातील आदिवासी सुधारणेने जे कार्य शासकीय पातळीवर चालविले आहे ते निश्चितच कौतुकास्पद आहे. परंतु त्याहीपेक्षा जास्त सुखद गोष्ट म्हणजे महाराष्ट्रातील विविध (खाजगी) संस्थांनाही या कायद्यात घेतलेली अभिरुची होय. शासन कोणत्याही पक्षाचे असो, या संस्थांच्या कार्यावर त्याचा अजिबात परिणाम होत नाही. आदिवासींसारख्या दुर्गम-डोंगराळ-निर्जन व अरण्याच्या प्रदेशात जाऊन कामे करणे तसे अवघड व जिवावर बेतणारी गोष्ट आणि तेही नि:स्वार्थी सेवावृत्तीने अर्थात, ज्या संस्था व व्यक्ती अशा प्रकारचे कार्य करतात त्यांची दखल महाराष्ट्र शासनाकडून घेतली जाते. आदिवासी सेवक हा सामाजिक सन्मान देऊन त्यांना गौरविले जाते.

अनुसूचित जमाती विकास प्रत योजनेचे फळ सरकार पदरी पडणे अपेक्षित आहे, तरीही एकंदर सर्वेक्षण करता यशाचे प्रमाण अपेक्षापेक्षा कमीच आहे. अर्थात, त्याची कारणेही या लोकांशी जशी निगडित आहेत, तशीच काही शासनाच्या कार्यपध्दतीतही आहेत. पैकी शासन पध्दती सुधारणे शक्य आहे, तरीही आदिवासी समाजाच्या प्रवृत्तीचे काय? हा प्रश्न आजही अनुउत्तरीत आहे.[२]

सरकारने आदिवासी समाजाला जमिनी दिल्या त्यांचे हस्तांतरण होऊ नये व त्या बिगर आदिवासींच्या मालकीच्या बनू नयेत म्हणून अनेक कडक नियम केले. तरीही कायद्यातील पळवाटांचा आधार घेत, आज अशा अनेक जमिनी बिगर आदिवासी समाजाने बळकावल्या आहेत. त्यासाठी सरकारी यंत्रणेपासून ते सावकारी लोकांपर्यंतचा शोध घेण्याची गरज आहे. जी गोष्ट शेतीची, तीच गोष्ट या लोकांना बांधून दिलेल्या घरांची देखील आहे.

वेठबिगारीचा कायदा अतिशय कडक करुनही राज्यातील ही वेठबिगारीची समस्या अद्यापही संपुष्टात आलेली नाही. यासाठी प्रत्येक जिल्हाधिकाऱ्याला विशेष अधिकार प्रदान करण्यात आले आहेत, तरीही काहीशी उघडपणे व काहीशी गुप्तपणे ही वहीवाट अद्याप मूळ धरुनच आहे.

अनेक बिगर आदिवासी लोक नामसाधर्म्याचा फायदा घेत आदिवासी म्हणून सरकार दप्तरी खोटया नोंदी करुन घेतात आणि आदिवासींचे मिळणारे सारे फायदे लुटतात. त्यामुळे खऱ्या आदिवासींवर एक प्रकारे अन्यायच होत आहे. अशा संधीसाधू वृत्ती जोपर्यंत समाजात आहेत तोपर्यंत खऱ्या अर्थाने सरकारच्या हाती पूर्ण यश अशक्य.

अर्थात, या व अशा आणखीही त्रुटी असल्यातरी शासन त्यामुळे नाउमेद होत नाही. प्रत्येक त्रुटीविरुध्द कायद्याद्वारे नियंत्रण करीत सरकार आदिवासींवरील होणारे अन्याय कमी करीत आहे. अनुभवांनी शासन शहाणे बनत आहे. परिणामी आज आदिवासी वर्गातील विद्यार्थी तत्त्वज्ञानासारखे विषय घेऊन पदव्युत्तर परिक्षेपर्यंत पोहोचताहेत. हे कशाचे फलित म्हणावे? आजचा आदिवासी युवक स्वजनांच्या उत्थापनेसाठी बर्फाचे तट पेटवू पाहत आहे. याचाच अर्थ आज त्यांना स्वत्वची जाणीव झालेली आहे व ती जाणीव करुन देणे हेच सरकारचे ध्येय आहे.[३]

## १.२विकेंद्रीकरण व पंचायती राज

**पार्श्वभूमी:- स्वातंत्र्योत्तर काळात लोकशाही व्यवस्था अधिक रुढ व प्रगल्भ होत असताना आधिकाराचे, निर्णय प्रक्रियेचे विकेंद्रीकरण करण्याची गरज भासत होती.**

सत्तेच्या अशा विकेंद्रीकरणाची भारतास स्वातंत्र्योत्तर काळात गरज भासली कारण विस्तीर्ण भूप्रदेश, अनेक जिवन जगण्याच्या पध्दती, अनेक संस्कृती, अनेक वर्षापासून त्यांनी जपलेली विविधता, असे सर्व प्रश्न एका केंद्रस्थानी असलेल्या शासनाला पुर्णत: समजणार नाही व न समजल्यामुळे एकाच पध्दतीने सोडविण्याचा प्रयत्न होईल. योग्य त्या पध्दतीने सोडवले जाणार नाहीत. ज्याचा प्रश्न आहे, त्याला तो समजलेला आहे, त्याच्याजवळ प्रश्न सोडविण्याचा उत्तर किंवा योग्य तो पर्याय आहे, अशांना सत्तेत सहभाग देणे, निर्णय प्रक्रियेत सहभागी करुन घेणे म्हणजेच सत्तेचे विकेंद्रीकरण होय. उदा. भारताच्या बाबतीत दिल्ली, त्यानंतर महाराष्ट्राच्या बाबतीत मुंबई, त्यानंतर जिल्हा, त्यानंतर तालुका आणि शेवटी एक खेडे सोप्या शब्दांत देशाची राजधानी, राज्याची राजधानी, जिल्हा, तालुका, खेडेगांव, म्हणजेच केंद्र सरकार, राज्य सरकार, जिल्हा परिषद, पंचायत समिती, व ग्रामपंचायत होय. सत्तेच्या अशा पायऱ्या आणि प्रत्येक पायरीवर बसणाऱ्यांना विशिष्ट अधिकार, ही व्यवस्था म्हणजेच विकेंद्रीकरण होय. या विकेंद्रीकरणामुळे अधिकारशाहीस आळा बसतो व सुयोग्य निर्णय प्रक्रियेद्वारे स्थानिक प्रशासन राबविले जाते.

**बुट घातलेल्या व्यक्तीसच माहित असते की तो नेमका कोणत्या ठिकाणी चावतो**

हे एक प्रसिध्द वचन आहे. याचा अर्थ नेमका प्रश्न समजण्यासाठी तुम्हास त्या प्रश्नाचा त्रास जाणवला पाहिजे. ज्याला त्रास होतो ती व्यक्ती तो प्रश्न सोडविण्यासाठी त्यावर व्यवहार्य तोडगा किंवा उत्तर शोधू शकते. याचा दुसरा अर्थ असा की, स्थानिक लोकांना प्रश्नाचे स्वरुप माहित असते, त्यावर उपाय देखील त्यांच्या जवळ असतो. म्हणून तो प्रश्न सोडविण्यासाठी स्थानिक व्यक्तीस निर्णय प्रक्रियेत सहभागी करुन घेणे आवश्यक आहे. अशा प्रकारे जिल्हा, तालुका

आणि गाव पातळीवर व्यक्तीस निर्णय घेण्याचे अधिकार जेव्हा दिले जातात तेव्हा त्यास विकेंद्रीकरण म्हटले जाते.

स्वातंत्र्योत्तर काळात आपण एक व्यवस्था स्विकारली त्याला आपण लोकशाही म्हणतो. राजकीय लोकशाही म्हणजे जेथे जनमताद्वारे विशिष्ट कालावधीसाठी सत्तास्थानी कोण असावा हे ठरवले जाते. पण लोकशाही म्हणजेच सत्तेचे विकेंद्रीकरण.

**हे विकेंद्रीकरण तीन प्रकारचे असते-**

**१) भौगोलिक विकेंद्रीकरण:-** म्हणजे अनेक सत्तेची केंद्रे निर्माण करणे याचा अर्थ देश, राज्य, जिल्हा, तालुका, आणि गाव अशा अनेक भौगोलिक स्थानाना प्रशासकीय व निर्णय प्राप्तीचे अधिकार देते.

**२) सामाजिक विकेंद्रीकरण:-** म्हणजे समाजातील सर्व घटकांना सत्तेत सहभागी करणे यासाठी विशिष्ट गटासाठी आरक्षणाची तरतूद करणे याद्वारे सत्तेचे विकेंद्रीकरण टाळणे. भारतात पंचायत राज व्यवस्थेत जाती, जमाती, इतर मागासवर्गीय आणि महिला यांना ७३ व्या घटनादुरुस्तीने आरक्षण दिले. यामध्ये संस्था मधील सदस्यत्वाचे व पदावरील आरक्षण समाविष्ट करुन सामाजिक विकेंद्रीकरणास गती मिळाली.

**३) आर्थिक विकेंद्रीकरण:-** विविध सामाजिक घटक सत्तेत सहभागी केल्यानंतर त्यांना विकासाची कामे करण्यासाठी विविध स्तरावर म्हणजे जिल्हा, तालुका व ग्राम किंवा जिल्हा परिषद, पंचायत समिती व ग्रामपंचायत या ठिकाणी निधीची उपलब्धता करुन देणे आणि निधी उभारणीसाठी स्त्रोत उपलब्ध करुन निधी उभारण्याचे व विनियोगाचे अधिकार देणे म्हणजे आर्थिक विकेंद्रीकरण. उदा. ग्रामपंचायतींना मालमत्ताकर, पाणीपटटी इ. करांची आकारणी व वसुल करण्याचा अधिकार तसेच संस्थांना विविध स्वरुपात अनुदान उपलब्ध करणे.

भारतीय समाजात निर्णय प्रक्रियेत महिला अतिशय कमी होत्या, अगदी नगण्य होत्या. पंचायत राजमुळे महिलांना देश पातळीवर ३३ टक्के तर महाराष्ट्रात ५० टक्के आरक्षण सर्व पातळीवर देण्यात आले. पुरुष प्रधानतेचे केंद्रीकरण त्यामुळे कमी करता आले. समाजातील मोठा

घटक (महिला) आरक्षणामुळे निर्णय प्रक्रियेत आला. विकेंद्रीकरणामुळे महिलांच्या बाबतीत भारतीय समाज खूला होण्यास सुरुवात झाली. पंचायतराज संस्थांमधील राजकीय आरक्षणामुळे सामाजिक विकेंद्रीकरणास चालना मिळाली.

विकेंद्रीकरणामुळे फक्त स्थानिक नेतृत्वच निर्माण होत नाही. तर प्रश्नांचा विचार करुन मतदान करणारा मतदार देखील निर्माण होण्याची प्रक्रिया सुरु होते. अशा वेळी केवळ राष्ट्रीय नेतृत्वासाठी, राष्ट्रीय प्रश्नांना केंद्रबिंदू मानून चर्चा होईल, राष्ट्रीय प्रश्न गुतागुंतीचे, अवघड, अनेक बाजू असणारे असतात अशा वेळी सामान्य नागरिकास मतदान करणे अवघड जाते. पंचायतराज व्यवस्थेमुळे जे विकेंद्रीकरण झाले त्याचा परिणाम म्हणून लोकशाहीच अपेक्षित मतदार / नागरिक निर्माण झाला.

विकेंद्रीकरणामुळे पंचायतराज व्यवस्था अस्तित्वात आली. सत्तेच्या अनेक पायऱ्या निर्माण झाल्या. त्यावर समाजातील सर्व घटकातील व्यक्ती (अनु. जाती, अनु. जमाती, इतर मागास प्रवर्गातील व्यक्ती आणि महिला इ.) बसल्या. त्या बोलू लागल्या, मत मांडू लागल्या, महिला आग्रही भूमिका घेऊ लागल्या. सत्तेच्या स्पर्शाने त्या नुसत्या बोलत्या झाल्या नाहीत तर त्यांचे बोलणे त्यांच्या स्वत:चे, विचारांचे झाले.

विकेंद्रीकरण हा अर्थाने व्यापक विचार आहे. व जो पंचायतराज व्यवस्थेचा माध्यमातून भारतात कार्यरत आहे.

**भारतातील पंचायतराज व्यवस्थेच्या उत्क्रांतीतील काही महत्त्वाचे टप्पे**

पंचायती राज्यच्या निर्मितीमध्ये केंद्र व राज्याची महत्त्वाची भूमिका राहिली आहे. म्हणून पंचायती राजच्या उत्क्रांतीचे टप्पे स्पष्ट करताना त्यात महाराष्ट्र राज्याने घेतलेल्या भूमिकेचे विशेष स्थान आहे. केंद्र व राज्याचे पंचायतीराजसाठीचे प्रयत्न समिती व शिफारसी खालीलप्रमाणे.

१६८७ - मद्रास नगरपरिषद संस्था निर्मितीसाठी ब्रिटिश सनद

१८४२ - नगरपरिषदेच्या निर्मितीसाठी अधिनियम ९० द्वारे प्रथम औपचारिक कृती

१८५७ - बंडानंतर शासनासमोर आर्थिक तणाव निर्माण झाले. त्यावर उपाय म्हणून आर्थिक विकेंद्रीकरणाचा विचार

१८७० - लॉर्ड मिओ यांची आर्थिक आणि प्रशासकीय विकेंद्रीकरणाची योजना - बंगाल चोकीदारी कायद्याची निर्मिती.

१८८२ - लॉर्ड रिपन यांच्या स्थानिक स्वराज्य संस्थेबाबतचा मसूदा

१९०७ - ब्रिटिश शासनाने विकेंद्रीकरण कमिशनची स्थापना केली.

१९४८ - ग्रामस्वराज व स्वशासन यावर महात्मा गांधी आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्यात चर्चा

१९५७ - बलवंतराय मेहता समितीच्या पंचायत राज व्यवस्थेच्या रचनेसंबंधी शिफारसी, त्यात जिल्हा,तालुका, व गाव स्तरावर लोक नियुक्त संस्थांची स्थापना करणे उदा. जि.प.पं.स व ग्रामपंचायत इ. त्यांना ५ वर्षासाठी, पंचायतराज ची सत्ता हस्तांतरण. पंचायत समिती प्रशासकीय प्रमुख म्हणून गटविकास अधिकारी (B.D.O) या पदाची निर्मिती

१९५८ - मुंबई ग्रामपंचायत अधिनियमाने पंचायत राज व्यवस्थेची रचना, अधिकार, जबाबदाऱ्या आणि काम करण्याची पध्दती निश्चित.

१९०७ - वसंतराव नाईक समिती व बलवंतराय मेहता समितीच्या शिफारसीचा अभ्यास करुन महाराष्ट्र राज्याकरीता समर्पक शिफारसी, जिल्हा हा प्रमुख घटक मानून जिल्हा परिषदेस महत्त्व, प्रत्यक्ष मतदान पध्दतीने निवडणूक घेऊन तालुका स्तरावर पंचायत समितीची स्थापना आणि ग्रामविकासाशी संबंधित जिल्हा परिषदेचा प्रशासकीय प्रमुख म्हणून मुख्य कार्यकारी अधिकारी या पदाची निर्मिती.

१९६१ - जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियमाने जिल्हा परिषद आणि पंचायत समितीची कार्ये, अधिकार, जबाबदाऱ्या आणि कार्यपध्दतीमध्ये काळानुरुप फेरबदल.

१९६२ - महाराष्ट्राने पंचायत राजव्यवस्थेचा स्विकार केला म्हणजेच जिल्हयाच्या ठिकाणी जिल्हा परिषद, तालुक्याच्या ठिकाणी पंचायत समिती व ग्राम स्तरावर ग्रामपंचायतीची स्थापना.

१९६३ - के. संथानम समिती - शिफारस केली की, पंचायतीस मर्यादित महसूल गोळा करण्याचा अधिकार असावा आणि राज्य पंचायत राज वित्त आयोग स्थापना केली जावी.

१९७१ - बोंगीरवार समिती - महाराष्ट्र राज्यातील पंचायत राज व्यवस्थेने विकासासंदर्भांत

सक्षमपणे काम करावे याचा अभ्यास आणि शिफारसी करण्यासाठी या समितीची स्थापना. महत्त्वाची समिती म्हणजे पंचायतराज व्यवस्था ही आर्थिकदृष्टया सक्षम होण्याची गरज.

१९७८ - अशोक मेहता समिती - जिल्हा पातळीवर पंचायतराज रचनेचे प्रशासकीय कार्यालय असावे आणि द्विस्तरीय पंचायतराज व्यवस्था जिल्हापातळीवर जिल्हा आणि गटपातळीवर एक असे दोन स्तर असावेत.

१९८५ - जी. व्ही. के. राव समिती - ग्रामीण विकास कार्यक्रमाचे नियोजन, अंमलबजावणी व त्याचे नियंत्रण करण्याची जबाबदारी पार पाडण्यासाठी गटविकास अधिकाऱ्यांच्या अधिकारात वाढ.

१९८६ - एल. एम. संघवी समिती - स्थानिक स्वराज्य संस्थांना घटनात्मक अधिकार आणि ग्रामसभा (ग्रामविधान परिषद ३) चे स्वरुप, विकेंद्रीत लोकशाहीचा पाया.

१९८६ - पी. बी. पाटील समिती - महाराष्ट्रातील पंचायतराजची अंमलबजावणीचे मुल्यमापन आणि त्यानुसार शिफारसी करण्याकरीता ही समिती गठीत पंचायतराज संस्था या स्वायत्त स्वयंपूर्ण व आर्थिकदृष्टया सक्षम कराव्यात तसेच या संस्था जिल्हापातळीपर्यंतचा कारभार सक्षमपणे पाहू शकतील असा त्यांचा गुणात्मक विकास व्हावा या महत्वाच्या शिफारसी.

१९९३ - भारतीय संविधानात ७३ वी घटनादुरुस्ती - संविधानानुसार जिल्हा, गट व ग्रामपातळीवर पंचायतीची घटनेद्वारे निर्मिती व पंचायतराज व्यवस्था भाग ९ द्वारे संविधानात समाविष्ट. संविधानाच्या ११ व्या परिशिष्टात राज्यांनी पंचायतीराज संस्थांना २९ विषयाचे कार्य हस्तांतरीत करण्याची शिफारस.

१९९६ - अनुसूचित क्षेत्र पंचायत विस्तार अधिनियम १९९६ ची निर्मिती या अधिनियमाच्या ५ व्या अनुसूचीत : अनुसूचित क्षेत्र म्हणून घोषित केलेल्या भागाला स्वशासनाचे अधिकार.

२००४ - पंचायतराज मंत्रालयाची केंद्रात निर्मिती

२००९ - तेराव्या वित्त आयोगाने शिफारस केली की केंद्रीय महसूलात पंचायतीचा वाटा असावा.

## ७३ वी घटनादुरुस्तीपर्यंतची वाटचाल

इ.स.१८८२ साली, स्वातंत्र्यपुर्व लॉर्ड रिपन याने सत्तेच्या विकेंद्रीकरणाची सुरुवात केली. स्वातंत्र्योत्तर काळात पंचायतराज व्यवस्थेचा अभ्यास करुन शिफारसी करण्यासाठी अनेक समित्या स्थापन केल्या गेल्या. त्या समित्यांची नावे, त्यांच्या शिफारसी इ.स. सहित वरती स्पष्ट करण्यात आल्या आहेत. या समित्यांनी केलेल्या शिफारसींचा काही भाग स्विकारला गेला. प्रत्येक वेळी राज्यांनी पंचायतराज संस्थांवर ग्रामीण विकासाची अधिक जबाबदारी टाकली. ती जबाबदारी पूर्ण करण्यासाठी आर्थिक व प्रशासकीय अधिक अधिकाराची गरज होती. ती काही प्रमाणात पूर्ण करण्याचा प्रयत्न झाला. एका ग्रामसेवकाकडे प्रभावीपणे काम करण्यासाठी किती ग्रा.पंचायत असाव्यात याचाही विचार झाला. गटपातळीवर गटविकास अधिकारी हे पद निर्माण करण्यात आले. गटविकास अधिकाऱ्यांच्या अधिकारात वाढ केली जावी असे सन १९८५ ला बलवंतराय समितीने म्हटले ग्रामसभा आवश्यक म्हणून व त्यात काही महत्वाच्या गोष्टी ठरवील्या जाव्यात यास देखील व्यवहार्य स्वरुप देण्यात आले. त्या माध्यमातून गावाच्या अगदी शेवटच्या महिला व पुरुषाला निर्णय प्रक्रियेत सहभागी होता यावे यासाठीच्या या शिफारसी करण्यात आल्या.

सन १९८६ मध्ये सिंघवी समितीने शिफारस केली की पंचायतराज संस्थांना घटनात्मक दर्जा असावा. ग्रामसभेचे स्वरुप तर राज्यपातळीवर असणाऱ्या विधिमंडळाप्रमाणे गाव पातळीवर असावे. विकेंद्रीकरण इतके सक्षम असावे अशी शिफारस केली. दुसऱ्या शब्दांत पंचायतराज व्यवस्थेचे असलेले अस्तित्व घटनामान्य व परिदृढ असावे. कोणाच्यातरी लहरीनुसार ते सहज बदलता येणारे असू नये.

## ७३ व्या घटनादुरुस्तीतील महत्वाच्या तरतूदी

७३ व्या घटनादुरुस्तीतील तरतूदींमुळे पंचायतीराज चे चित्र अधिक स्पष्ट झाले.

**कारण:-** बदल/ तरतूद करण्यामागच्या कारणाचे स्पष्टीकरण

**स्वरुप:-** तरतूदीचे स्वरुप

**परिणाम:-** ७३ व्या घटनादुरुस्तीने आजपर्यंत (२०१६) म्हणजे मागील २२ वर्षाच्या काळात कोणते राजकीय, सामाजिक, आर्थिक बदल झाले.

**तरतूद १:- पंचायतराज संस्थांना (जिल्हा परिषद, पंचायत समिती व ग्रामपंचायत) घटनात्मक दर्जा**

- **कारण:-** ७३ व्या घटनादुरुस्तीपूर्वी पंचायतराजचे अस्तित्व, राज्य सत्ताधिशांच्या इच्छाशक्तीवर होते. ही घटनादुरुस्ती होण्यापूर्वी, अगदी पंचायतराज व्यवस्था चांगली आहे असे असणाऱ्या राज्यात देखील पंचायतराजच्या निवडणुका १० ते १२ वर्षांनी होत होत्या. पंचायतराज व्यवस्थेस सक्षम करण्यासाठी ही स्थिती चांगली नव्हती. तिच्यातील सातत्य त्यामुळे संपत होते. लोकप्रतिनिधी शिवाय पंचायतराज व्यवस्था म्हणजे या व्यवस्थेच्या मूळ हेतूचाच पराभव. ही स्थिती संपविणे आवश्यक होते. त्यासाठी घटनेतच तरतूद आवश्यक होती. घटनादुरुस्ती केल्यानेच सर्व राज्यांमध्ये पंचायतराज व्यवस्थेचे किमान स्वरुप आकारास येऊ शकते कारण ते ऐच्छिक न राहता ते प्रत्येक राज्यावर बंधनकारक होते. म्हणून पंचायतराज घटनात्मक दर्जा देणे क्रमप्राप्त व आवश्यक झाले होते. त्याकरीता भारताच्या असलेल्या घटनेत (संविधान) दुरुस्ती करुन पंचायतराज करीता स्वतंत्र स्थान देण्यात आले ज्याला ७३ वी घटनादुरुस्ती म्हणून ओळखले जाते.
- **स्वरुप:-** ७३ वी घटनादुरुस्ती झाल्याने पंचायतराज व्यवस्था सर्व राज्यांमध्ये समान पध्दतीने लागू झाली व बंधनकारक झाली. तसेच पंचायतराज व्यवस्थेचा मुलभूत ढाचा ठरविण्यात आला. जसे पंचायतराज संस्थांमध्ये निर्वाचित समिती असणे संविधानाने बंधनकारक केले व त्यामुळे स्थानिक लोकांचा सहभाग वाढला. यालाच पंचायतराज व्यवस्थेस घटनात्मक दर्जा प्राप्त झाला असे म्हटले गेले.
- **परिणाम:-** १९९४ पासून, म्हणजे ७३ वी घटनादुरुस्ती झाली तेव्हापासून केंद्र शासन किंवा राज्य शासन बदलले तरीही घटनेनुसार प्रस्थापित पंचायतराज व्यवस्था कायम राहिली. त्यात पंचायतराजच्या मुलभूत ढाच्यात केंद्र व राज्य शासनात होणाऱ्या बदलांचा

परिणाम झाला नाही. या सातत्यामुळे जनमाणसाला पंचायतराज व्यवस्थेची ओळख होऊ लागली. निर्वाचित सभासद जिल्हा परिषद, पंचायत समिती किंवा ग्रामपंचायत स्तरावर नियमितपणे असतात. स्थानिक प्रश्नांचा विचार करुन उपलब्ध निधी व संसाधनांच्या आधारावर स्थानिक पातळीवर निर्णय घेण्याच्या प्रक्रियेला सुरुवात झाली. विकेंद्रीकरण हे अर्थपूर्ण झाले. स्थानिक लोकप्रतिनिधीच्या हातात अधिकार राहण्यास सातत्य राहीले. हा ७३ व्या घटनादुरुस्तीचा परिणाम आहे.

### तरतूद २:- पंचायतीराज संस्थांच्या नियमित निवडणुका

- **कारण:-** ७३ व्या घटनादुरुस्तीपूर्वी पंचायतराजसाठी निवडणुका घ्याव्यात असे अधिनियमात होते पण ते बंधनकारक किंवा घेतल्याच पाहीजे असे घटनात्मक बंधन मात्र नव्हते. त्याचा परिणाम पंचायतराजच्या निवडणुका मुदत संपल्यावरही होत नव्हत्या. ही परिस्थिती अनेक राज्यात समान होती या परिस्थितीत बदल करणे व सर्व राज्यांमध्ये समान नियमित निवडणुका होणे आवश्यक होते. म्हणून त्यासाठी घटनेतच तशा प्रकारची बंधनकारक करणारी तरतूद आवश्यक होती, घटना दुरुस्ती आवश्यक होती.

- **स्वरुप:-** ७३ व्या घटनादुरुस्तीतील संविधान तरतूदीमुळे पंचायतराज संस्थांच्या निवडणुका दर ५ वर्षांनी घेणे बंधनकारक करण्यात आले. याव्यतिरिक्त एखादी पंचायत बरखास्त केल्यास लवकरात लवकर किंवा कोणत्याही स्थितीत ६ महिन्यात निवडणुका घ्याव्यात अशी घटनेत तरतूद केली आहे.

- **परिणाम:-** १९९४ पासून पंचायतराजच्या निवडणुका सतत ५ वर्षांनी होत आहेत. निर्वाचित प्रतिनिधीमध्ये सातत्य निर्माण झालेले आहे. ग्रामीण नेतृत्वाचा वर्ग निर्माण होण्याच्या प्रक्रियेत गती निर्माण झालेली आहे. ग्रामीण भागात अभिसरण होते आहे. सातत्याने प्रश्नांच्या बाजूने आणि विरोधात चर्चा होत आहे. अभिसरणात सातत्याने समाज असल्याने चांगले नेतृत्व निर्माण होण्याची प्रक्रिया सुरु होते. त्यापासून सक्षम ग्रामपंचायती निर्माण होतात व इतर ग्रामपंचायतींना प्रेरणा मिळते.

### तरतूद ३:- राज्य स्तरावर स्वतंत्र निवडणुक आयोगाची स्थापना

- **कारण:-** ७३ व्या घटनादुरुस्तीपुर्वी पंचायतराज लोकप्रतिनिधी निवडणूकीसाठी स्वतंत्र यंत्रणा नव्हती. त्यामुळे निवडणुका झाल्या तरी लोकशाहीस अपेक्षित परिणाम होत नव्हता. त्यामध्ये मोठया प्रमाणात त्रुटी असून पंचायतराजची निवडणुक प्रक्रियेमुक्त सचोटीची असण्याची होती. त्यासाठी घटनेत बदल करणे आवश्यक होते.
- **स्वरुप:-** ७३ व्या घटनादुरुस्तीने पंचायतराज संस्थांच्या निवडणुका घेण्यासाठी राज्य निवडणुक आयोगाची स्थापना करण्याची तरतूद केली.
- **परिणाम:-** राज्य निवडणुक आयोगाचे स्वरुप घटनात्मक असल्यामुळे व स्वायत्तता असल्यामुळे निवडणुका आयोजित करण्यामधील सातत्य, मुक्त वातावरण व निरपेक्षता यामध्ये गुणात्मक फरक झालेला दिसून येतो.

### तरतूद ४:- पंचायतराज संस्थांमधील आरक्षणाच्या तरतूदीमुळे सर्व घटकांचे प्रतिनिधित्व व सहभाग

- **कारण:-** ७३ व्या घटनादुरुस्तीपुर्वी पंचायतराज व्यवस्थेने भौगोलिक विकेंद्रीकरण केले होते. कोणत्याही एका ठिकाणी (भौगोलिक अर्थाने) सत्ता केंद्रित झालेली नव्हती. पण सामाजिक अर्थाने ती एकवटलेली होती. विशिष्ट, मोजक्या समाज घटकांच्या हातात सत्ता वर्ग झाली होती. समाजातील अनेक कमकुवत घटक, पंचायतराज व्यवस्थेत सहभागी नव्हते. पंचायतराज व्यवस्थेला सर्व समाज घटकांना निर्णय प्रक्रियेत सहभागी करुन घ्यावयाचे होते, यासाठी सामाजिक विकेंद्रीकरण करणे आवश्यक होते. ज्या समाज घटकांना संधी मिळाली नाही त्यांना ती मिळाली पाहिजे व त्यांचे प्रतिनिधित्व हे निश्चित स्वरुपाचे असावे म्हणून त्यांच्या राखीव जागांची तरतूद आरक्षणाच्या माध्यमातून करणे आवश्यक होते यासाठी घटनादुरुस्ती करणे आवश्यक होते.

- **स्वरुप :- ७३ व्या घटनादुरुस्तीने समाजातील ३ घटकांसाठी आरक्षणाची तरतूद केली.**

  **एक -** अनुसूचित जाती व अनुसूचित जमातींना त्यांच्या समाजातील लोकसंख्याच्या प्रमाणातआरक्षण.

  **दोन -** इतर मागास प्रवर्गाला (OBC) २७ टक्के आरक्षणाची तरतूद.

  **तीन -** महिलांसाठी ७३ व्या घटनादुरुस्तीने राष्ट्रीय पातळीवर ३३ टक्के आरक्षणाची तरतूद करण्यात आली. महाराष्ट्राने पुढाकार घेऊन महिलांसाठी ५० टक्के आरक्षणाची तरतूद केली आहे. म्हणजे अनुसूचित जाती व अनुसूचित जमातींना त्यांच्या एकूण लोकसंख्येच्या प्रमाणातील जागांपैकी ५० टक्के जागा या महिलांसाठी राखीव असतील. तर मग इतर मागास प्रवर्गाच्या एकूण जागांपैकी ५० टक्के जागा महिलांसाठी राखीव असतील आणि खुल्या वर्गात असलेल्या एकुण जागांपैकी ५० टक्के जागा महिलांसाठी राखीव असतील.

- **परिणाम:-** समाजातील कमकुवत घटक (अनु. जाती/ जमाती, इतर मागास प्रवर्ग, व महिला) प्रतिनिधी झाले, पदाधिकारी झाले व निर्णय प्रक्रियेत सहभागी झाले. प्रामुख्याने महिला ज्यांना पंचायतराज व्यवस्थेत नगण्य स्थान होते, त्यांची संख्या महाराष्ट्रात तर लोकसंख्येच्या प्रमाणात व काही ठिकाणी त्यापेक्षाही अधिक झाली. महिलांना त्यांच्यातील व्यवस्थापन कौशल्ये दाखविण्यास संधी मिळाली.

  **आरक्षणामुळे सर्व घटकांचे प्रतिनिधीत्व हे पदाधिकारी म्हणून जिल्हा परिषद, पंचायत समिती, ग्रामपंचायत व विविध समित्यांवर जिल्हा परिषद अध्यक्ष/ उपाध्यक्ष , सभापती / उपसभापती, सरपंच/ उपसरपंच, सदस्य इ. निर्णय प्रक्रियेत महत्त्वाच्या पदस्थानी बसले.**

## तरतूद ५:- राज्य वित्त आयोगाची स्थापना

- **कारण:-** पंचायतराज व्यवस्था अस्तित्वात आल्यानंतर ग्रामीण भागाच्या विकासाची जबाबदारी पं. समिती संस्थांवर टाकली गेली. परंतु ग्रामपंचायतीचे उत्पन्न व

ग्रामपंचायतीला मिळणारा निधी विकास कामांसाठी अपुरा होता. त्याचा परिणाम आर्थिक शक्तीशिवाय मोठी जबाबदारी (Responsibility without Economic Power) अशी स्थिती ग्रामपंचायत पातळीवर निर्माण झाली. इच्छा असून देखील ग्रामपंचायत नेतृत्व हतबल झाले त्यास आर्थिक सक्षम करावे असे बोंगीरवार समितीने म्हटले तसेच पी. बी. पाटील समितीनेही तशीच शिफारस केली. हे करण्यासाठी घटनात्मक तरतूदीची गरज होती.

- **स्वरुप:-** ७३ व्या घटनादुरुस्तीने राज्य वित्त आयोगाची स्थापना करण्यात आली.
- **परिणाम:-** वित्त आयोगामुळे विकासासाठी किती पैसा गरजेचा आहे तो कसा गोळा करावा, ग्रामपंचायतीस कोणत्या पध्दतीने दिला जावा याचे निश्चितीकरण झाले. परिणामत: १९९४ नंतर ग्रामपंचायतीस विकासासाठी वाढीव निधी मिळण्यास सुरुवात झ ाली. काही प्रमाणात पंचायत राज व्यवस्थेचे आर्थिक सक्षमीकरण झाले. महाराष्ट्रात १९९४ नंतर ग्रामपंचायतीद्वारे गावांचा झालेला विकास १९६२ ते १९९४ च्या तुलनेत बराच बोलका आहे. ७३ वी घटनादुरुस्ती त्यासाठी महत्त्वाची आहे.

**तरतूद ६:- ग्रामसभा**

- **कारण:-** सत्तेचे विकेंद्रीकरण म्हणजे केवळ ग्राम पातळीवर निवडून आलेल्या लोकप्रतिनिधींचाच सहभाग नाही तर ज्यांनी त्यांना निवडून दिले त्या लोकांना देखील त्या पातळीवर निर्णय प्रक्रियेत सहभागी करुन घेणे. असे व्यासपीठ निर्माण करुन देण्याची गरज होती. घेतलेल्या निर्णयाचे प्रतिनिधीत्व करण्याची जबाबदारी ही लोकप्रतिनिधीची असेल व यासाठी लोकप्रतिनिधींची जबाबदारी व उत्तरदायीत्व निर्माण करण्यासाठी घटनादुरुस्तीची आवश्यकता होती.
- **स्वरुप:-** ७३ व्याघटनादुरुस्तीने ग्रामसभांची स्थापना बंधनकारक करण्यात आली. महाराष्ट्रात आज वर्षातून किमान ४ ग्रामसभा बोलावणे बंधनकारक करण्यात आले आहे. ग्रामसभा म्हणजे ग्रामविधिमंडळ असेही संबोधण्यात आले.

- **परिणाम:-** ग्रामसभेचा दृश्य परिणाम ज्या गावात ग्रामसभेची प्रथा सुरु झालेली आहे तेथे दारिद्रयरेषेखालील खरोखरच पात्र लाभार्थी म्हणून निवड होत आहे. विकासाची प्राथमिकता निश्चित केली जात आहे. पारदर्शकतेला सुरुवात झालेली आहे. प्रतिनिधी मालक नाही तर विश्वस्थ ही भावना वाढीस लागलेली आहे. पंचायत संस्थेच्या माध्यमातून विकेंद्रीकरणाची सुरुवात निश्चितपणे झाली आहे. ७३ व्या घटनादुरुस्तीचे हे फलीत आहे.[५]

## १.३ पंचायती राज : त्रिस्तरीय व्यवस्था

### जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम १९६१ - महत्त्वाच्या तरतूदी.

**१. जिल्हा परिषदेची स्थापना:-** महाराष्ट्रात १९६१ च्या जिल्हा परिषदा आणि पंचायत समित्या अधिनियमानुसार जिल्हा परिषदांची स्थापना करण्यात आली. महाराष्ट्रात एकूण ३६ जिल्हे असून मुंबई आणि मुंबई उपनगराचा भाग वगळता ३४ जिल्हयामध्ये जिल्हा परिषदा अस्तित्वात आहेत. प्रत्येक जिल्हयासाठी जिल्हा परिषदा अध्यक्ष व सदस्य यांची मिळून तयार होणारी बॉडी म्हणजेच जिल्हा परिषद होय. मुंबई आणि मुंबई उपनगराचा भाग वगळता प्रत्येक जिल्हयासाठी एक जिल्हा परिषद आहे. जिल्हा परिषद ही इमारत नसून लोकांनी निवडून दिलेल्या लोक प्रतिनिधींची संविधानिक पीठ (बॉडी) आहे. असा जिल्हा परिषदेचे कामकाज जिल्हा परिषद, पंचायत समिती अधिनियम १९६१ या कायद्याने चालते. जिल्हा परिषद या अधिनियमाने दिलेले सर्व अधिकार, कर्तव्य, जबाबदाऱ्या यांचे पालन करते. म्हणून जिल्हा परिषद तिच्या नियंत्रणातील क्षेत्रासाठी म्हणजे महानगरपालिका आणि नगरपालिका असलेली शहरे वगळून जिल्हयाचा बाकी सर्व भाग त्यांच्या कक्षेत येतो. उदा. पंचायत समित्या, ग्रामपंचायती व गावे यांच्या विकास कामांसाठी जबाबदार व उत्तरदायी संस्था आहे. जिल्हा परिषदेवर या कायद्यात दिलेली व राज्य शासनाने वेळोवेळी अधिसूचनेने काढलेली कामे किंवा जबाबदारी पूर्ण करण्यासाठी जबाबदार व प्रमुख संस्थेचा दर्जा देण्यात आला आहे.

**२. जिल्हा परिषदेची रचना**

जिल्हा परिषद खालीलप्रमाणे बनवली जाते :

क) जिल्हा परिषद मतदार संघातून सार्वत्रिक निवडणूकाच्या माध्यमातून निवडलेले किमान परंतू जास्तीत जास्त ७५ सदस्य असतात.

ख) जिल्हयातील सर्व पंचायत समितींचे सभापती, (पदसिध्द सदस्य)

**३. जिल्हा परिषदेचा कार्यकाल व निवडणूक**

महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समित्या अधिनियम १९६१ या कायद्याने जिल्हा परिषदेचा कार्यकाल ५ वर्षाचा आहे. जिल्हा परिषद सदस्यांना आपल्या मतदार संघातून/ गणातून आपली निवडणूक लढवावी लागते. निवडणूकीसाठी त्याला जिल्हा परिषद गावातून उभे राहावे लागते. अशा जिल्हा परिषद गटरचना ही जिल्हा निहाय वेगळी असते. सध्या अंदाजे १० ते १२ ग्रामपंचायतींचा मिळून १ जिल्हा परिषद गट आहे. साधारणपणे ३५ हजार लोकसंख्येला १ जिल्हा परिषद सदस्य निवडला जातो. लोकसंख्येच्या प्रमाणात अनुसूचित जाती, अनूसूचित जमाती आणि इतर मागास प्रवर्गासाठी काही जागा राखीव आहेत. तसेच महाराष्ट्रात महिलांसाठी ५० टक्के आरक्षण आहे. निवडून आलेला नेता हा त्या प्रभागाचा प्रतिनिधी असल्याने त्याने गटाच्या प्रश्नांना व अडचणींना केंद्रस्थानी ठेवून काम करावयाचे आहे.

**४. महाराष्ट्रातील प्रतिनिधित्वाचे स्वरुप:-**

पंचायत समिती सदस्य हे त्यांच्या गणातील ग्रामपंचायतीचे प्रतिनिधी आहेत. म्हणजेच ते अप्रत्यक्षपणे त्या ग्रामपंचायतीतील सरपंचांचे प्रतिनिधी असतात याप्रमाणेच जिल्हा परिषद गट सदस्य हा पंचायत समिती सदस्यांचा देखील अप्रत्यक्ष प्रतिनिधी आहे. प्रतिनिधिंचा या रचनेने समस्या व अडचणी अधिक जलद गतीने मांडणे सोपे आहे.

**५. जिल्हा प्रशासकीय नियंत्रण :-**

मुख्य कार्यकारी अधिकारी हे जिल्हा परिषदेतील ग्रामीण विकासाचा प्रशासकीय प्रमुख म्हणून कार्य करतात. तर जिल्हाधिकारी हे जिल्हयाचे प्रमुख म्हणून कार्य करतात. मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्याकडे जिल्हा परिषदेची कार्यकारी सत्ता असल्याने त्यांना विशेष महत्त्वाचे स्थान

आहे. ते जिल्हा परिषदेच्या विविध समित्यांना मार्गदर्शन करुन जिल्हयातील विकास योजनांवर लक्ष ठेवतात. विकास योजना राबविण्याची जबाबदारी ही पदाधिकारी आणि कर्मचारी यांचे दोघांचे संयुक्तिक आहे त्यामुळे दोघांमध्ये समन्वय असायला हवा असा उत्तम समन्वय त्यांच्यात असेल तर जिल्हयाचा विकास अधिक जलद गतीने होतो.

**लोकप्रतिनिधी - महिला आरक्षण / पदाधिकारी खालील आरक्षण सर्व स्तरावर समान आहे.**

| **पदे व राखीव जागा** | **महिलांसाठी राखीव जागा** | **अनु. जाती - जमाती** | **इतर मागास प्रवर्ग** | **खुला वर्ग** |
|---|---|---|---|---|
| जिल्हा परिषद सदस्य<br>↓<br>उपाध्यक्ष<br>↓<br>जिल्हा परिषद<br>↓<br>सभापती<br>↓<br>उपसभापती<br>↓<br>पंचायत समिती सदस्य<br>↓<br>उपसरपंच<br>↓<br>ग्रामपंचायत सदस्य | -१ टक्के राखीव ५० किंवा २/ जागा<br>- लोकसंख्येच्या प्रमाणात अनु. जाती व जमातीना राखीव<br>- मागास वर्गाला २७ टक्के आणि महिलांना ५० टक्के | लोकसंख्येच्या प्रमाणात राखीव जागा म्हणजे एकूण जागांच्या १/४ किंवा २५ टक्के जागा राखीव असतील. | २७ टक्के राखीव जागा | उर्वरित जागांकरीता खुल्या, इतर मागासवर्गीय, अनु, जाती जमाजी असे सर्व प्रवर्गातील ज निवडून येतात असे सदस्य राहतील. |

**जिल्हा परिषदेच्या विविध समित्या**

i. स्थायी समिती
ii. कृषी समिती
iii. पशुसंवर्धन समिती
iv. समाजकल्याण समिती
v. शिक्षण आणि क्रिडा समिती
vi. आरोग्य समिती
vii. बांधकाम समिती

viii. महिला व बालकल्याण समिती

ix. अर्थ समिती

x. जलव्यवस्थापन आणि पेयजल समिती

## १.४ ग्रामपंचायत

गावाचे महत्त्व विषद करणारी ग्रामगीतेतील ओवीत राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांनी गावाला विश्वाचा नकाशा म्हणून संबोधले. या विश्वात प्रगती, शांतता आणायची असेल तर गावाला आणि गावातील माणसाला केंद्रस्थानी ठेवावे लागेल.

पंचायतराज मधील सर्वात खालच्या स्तरावर गाव पातळीवर ग्रामपंचायत या महत्वपूर्ण संस्थेची स्थापना करण्यात आली आहे. ग्रामपंचायत हा पंचायतराजचा पायाभूत घटक आहे. स्थानिक गरजा व उपलब्ध साधनसंपत्तीच्या आधारे गावाच्या विकासाचे नियोजन करण्याचे संपूर्ण स्वातंत्र्य ग्रामपंचायतींना प्राप्त झाले आहे. ग्रामीण अर्थव्यवस्थेमध्ये अमूलाग्र बदल घडवून आर्थिक विकास व सामाजिक न्यायाच्या प्रक्रियेमध्ये जनतेचा सहभाग वाढविणे हे आता शक्य झ ाले आहे. महाराष्ट्रात १९५८ च्या मुंबई ग्रामपंचायत अधिनियमानुसार ग्रामपंचायतींची स्थापना करण्यात आली आहे. ग्रामपचायतींची स्थापना करताना लोकसंख्या, उत्पन्न, भौगोलिक रचना यांचा विचार केला जातो.

**१. महाराष्ट्रात ग्रामपंचायत स्थापन करण्यासाठीचे निकष :-**

ग्रामपंचायतीचे विभाजन करुन स्वतंत्र ग्रामपंचायत स्थापन करणे अथवा नवीन ग्रामपंचायती स्थापन करण्याच्या कार्यपध्दतीबाबत शासनाने सर्वसमावेश आदेश ग्रामविकास विभाग क्र.व्हीपीएम-११८९/प्र.क्र.३०१०/२२, दि.०५ फेब्रुवारी २००९ च्या परिपत्रकान्वये दिले आहेत. या परिपत्रकानुसार ग्रामपंचायत स्थापन करण्यासाठी खालील निकष निश्चित करण्यात आले आहेत.

I) नवीन ग्रामपंचायत स्थापन करावयाचा गावाची लोकसंख्या सर्वसाधारण भागासाठी ६०० आणि

आदिवासी व डोंगराळ भाग असल्यास आणि दोन गावात वाडी किंवा तांडा यामध्ये अंतर असल्यास लोकसंख्या ३०० असावी.

II) गाव हे महसुली गाव असले पाहिजे.

III) नवीन ग्रामपंचायतीची प्रतिवर्षी दरडोई रु. १०/- खर्च करण्याची (पाणीपुरवठा, रस्ते दुरुस्ती, दिवाबत्ती इ. साठी) आर्थिक क्षमता असली पाहिजे. आदिवासी भागासाठी दरडोई खर्च रु. ०६/- आवश्यक आहे.

IV) गावातील रहिवासी, यांनी स्वतंत्र ग्रामपंचायतीची मागणी करणेआवश्यक आहे.

**२. ग्रामपंचायतीचा कार्यकाल:-**

ग्रामपंचायतीचा कार्यकाल हा ५ वर्षांचा आहे. मात्र अपरिहार्य परिस्थितीत ग्रामपंचायत बरखास्त करण्याचा अधिकार राज्यशासनास आहे.

**३. ग्रामपंचायतीची निवडणूक :-**

- ग्रामपंचातीचा ५ वर्षाचा कार्यकाल पूर्ण होण्याच्या सहा महिने अगोदर निवडणूक अधिकारी नेमले जातात व ते ग्रामपंचातीच्या निवडणूका घेतात.
- वयाची २१ वर्षे पूर्ण झालेली, गावात मतदानाचा हक्क असणारी कोणतीही व्यक्ती निवडणूकीस उभी राहू शकते.
- गावाच्या हद्दित राहणाऱ्या प्रत्येक १८ वर्षे पूर्ण केलेल्या स्त्री-पुरुष नागरिकास मतदानाचा अधिकार असतो.
- एक व्यक्ती एकापेक्षा जास्त वॉर्डातून उमेदवार म्हणून उभी राहू शकते. त्यासाठी छापील फॉर्म निवडणूक अधिकाऱ्याकडे मिळतो.
- सर्वसाधारण जागेवर उभे राहण्यासाठी रु ५०/- भरावे लागतात तर राखीव जागेवर उभे राहण्यासाठी रु १०/- भरावे लागतात, त्याची पावती मिळते.
- उमेदवारी अर्ज मागे घेण्यासाठी ठराविक दिवसांची मुदत दिलेली असते, त्याच्या आत अर्ज मागे घेता येतो, त्यासाठी लेखी अर्ज करावा लागतो.

- निवडणूक अधिकारी उमेदवारांची यादी जाहीर करतात व निवडणूक चिन्हे देण्यात येतात.
- ग्रामपंचायत निवडणूक कोणत्याही राजकीय पक्षाच्या नावावर किंवा त्या पक्षाच्या चिन्हावर लढविता येत नाही.
- प्रत्येक उमेदवारास जास्तीत जास्त ५ हजार पर्यंतच खर्च करण्याची परवानगी असते.

**४. ग्रामपंचायतीची रचना:-**

| | |
|---|---|
| सरपंच | ग्रामपंचायतीचा सरपंच हा ग्रामपंचायतीचा कार्यकारी प्रमुख असतो. |
| उपसरपंच | सरपंचाच्या अनुपस्थितीत उपसरपंच कारभार पाहतो व सरपंचाचा सहकारी म्हणून कार्य करतो. |
| ग्रामपंचायत सदस्य | ग्रामपंचायत सदस्य हे आपापल्या वॉर्डाचे प्रतिनिधित्व करतात व वॉर्डाच्या समस्या या ग्रामसभेसमोर मांडणे व समस्या सोडवण्याचा ते प्रयत्न करतात. |
| शासकीय कर्मचारी | ग्रामसेवक हा ग्रामपंचायतीचा प्रशासकीय सेवक / कर्मचारी असतो. |
| ग्रामसभा | १८ वर्षावरील ग्रामपंचातीतील मतदान यादीतील सर्व ग्रामस्थ |
| ग्रामपंचायतीतील ग्रामस्थ | ग्रामपंचायत हद्दीतील सर्व रहिवासी ग्रामस्थ |

**५. ग्रामपंचायतीच्या समित्या व त्यांची कामे:-**

ग्रामपंचायतीला या सर्व विषयावर तपशिलवार काम करणे शक्य होत नाही म्हणून गाव पातळीवर विविध विषयांशी निगडीत समित्या स्थापन केल्या जातात. या समित्या दोन प्रकारच्या आहेत.

**I. ग्रामविकास समित्या :-**

संविधानानुसार पंचायतीराज संस्थांना हस्तांतरीत केलेल्या २९ विषयांपैकी कोणत्याही विषयावर गाव पातळीवर स्थापन केलेल्या समित्या (उदा. शाळा व्यवस्थापन समिती, आरोग्य, पोषण, पाणीपुरवठा व स्वच्छता समिती इ.) ग्रामविकास समित्या होय, पंचायतीराजला हस्तांतरीत केलेल्या २९ विषयांची विकास कामे वेळचे वेळी आणि योग्य प्रकारे व्हावीत यासाठी ग्रामपंचायतीला समित्या स्थापन करता येतात. अशा समित्या

संबंधित विषय व कार्ये याबाबत पंचायतीशी विचार विनिमय करुन, पंचायतीच्या ठरावाने स्थापन करण्यात येतात. या ठरावात खालील बाबींचा समावेश असतो.

- प्रत्येक समितीचे नाव
- समितीकडे द्यावयाची कामे
- त्याबाबत समितीचा अधिकार
- कामे करण्याची पध्दत
- समितीचे अध्यक्ष
- समितीचे सदस्य

प्रत्येक वेळी ग्रामपंचायतीची नवीन निवडणूक झाल्यानंतर सरपंचाच्या अध्यक्षतेखाली ग्रामपंचायतीच्या सभेत गाव समित्या निवडल्या जातात. त्याचे अध्यक्ष व सदस्य यांची नावे तिथेच निश्चित केली जातात. त्याचप्रमाणे त्यांची कामाचे स्वरुपही ठरविण्यात येते. कामावरुन समित्यांना नावे दिली जातात. ग्रामविकास समितीचे तपशिल पुढील प्रमाणे आहेत.

**A. सदस्यत्व**

- प्रत्येक समितीमध्ये सर्वसाधारणपणे ग्रामपंचायतीचे ३ ते ५ सदस्य असतात.
- अशा समित्यांमधील सदस्य संख्या बारापेक्षा कमी नसेल आणि चोवीसपेक्षा जास्त नसावी.
- या समित्यांचे ५० टक्के सदस्य महिला असतात.
- या समित्यांमध्ये ग्रामपंचायतीने निवडून दिलेले प्रतिनिधी व ग्रामस्थांचे प्रतिनिधी असतात.
- कामाच्या सोयीनुसार प्रत्येक समितीकरीता १ किंवा २ प्रकारे सदस्य निवडलेले असतात.
- एका सभासदाला एकापेक्षा जास्त समित्यांवर ही काम करता येते.
- अध्यक्ष ठरवील त्याप्रमाणे सभा घेतल्या जातात.

- सर्व समित्यांचे सचिव ग्रामसेवक असतात.

**B. जबाबदारी**

- अशा समित्यांनी ग्रामपंचायतींनी ठरवून दिलेली कर्तव्ये व कामेच पार पाडावीत.
- मुख्यत्वे करुन सोपविलेल्या कामाचे पर्यवेक्षण व नियंत्रण करण्याचे काम हया समित्यांनी करावेत.
- त्यांनी घेतलेले निर्णय हे ग्रामपंचायतीने घेतलेले निर्णय समजले जातात.

**C. कालावधी**

- अशा समित्यांची मुदत ग्रामपंचायती इतकीच असते.

**D. पुनर्रचना व बरखास्ती**

- समिती स्थापन करण्यासाठी जसा ठराव करावा लागतो तसा बरखास्त करण्यासाठीही ठराव करावा लागतो.
- ग्रामपंचायतीला एखाद्या समितीची पुनर्रचना करणे आवश्यक वाटले तर त्या समितीमध्ये पाहिजे तो बदल ग्रामपंचायतीला करता येतो.
- आवश्यकता नसेल तर अशी समिती बरखास्तही करता येते. त्यांच्या सर्व समित्यांची ठरावांची कार्यवाही ग्रामपंचायतीने करावयाची आहे.

**II. गाव समित्या**

वेळोवेळी शासन निर्णयाने शासकीय कार्यक्रम/ अभियानांतर्गत अथवा ग्रामपंचायतीच्या पुढाकाराने गावपातळीवर संबंधित बाबींचे कामकाज पाहण्यासाठी स्थापन केलेल्या समित्या गाव स्तरावरील समित्या म्हणून ओळखतात. (उदा. तंटामुक्ती समिती इ.)

**A. ग्रामसेवक :**

ग्रामपंचायतीचा कारभार पाहण्यासाठी ग्रामसेवकाची नेमणूक केली जाते. ग्रामसेवक हा ग्रामपंचायतीचा सचिव असतो. पंचायतीच्या सर्व कारभारावर त्याचे नियंत्रण असते. तो जिल्हा परिषदेचा सेवक असतो. त्याची नेमणूक मुख्य कार्यकारी अधिकारी जि.प. करतात. त्याची बदली

करण्याचा अधिकार जिल्हा परिषदेलाच आहे. काही वेळा ग्रामसेवकाकडे दोन किंवा तीन ग्रामपंचायतींची जबाबदारीही सोपविण्यात येते.

**B. ग्रामसेवकांची कामे व जबाबदाऱ्या :**

- **प्रशासन :**

- ग्रामपंचायतीकडील सर्व प्रकारचे अभिलेख जतन करणे, सरपंचाच्या मदतीने विकासाची काम पार पाडणे.
- महात्मा गांधी राष्ट्रीय रोजगार हमी योजनेतंर्गत ग्रामपंचायतीचे अभिलेख वेळोवेळी आवश्यक त्या नोंदी घेऊन अद्ययावत ठेवणे.
- पंचायतीने ठरवून दिल्यानंतर ग्रामसभा, मासिक सभा बोलावणे, नोटिसा काढून संबंधींतांना देणे, सभेचा कार्यवृत्तांत लिहिणे व सभेमध्ये झालेल्या निर्णयाची अमलबजाणी व पूर्तता करणे, हे काम पंचायतीच्या सहकाराने करावे.
- शासनाने व जिल्हा परिषदेने बसविलेले विविध कर (वसूल करण्याबाबतचे आदेश सचिवांकडून प्राप्त झाल्यानंतर) व फी यांची वसूली करणे, प्रत्येकी चार वर्षांनी कराची आकारणी करुन २५ टक्के वाढ सूचविणे.
- ग्रामपंचायतीकडील लेखापरिक्षणात केलेल्या आक्षेपांना उत्तर देणे.
- ग्रामपंचायत हद्दीतील जमिनी, रस्ते, इमारती, पडसर जागा व इतर सावर्जनिक जागा यांच्या मोजमापाचे अभिलेख अद्ययावत ठेवणे, सनदी अभिलेख अद्ययावत ठेवणे व ग्रामदर्शक नकाशा ग्रामपंचायतीमध्ये ठेवणे.
- जन्म, मृत्यू, उपजत मृत्यू, विवाह नोंदणी करणे.
- ग्रामपंचायत क्षेत्रातील पंचायत सभासदांचा सहकार्याने ग्रामपंचायत क्षेत्रात कार्यरत असलेल्या सहकारी सोसायटया, दूध डेअरी, नागरी पतसंस्था, स्थानिक महिला मंडळे, तरुण मंडळे, बालवाडी, अंगणवाडी, प्राथमिक व माध्यमिक शाळा, स्वयंसेवी संस्था व इतर मान्य संस्था यांच्याशी समन्वय साधून, या सर्व लोकपयोगी कार्यक्रम बनविण्याच्या दृष्टीने प्रयत्न करणे.

- ग्रामपंचायत पातळीवर शासकीय, निम शासकीय, कर्मचाऱ्यांना आठवडयातून किमान १ दिवस ग्रामपंचायतीमध्ये एकत्र आणून ग्रामस्थांच्या प्रश्नांची सोडवणूक करण्याच्या दृष्टीने समन्वय साधून आवश्यक ती कार्यवाही करणे.
- सरपंच, उपसरपंच यांना सभेच्या वेळी व आवश्यकता असेल तर इतर वेळी कायदेविषयक सल्ला देऊन, आवश्यक असल्यास आपले मत नोंदविणे.
- ग्रामपंचायत काही नियमांची व कायद्यांचे उल्लंघन करणारी कृती करीत असेल किंवा तसे करावयाचे ठरविले असल्यास, त्याबाबत अहवाल मुख्य कार्यकारी अधिकारी / गटविकास अधिकारी यांना विहीत मुदतीत सादर करणे.
- ग्रामपंचायतीचा वार्षिक प्रशासन अहवाल तयार करुन पंचायत समितीस विहीत मुदतीत सादर करणे.
- निवडणूकांसाठी नियुक्त करण्यात आलेल्या निवडणूक आयोगाकडून वेळोवळी देण्यात आलेल्या सूचना व आदेश यांचे काटेकोरपणे पालन करणे.
- ग्रामपंचायतीच्या कार्यालयातील कर्मचाऱ्यांवर नियंत्रण व त्यांचे आस्थापना विषयक बाबीं उदा. सेवापुस्तक, वैयक्तिक नस्त्या परिपुर्ण ठेवणे, भविष्यनिर्वाह निधी, बोनस इ. शासनाच्या आदेशानुसार व नियमानुसार देणे.

- **नियोजन :**

- ग्रामपंचायतीचे सरपंच व सभासद यांचे सहकार्य घेऊन गावाचा विकास करण्याच्या दृष्टीने पंचवार्षिक योजनांचे नियोजन करणे. रोजगार उपलब्ध करण्याच्या दृष्टिने उद्योगधंद्यात वाढ करणे. पडीक जमिन लागवडीयोग्य करण्याच्या दृष्टिने जमीनीचा विकास करुन व सिंचन क्षमता वाढवून शेत जमीनीचे उत्पन्न वाढविण्याच्या दृष्टिने प्रयत्न करणे, रस्ते दुरुस्ती, डांबरीकरण, सांडपाण्यासाठी गटारे, परिसर स्वच्छता, पशुधन विकास, वैरण विकास, बालकल्याण योजना, साक्षरता मोहीम याबाबतीत शासनाकडून प्राप्त मार्गदर्शक सूचना व आदेश यानुसार कार्य करणे, जवाहर रोजगार योजनेअंतर्गत ग्रामपंचायतीचे उत्पन्न व इतर शासकीय व जिल्हा परिषदांकडून उपलब्ध होणारे व

अपेक्षित असलेले अनुदान याचा विचार करुन ग्रामपंचायतीचा पंचवार्षिक आराखडा तयार करणे.

- वार्षिक कृती आराखडा तयार करुन एप्रिलमध्ये होणाऱ्या ग्रामसभेपूढे ठेऊन ग्रामसभेची मान्यता घेणे.
- योजनांची अंमलबजावणी सुरळीतपणे होत असल्याबाबत लक्ष ठेवणे.

● **शेतीविषयक :**

- शासनाकडून तसेच जिल्हा परिषदेकडून वेळोवेळी जाहीर होणाऱ्या योजनांची माहिती प्राप्त करुन ती ग्रामसभा, मासिक सभा व इतर सार्वजनिक सभेमार्फत ग्रामस्थांपर्यंत पोहोचविणे व त्याबाबतची माहिती ग्रामस्थांना देणे, दारिद्रयरेषेखालील लोकांचे सर्वेक्षण करणे.
- ग्रामसभेपुढे कामाचे प्रस्ताव मान्यतेसाठी ठेवणे.
- प्रस्ताव मान्य झाल्यानंतर सदर प्रस्ताव खाते प्रमुख, तांत्रिक अधिकारी यांचेकडे मंजूरीसाठी पाठविणे, बांधकामावर देखरेख ठेवणे, कामाची पाहणी करुन मुल्यांकन प्रस्ताव तांत्रिक अधिकारी यांच्याकडे पाठविणे, महात्मा गांधी राष्ट्रीय रोजगार हमी योजनेअंतर्गंत निर्माण झालेल्या मालमत्तेची नोंदणी नोंदवहीत करणे व त्यावर देखरेख ठेवणे, सदर योजनेअंतर्गंत जमाखर्चाची माहिती ग्रामसेवक व सरपंच यांच्या सयुक्त सहीने ग्रामसभेपुढे ठेवणे.

● **कुटुंबकल्याण कार्यक्रम :**

- कुटुंबकल्याण कार्यक्रमातर्गंत शासनाकडून वेळोवेळी नवीन आलेल्या योजनांची माहिती
- ग्रामस्थांना देणे.

- **कल्याणकारी योजना :**
    1. महिला व बालकल्याण, समाज कल्याण, साक्षरता प्रसार, अंधश्रध्दा निर्मुलन कायदेविषय सहाय्य व सल्ला देणे. इ. योजनांबाबत ग्रामस्थांमध्ये जनजागृती करणे.
    2. तसेच या योजनांची अंमलबजावणीच्या दृष्टीने आवश्यक ती कार्यवाही करणे.
    3. पशुसंवर्धनाबाबत विविध योजनांची माहिती देणे व या योजनेसाठी प्रोत्साहन देणे.
- **संकीर्ण :**

- शुध्द पाणी पुरवठा योजना सुस्थितत ठेवणे, त्यांची दुरुस्ती व देखभाल करणे शुध्दीकरणासाठी आवश्यक औषधांचा पुरेसा साठा करणे, पाणी वाटपाचे नियोजन करणे, देखभाल व दुरुस्तीसाठी होणाऱ्या खर्चा इतकी पाणीपटटी बसविणे, त्याबाबतचा अहवाल पंचायतीला सादर करणे आणि त्यावर पंचायतीने केलेल्या आकारणी नुसार पाणीपटटी आणि विशेष पाणीपटटी वसूलची कार्यवाही करणे.
- पूर, दुष्काळ, भूकंप, टोळधाड, टंचाई, साथरोग इ. नैसर्गिक आपत्ती उध्दभविल्यास त्याबाबत त्वरीत संबंधित खात्याला कळविणे व ग्रामपंचायतीने आरोग्य खात्याच्या सहाय्याने प्राथमिक उपाययोजना करणे.

**C. सरपंचांचे मानधन:**

i. सरपंचांना ग्रामपंचायतीच्या उत्पन्नावर आधारित मानधन देण्यात येते.

ii. पंचायतीचा सरपंच, उपसरपंच धरुन पंचायतीच्या सदस्यांना त्यांनी केलेल्या प्रवासासाठी नेमून दिलेला प्रवासभत्ता आणि दैनिक भत्ता देण्याची कायदेशीर तजवीज करण्यात आली आहे. हा प्रवास पंचायतीच्या कामकाजा संबंधात असला पाहिजे. प्रवासभत्ता आणि

दैनिकभत्त्याचे प्रमाण ठरवून देण्यासाठी मुंबई ग्रामपंचायत सदस्य (प्रवास व दैनिक भत्ता) नियम, १९६६ केलेला आहे.

iii. पंचायतीच्या कामानिमित्त गावी येणारे सरकारी अधिकारी, मोठमोठया आसामी यांच्या आदर सत्काराचा, चहापाण्याचा खर्च करण्यासाठी १९९२ च्या कायद्याच्या सुधारणेप्रमाणे कलम ३३ अ नुसार पंचायतीच्या वार्षिक उत्पन्नाच्या २ टक्के किवा जास्तीत जास्त ६ हजार यापैकी जी कमी असेल ती रक्कम सरपंचांना अतिथीभत्ता म्हणून मिळणार आहे.

**D. ग्रामपंचायतीवर कारवाईचे ग्रामसभेला अधिकार:**

- आर्थिक गैरव्यवहार करणाऱ्या ग्रामपंचायतीमध्ये सरपंच आणि उपसरपंच यांच्या विरुध्द अविश्वासचा ठराव मांडून कारवाई करता येते.
- अविश्वास ठरावावर चर्चा करण्यासाठी आयोजित केलेल्या विशेष सभेचा पीठासीन अधिकारी किमान तहसीलदार दर्जाचा असेल. ग्रामपंचायती विरुध्द संमत झालेला अविश्वास ठराव तहसीलदार १० दिवसात विभागीय आयुक्तांकडे सभेच्या इतिवृत्तासह सादर करतील. ठराव मिळाल्यानंतर १ महिन्यात विभागीय आयुक्त अशी ग्रामपंचायत बरखास्त करतील.
- ग्रामसेवकाच्या मदतीस कारकून तसेच तत्सम सेवक वर्ग असतो. त्यांच्या मदतीने तो ग्रामपंचायतीचा कारभार पाहत असतो. ग्रामसेवकांची वेतनश्रणी शासनाने निश्चित केलेली आहे.

**E. विकासकामात सरपंच व ग्रामसेवक यांची भूमिका:**

ग्रामीण विकास कामामध्ये सरपंच आणि ग्रामसेवक यांची भूमिका ही अत्यंत महत्वाची आहे. दोघांनीही आपापल्या भूमिका समजावून घेऊन सहकार्याने, जबाबदाऱ्या पार पाडणे महत्वाचे आहे.

**F. ग्रामपंचायतीस मिळणारी काही सरकारी ठळक अनुदाने:**

- **जमीन महसूल अनुदान:**ग्रामपंचायत हद्दीतील जमीनीचा शेतसारा सरकार वसूल करते. या पोटी वसूल झालेल्या रकमेची मागील पाच वर्षांची सरासरी विचारात घेऊन दरसाल जमीन महसूल अनुदान म्हणून दिले जाते.
- **समानीकरण अनुदान:** जमीन महसूल अनुदान हे दरडोई १ रुपया प्रमाणे असते, परंतु लोकसंख्या जास्त असेल आणि महसूल अनुदान कमी असेल तर कमी पडणारी रक्कम ग्रामपंचायतीस देण्यात येते.
- **जमीन महसूल उपकर अनुदान:** सरकार जमीन महसूलावर उपकर वसूल करते. या महसूलावरील ग्रामपंचायत उपकर जि.प मूळ उपकर, जि. प. वाढीव उपकर, उपकरावर आधारित उपकर, सापेक्ष अनुदाने ही ग्रामपंचायतराज संस्थांची उत्पन्नाची महत्त्वाची साधने आहेत. ९३ सालापासून जि. प पंचायत समिती हददीत १ रुपया महसूलावर ५ रुपये वाढीव उपकर वसूल करण्यात येते. या अनुदानाशिवाय ग्रामपंचायतीला मुद्रांक शुल्कातील १.५ टक्के वाटा, न्यायानयाकडील अनुदान १.५ टक्के आणि गौण खनिज अनुदान १.६ टक्के मिळते.

**G. ग्रामपंचायतीची मालमत्ता**

- **ग्रामपंचायत पुढील प्रकारची मालमत्ता संपादन करु शकते.**
    - i. स्थावर मालमत्ता
    - ii. विकास योजनेतून मालमत्ता
    - iii. जंगम मालमत्ता

ग्रामपंचायतीस सार्वजनिक हिताच्या दृष्टिने स्थावर मालमत्ता संपादन करण्याचा तसेच स्थावर मालमत्ता निर्माण करण्याचा कायद्याने अधिकार आहे.

- **स्थावर मालमत्ता**

ग्रामपंचायतीच्या मालकीच्या व इतर संस्थांकडून किंवा देणगीदारांकडून मिळालेल्या स्थावर मालमत्ता यांचा यांत समावेश होतो. उदा. विहीरी, तळी, समाज मंदीर, गटारे, झाडे इत्यादी. ग्रामपंचायत स्वत:चे ग्राम निधीतून तसेच कर्ज, लोकवर्गणीद्वारे प्राप्त झालेल्या निधींमधून शाळेच्या इमारती, ग्रामपंचायत कार्यालय, ग्रंथालय, नळयोजना इत्यादींसारखी स्थावर मालमत्ता निर्माण करु शकते. त्याचप्रमाणे व्यावसायिक उपयोगाखाली कर्जे, लोकवर्गणी यांद्वारे प्राप्त केलेल्या निधीतून इमारती बांधू शकते.

- **विकास योजनेतून मालमत्ता**

विकास योजनेतून निर्माण झालेली मालमत्ता ही ग्राम पंचायतीची मालमत्ता समजण्यात येते. उदा. महात्मा गांधी रोजगार हमी योजनेतून निर्माण झालेली मालमत्ता. उदा.सार्वजनिक रस्ते, सडका, पूल, बांध, विहिरी, तळी, नदीच्या पात्रातील जागा, मोठा नाला, कालवे, जलप्रवाह, झाडे किंवा ग्रामपंचायतीने बांधलेले, संपादन केलेले, रस्ते त्याचप्रमाणे टेबले खुर्च्या, पिंपे, विविध शैक्षणिक फलके, नाटीस बॉर्ड, गादया, सतरंज्या, दुरदर्शन संच, वर्तमाननत्रे, सायकली इ. या सर्व नोंदी जंगम मालमत्तेच्या नोंदी: ग्रामपंचायतीस सर्व प्रकारच्या मालमत्तेच्या नोंदी दिलेल्या नमुन्यातील ठेवाव्या लागतात. स्थावर मिळकतीचे दप्तर (नमुना नं २५), मोकळया जागा, जमिनीचे रजिस्टर (नमुना नं २७) जंगम मालमत्ता नोंदवही (नमुना नं २६) इत्यादी अशी जवळ जवळ २७ विविध रजिस्टर्स आहेत. त्याची नोंद ग्रामपंचायत ठेवते.

उदा. १. सभावृतांत रजिस्टर (प्रोसीडीग)

अ. मासिक सभावृत्तांत - हजेरी पुस्तक

ब. मासिक सभावृत्तांत - हजेरी पुस्तक

क. ग्रामसभा सभावृत्तांत - हजेरी रजिस्टर उपरोक्त तिन्ही रजिस्टर्समध्ये ठराव व्यवस्थिरित्या लिहावेत. सुरुवात, मसुदा, निर्णय, अंमलबजावणी या बाबी सविस्तर असाव्यात.

**H. ग्रामपंचायतीची विविध कार्ये:**

ग्रामपंचायत ही पंचायतराज मधील महत्त्वपूर्ण घटक असून तिच्याकडे या व्यवस्थेतील काही कार्ये सोपविण्यात येतात. ग्रामपंचायतीच्या कामाची ऐच्छिक आणि अनिवार्य कामात विभागणी करण्यात आली आहे.

**अनिवार्य कार्य**

ही ग्रामपंचायतीला पार पाडावीच लागतात. ऐच्छिक कार्याबाबत तशी सक्ती करता येत नाही. मुंबई ग्रामपंचायत अधिनियम १९५८ नुसार ग्रामपंचायतीकडे खालील कामे सोपविण्यात आली आहेत.

**कृषी**

जमीन सुधारणांची अंमलबजावणी करणे धान्य कोठारांची निर्मिती करणे कंपोस्ट खताची निर्मिती करणे तसेच पडीक जमीन लागवडीखाली आणून पिकांसंबंधी प्रयोग करणे, सुधारित बियाणांच्या वापराला प्रोत्साहन देणे, शेती अवजारांचे प्रयोग करणे. सुधारित शेती करण्यासाठी प्रोत्साहित करणे.

**पशुसंवर्धन**

कार्यक्षेत्रातील पशुधनाची काळजी घेणे, संकरित गुरांच्या पैदासासाठी प्रयत्न करणे, दुग्धोत्पादनात प्रोत्साहन देणे. जनावरांसाठी पिण्याच्या पाण्याची सोय करणे.

**समाजकल्याण**

दारुबंदीस प्रोत्साहन देणे, गावातील जुगार अस्पृश्यता नष्ट करण्यासाठी प्रयत्न करणे, महिला व बालकल्याणाच्या योजना लाभार्थ्यांपर्यंत पोहचविणे.

**शिक्षण**

प्राथमिक तसेच माध्यमिक शिक्षणाची सोय करणे. ग्रामशिक्षण समितीद्वारे गावाचा शैक्षणिक विकास साधणे.

**आरोग्य**

गावाच्या आरोग्याची जबाबदारी ग्रामपंचायतीवर आहे. सार्वजनिक विहीरी, गटारे, तसेच गावाचा परिसर स्वच्छ ठेवून साथीच्या रोगांना आळा घालणे. शासनाच्या आरोग्य विषयक योजना गावपातळीवर राबविणे. उदा. लसीकरण, सार्वजनिक स्वच्छतागृहांची उभारणी, प्रसूती आणि बालसंगोपनाबाबत उपाययोजना करणे. गावातील जनतेस शुध्द पाणीपुरवठा करणे, स्मशानभूमीच्या जागेची व्यवस्था करणे.

**रस्ते बांधणी**

गावातील रस्ते, पूल, साकव यांची बांधकामे करुन दळणवळणाच्या सोयी करणे, तसेच गटारी, सार्वजनिक बाग, क्रीडांगणे, ग्रामसचिवालये आदिंची बांधकामे करणे.

**ग्रामद्योग आणि सहकार**

ग्रामद्योगांना प्रोत्साहन देऊन स्वयंरोजगाराच्या संधी उपलब्ध करुन देणे गावातील विविध कार्यकारी सोसायटया, पतपेढी स्थापन करण्यासाठी पुढाकार घेणे.

**प्रशासन**

जमीन महसूलाबाबतची कागदपत्रे अद्ययावत करणे, गावातील सार्वजनिक मालमत्तांची उदा. रस्ते, ओढे, नाले, विहीरी, सार्वजनिक जागा, धर्मशाळा, शाळांच्या इमारती, स्मशानभूमी आदींची नोंद ठेवणे. तसेच जिल्हा परिषदेने वर्ग केलेल्या मालमत्तेची नोंदणी ग्रामपंचायतीत करावी लागते. तसेच गावच्या हददीत बांधण्यात आलेल्या घरांची नोंद ठेवावी लागते. कोंडवाडा वाहनतळ, बाजार, जत्रा यांचे व्यवस्थापन ठेवणे हे काम पंचायतीस पार पाडावे लागते. गावातील जन्म, मृत्यू आणि विवाहाची अद्ययावत नोंद ठेवणे हे ग्रामपंचायतीचे परम कर्तव्य आहे. तसेच पंचायतीला वेळोवेळी मिळालेल्या बक्षीसांची नोंद, शासनाचे आदेश, विविध दस्तऐवजांची नोंद तसेच गावातील अतिक्रमणे हटविण्याचे कामही प्रशासनास करावे लागते. तसेच बांधकामावर नियंत्रण ठेवावे लागते.

**पाणी तपासणी**

गावातील पिण्याचे पाणी शुध्द आहे की अशुध्द आहे हे तपासण्याची जबाबदारी आता ग्रामपंचायतीवर सोपविण्यात आली आहे. गावातील पाण्याचे नमुने तपासण्यासाठी आता सर्व ग्रामपंचायतींना एचटूएस किटस पुरविण्यात येणार आहे. राष्ट्रीय ग्रामीण पाणी गुणवत्ता व सनियंत्रण कार्यक्रमांतर्गत राज्यातील सर्वच ग्रामपंचायतींना केंद्र शासनाच्या पाणी पुरवठा विभागामार्फत किटस पुरविण्यात येणार आहे.

**I. ग्रामपंचायत स्तरावर करावयाच्या बाबी.**

- ग्रामपंचायतींना त्यांच्या स्तरावर करण्यात येणाऱ्या कामाच्या तांत्रिक देखरेखीसाठी कंत्राटी पध्दतीने तज्ञ (कनिष्ठ अभियंता / तंत्रज्ञ इ.) नेमणे.
- ग्रामपंचायतींनी त्यांचे लेखे ठेवण्यासाठी कंत्राटी पध्दतीने लेखापाल नेमणे.
- ग्रामपंचायतीने संगणकीय कामकाजासाठी कंत्राटी पध्दतीने तंत्रज्ञांची /तज्ञांची नेमणूक करणे.
- ग्रामपंचायत स्तरावर गावाचा नियोजन आराखडा व पर्यावरणविकास आराखडा तयार करण्यासाठी टाऊन प्लॅनिंग तज्ञांची कंत्राटी पध्दतीने नेमणूक करणे.
    a) दहनभूमी / दफनभूमी देखभाल व दुरुती
    b) आरोग्य, ग्रामस्वच्छता व घनकचरा व्यवस्थापनाशी निगडीत कामे
    c) घनकचरा प्रक्रियेसाठी पर्यावरण संतुलित तंत्रज्ञान वापरुन शास्त्रीय पध्दतीने कमी खर्चाचे प्रकल्प हाती घेणे.
- वरील चार मुद्यांसाठी कनिष्ठ अभियंता/ तंत्रज्ञ, लेखापाल, संगणक तज्ञ व टाऊन प्लॅनिंग तज्ञ यांची कंत्राटी पध्दतीने नेमणूक करण्यासंदर्भात आवश्यक अटी व शर्ती, त्यांच्या नेमणूकीबाबतची कार्यपध्दती व सविस्तर सूचनांबाबतचे शासन परिपत्रक यशावकाश स्वतंत्रपणे निर्गमित करण्यास येणार आहे. शासनाकडून निर्गमित करण्यात येणाऱ्या शासन परिपत्रकाकामध्ये नमूद बाबींच्या अधीन राहूनच मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांनी वरील मुद्यांबाबत आवश्यक ती कार्यवाही करावी.

- ग्रामपंचायतीच्या क्षेत्रातंर्गत निर्माण झालेल्या विविध मालमत्तेची देखभाल व दुरुस्ती करणे.
- गावांतर्गत गटारे व गावांतर्ग रस्ते बांधकाम (मुरुमीकरण, खडीकरण, डांबरीकरण, व सिमेंट कॉंक्रिटीकरण तसचे त्याची देखभाल व दुरुस्ती करणे. सदर कामे करताना शासनाने विहित केलेल्या मानकांचे तंतोतंत पालन करावे. एकच काम वेगवेगळया योजनांच्या निधीतून एकाचवेळी हाती घेण्यात येणार नाही व निधीचा अपव्यय / दुरुपयोग होणार नाही याची खबरदारी घ्यावी.
- ग्रामपंचायत कार्यालय / ग्रामसचिवालय बांधकाम तसेच त्यांची देखभाल व दुरुस्ती (हे बांधकाम बीआरजीएफचा निधी एक आरईजीएस अंतर्गत राजीव गांधी भवनासोबत एकत्रितपणे विहित प्राधिकाऱ्याची मंजुरी घेऊन करता येईल.)

## १.५ ग्रामसभा

ग्रामसभा हा पंचायतराजचा गाभा आहे. पंचायतराज व्यवस्थेतील ग्रामपंचायत, पंचायत समिती, जिल्हा परिषद यांचा कारभार लोकप्रतिनिधीद्वारे चालतो. म्हणजेच निवडणूकीद्वारे मतदान करुन आपण आपले प्रतिनिधी निवडतो. आपण देशाचा, राज्याचा, कारभार चालविण्यासाठीही खासदार, आमदारांचा अशा प्रकारे निवडणूकीद्वारे निवडून देतो. आपले प्रतिनिधी म्हणून ते काम करतात. ही प्रातिनिधिक लोकशाही झाली. आपला देश विस्तृत पसरलेला आहे. लोकसंख्याही प्रचंड आहे. त्यामुळे त्या ठिकाणी प्रातिनिधिक लोकशाही आवश्यक आहे. पण थेट लोकशाही गावपातळीवर येऊ शकते. लोकशाहीचे, सत्तेचे विकेंद्रीकरण गाव स्तरावर शक्य आहे. ग्रामसभा ही खऱ्या अर्थाने लोकशाही संस्था आहे. कारण गावातील प्रत्येक प्रौढ मतदार व्यक्ती त्या गावच्या ग्रामसभेची सदस्य असते. तिला ग्रामसभेला उपस्थित राहण्याचा, आपले मत मांडण्याचा अधिकार आहे.

- **विकेंद्रीकरण**

केंद्रीकरण म्हणजे एकच केंद्र असणे आणि त्याच्या भोवती सत्ता, पैसा, संसाधने एकवटलेली जाणे. विकेंद्रीकरण हा याच्या विरुध्द शब्द / संकल्पना आहे. विकेंद्रीत नियोजन, विकेंद्रीत सत्ता असे शब्दप्रयोग तुम्ही ऐकले असतील. पंचायत राज व्यवस्थेबाबतीत तर सत्तेचे विकेंद्रीकरण हा शब्द नेहमीच वापरला जातो. तो त्याचा गाभा आहे असे म्हटलं जात. याचा अर्थ काय? तर गावचा कारभार गाव चालवेल. ती सत्ता ग्रामपंचायतीकडे दिलेली आहे. मुंबईतले महाराष्ट्र सरकार किंवा दिल्लीतले केंद्र सरकार ते चालविणार नाही. कारण गाव कसे आहे, त्यामध्ये कोणती साधनसंपत्ती आहे. लोकांचे प्रश्न कोणते आहेत ते सगळे त्या गावातल्या लोकांनाच चांगले माहिती असते. दिल्लीत किंवा मुंबईत बसून ते ठरविणे, गाव विकासाचे नियोजन करण योग्य प्रकारे आणि व्यवस्थितरित्या होत नाही असा अनुभव आहे. त्यामुळे दिल्लीत ठरवलेल्या योजना प्रत्यक्षात गावापर्यंत पोचतात तेव्हा गावाच्या वाट्याला फारच थोडे पोचते, हे होऊ नये खऱ्या अर्थाने गावांचा आणि पर्यायाने देशाचा विकास व्हावा म्हणून विकेंद्रीत नियोजन गरजेचे आहे.

- गावाला आपल्या गरजा ठरविता येतात. कोणती गरज अधिक महत्त्वाची आहे, कोणती आधी भागवायची, कोणती नंतर हे गावातील लोकच चांगल्या प्रकारे ठरवू शकतात.
- या गरजा भागविण्यासाठी कोणती संसाधने लागणार आहेत, कोणती संसाधने गावामध्येच उपलब्ध आहेत यांची माहितीही गावालाच असू शकते.
- योजना वरुन आली की ती परकी वाटते, लोकांनीच योजना गावपातळीवर तयार केली की ती त्यांना आपली वाटते, ते त्यांच्या अंमलबजावणीत मनापासून सहभागी होतात. म्हणून ती योजना यशस्वीही होते. पाणलोट विकासाचे कार्यक्रम ठरवून ते यशस्वीपणे राबवल्याची कितीतरी उदाहरणे आहेत. लोकांचा नियोजनात सहभाग असल्याने लोकांना जबाबदारी घेण्याची प्रेरणा मिळते. त्यामुळेच पाण्यासाठी केवळ विहीर बांधून ते थांबत नाहीत तर विहीर स्वच्छ राहील, पाणी जपून वापरले जाईल याचीही काळजी घेतली जाण्याची शक्यता वाढते.

- **ग्रामसभेच्या माध्यमातून ठोसपणे या गोष्टी करता येतात.**

- त्यासाठी पक्षा- पक्षातले, गटागटाचे राजकारण विकास कामाच्या आड येता कामा नये. वंचित घटकांचे हित डोळयासमोर ठेवून निर्णय घ्यायला हवेत. म्हणूनच ग्रामसभेला सर्वांची उपस्थिती असणे, तिथ लोकशाही पध्दतीने निर्णय घेणे महत्त्वाचे आहे.
- विकासकामांचे अग्रक्रम ठरवताना कोणाचा विकास, कशा प्रकारचा विकास हे प्रश्न जागरुकपणे, सातत्याने विचारायला हवेत. शाळेचे छप्पर गळत असताना, शाळेत स्नानगृह नसताना गावाला कमान हवी त्यामुळे गावाची छान वाढते असे कोणी म्हणत असेल तर जागरुक राहून योग्य निर्णय घेता यायला हवा.
- कामात कुठेही, कोणत्याही प्रकारचा भ्रष्टाचार होत नाही ना, संसाधनांची उधळमाधळ होत नाही. ग्रामसभेची तरतूद आल्यानंतर सुरुवातीला काही वर्षात तर ग्रामसभा हा शब्दही फार जणांना ठाऊक नव्हता. ते गावातल्या बडया, मुठभर प्रस्थातिप पुरुष माणसांचं काम अशीच समजूत होती. आज हे चित्र काही ठिकाणी हळूहळू, थोडे थोडे बदलत आहे. विशेषत: ज्या ठिकाणचे सामाजिक संस्था - संघटना कार्यरत आहेत त्या ठिकाणी बदल आशावादी आहेत. महिला मंडळ, बचत गट यातल्या स्त्रियांना माहिती मिळाली, जागृती झाली त्या एकत्र जमून ग्रामसभेला जाऊ लागल्या आहेत. नोटीस अजेंडा मिळाला नाही तर तक्रार करु लागल्या आहेत. आपले प्रश्न धीटपणे मांडू लागल्या आहेत. ग्रामसभा झाल्या नाहीत तर तसा जाब सरपंचाला विचारु लागल्या आहेत. त्यामुळे बायांचे चावडीवर, पंचायतीत काय काम? हे संकेत धुडकावले जात आहेत.

- **ग्रामसभा वास्तव**

अर्थात हे चित्र सार्वजनिक म्हणता येणार नाही. कारण आजही अनेक ठिकाणी ग्रामसभा फक्त कागदावरच होताहेत. काही ठिकाणी उपस्थिती फारशी नसते, तरीदेखील नंतर सह्या घेवून कोरम फुल असल्याचे सांगितले जाते, किंवा कोरम अभावी सभा तहकूब करुन मूठभरांच्या

उपस्थितीत सभा घेतली जाते. पंचायत समिती वेळापत्रक तयार करुन पाठविते आणि त्यानसार ग्रामसभा उरकल्या जातात. पुष्कळदा गावातील उरुष, जत्रा, लग्न अशा स्थानिक गोष्टींचा विचार न करता लोकांचा सोयींच्या वेळांचा विचार न करता पंचायतीच्या अधिकाऱ्यांचा वेळानुसार वेळा ठरवून दौरे उरकले जातात. आणि ग्रामसभा होतात. पण यामध्ये ग्रामसभेचा आत्माच हरवून जातो. त्यामागचा विचार पुसून टाकला जातो. ही वस्तूस्थिती आहे. अशी उदासीनता असेल तर ग्रामसभा हा पंचायतराजचा पाया भक्कम कशा होणार? म्हणूनच ग्रामसभेचे नियम, उदिदष्टे नीट समजावून घेतले पाहिजेत.

- **ग्रामसभेची उदिदष्टे**

  गावाचा दैनंदिन कारभार चालविण्यासाठी आपण ग्रामपंचायत सदस्य निवडून देतो. त्यांना सहाय्य करण्यासाठी ग्रामसेवक हा सरकारी कर्मचारी असतो.

  i. आपण निवडून दिलेले प्रतिनिधी कारभार नीट चालवित आहेत की नाही हे ग्रामसभेने पाहावयाचे असते. ते मनमानी कारभार करत असतील तर त्यांना ग्रामसभेत जाब विचारता येतो.

  ii. ग्रामसभेत ग्रामस्थ आपल्या अडीअडचणी मांडू शकतात.

  iii. गावाच्या कारभाराला वळण लावण्यासाठी बहुमताने काही निर्णय घेऊ शकतात.

  iv. गावच्या विकासाचे निर्णय ग्रामसभेत होणार आहेत.

  v. विकास योजनांचे अंदाजपत्रक तयार करणे, त्यास मान्यता देण्याबरोबरच विविध योजनांचे लाभार्थी निवडण्याचे अधिकार ग्रामसभेस मिळाले आहेत.

  vi. यशवंत ग्रामसमृध्दी सारख्या योजनांमुळे गावाचा विकास करण्यासाठी काय विकास योजना आखायच्या याचे अधिकारही ग्रामसभेस मिळाले आहेत..

  vii. परिसरातील दारुचे दुकाने बंद करण्याबाबतचे अधिकारही शासनाने ग्रामसभांना दिले आहेत, त्यामुळे साहजिकच ग्रामसभांचे महत्त्व वाढलेले आहे.

- **ग्रामसभेमध्ये शासकीय व निमशासकीय कर्मचाऱ्यांची उपस्थिती**

ग्रामसभेस सूट दिलेली नसेल तर गावात काम करणारे शासकीय व निमशासकीय आणि पंचायतीचे सर्व कर्मचारी ग्रामसभेच्या सभांना हजर राहतील.

- **ग्रामसभेचे काही महत्त्वाचे अधिकार व कार्य खालीलप्रमाणे आहेत**

i. ग्रामसभा, राज्यशासनाच्या किंवा यथास्थिती, केंद्र सरकारच्या व्यक्तिगत, लाभधारक योजनांकरीता लाभधारकाची निवड करील. उदा. दारिद्रयरेषेखालील कुटुंबाच्या यादीला ग्रामसभेच्या बैठकीत मान्यता घ्यावी लागेल.

ii. पंचायतीकडून राबविण्यात येतील अशा सामाजिक किंवा आर्थिक विकासाच्या योजना, कार्यक्रम व प्रकल्प यांना अशा योजना कार्यक्रम व प्रकल्प यांच्या अंमलबजावणीचे काम त्या पंचायतीने हाती घेण्यापूर्वी ग्रामसभेची मान्यता घेईल. उदा. महात्मा गांधी राष्ट्रीय रोजगार हमी योजनेतून घ्यावयाचे काम हे ग्रामसभेच्या बैठकीतील ठरावाद्वारे सुचवावयाचे असते.

iii. विकास योजनांवर कोणताही खर्च करण्याची पंचायतीला परवानगी ग्रामसभेकडून घ्यावा लागेल.

iv. अशा पंचायतीच्या अधिकारीतेत येणारी कोणतीही जमीन शासकीय प्रयोजनार्थ संबंधित भूमी संपादन प्राधिकरणाद्वारे संपादित करण्याच्या कोणत्याही प्रस्तावासंबंधात पंचायतीकडून कोणतही निर्णय घेण्यात येण्यापूर्वी पंचायतीला आपली ग्रामसभा कळवेल.

v. गावामध्ये काम करीत असलेल्या शासकीय, निमशासकीय व पंचायतीच्या कर्मचाऱ्यांवर तसेच त्यांच्या कार्यालयातील रोजच्या उपस्थितीवर देखील ग्रामसभेचे शिस्तविषयक नियंत्रण असेल. अशा कर्मचाऱ्यांचे वार्षिक

मुल्यमापन ग्रामसभेकडून त्यांच्या वरीष्ठ प्राधिकाऱ्यांच्या निदर्शनास आणून दिले जाईल.

vi. ग्रामसभा ही अशा कोणत्याही कर्मचाऱ्यांकडून घडलेली कोणतीही नियमबाह्य गोष्ट असल्यास त्याबाबत संबंधित अधिकाऱ्याला अहवाल देईल.

- **ग्रामसभेच्या पूर्वीच्या बैठका**

**A. ग्रामपंचायतीच्या सदस्यांची बैठक**

ग्रामसभेची बैकठ ज्या दिवशी असेल त्या दिवशाच्या आदल्या दिवशी होऊन त्यात ग्रामसभेच्या बैठकीत घ्यावयाच्या विषयावर चर्चा करण्यात येते.

**B. वार्ड सभा**

ग्रामसभेपूर्व प्रत्येक वार्डामध्ये वार्डातील मतदारांबरोबर वार्ड सभा होणे अनिवार्य आहे. सदर बैठकीकरीता संबंधीत वार्डातील ग्रामपंचायतीच्या सदस्याने उपस्थित राहून वार्डात आढळणाऱ्या समस्यांवर चर्चा करावी व येणाऱ्या सूचनांची व्यवस्थित नोंद करुन ग्रामसभेमध्ये सादरीकरणाकरीता तयार ठेवावी.

**C. महिला सभा**

राज्य महिला धोरण १९९४ नुसार प्रत्येक ग्रामसभेपुर्वी महिला ग्रामसभा आयोजित करणे आवश्यक आहे. ही ग्रामसभा ग्रामसभेइतकीच महत्त्वाची असते. गावामध्ये महिलांना येणाऱ्या अडचणी व त्यांच्या सूचनांवर मोकळेपणाने चर्चा करता यावी म्हणून सदर ग्रामसभा महत्त्वाची आहे. निर्णय प्रक्रियेत महिलांचा सहभाग वाढावा असे पोषक वातावरण निर्माण करण्याची तसेच त्यांच्या अधिकारांची खऱ्या अर्थाने त्यांना जाणीव व्हावी. त्यांच्या कायदेशीर अधिकारावर बंधने आणणाऱ्या विरुध्द सामूहिक पध्दतीने सामना करण्याची मानसिकता त्यांच्यात निर्माण व्हावी, अन्याय सहन करण्याची परंपरा नष्ट व्हावी. त्यांना भारतीय राज्यघटनेच्या चौकटीत आणि कायद्याच्या साकोरीतून एक प्रभावी व्यासपीठ उपलब्ध व्हावे, एकत्रित ग्रामसभेत त्यांची मते डावलण्यात येऊ नयेत म्हणून ग्रामसभेपुर्वी महिलांची सभा बोलावण्याचा निर्णय घेण्यात

आला.महिला सभेला बहुतांश महिलांना हजर राहावे म्हणून ग्रामसेवकांनी गावात दवंडी देऊन, बचत गटाच्या महिलांनी प्रत्यक्ष भेटून या सभेची माहिती महिलांना करुन देणे आवश्यक आहे.

- महिला ग्रामसभेत चर्चेत आलेल्या विषयांचे इतिवृत्त करणे आवश्यक असून त्यातील महत्वाच्या सूचना ग्रामसभेत सादर करणे अनिवार्य आहे.
- या सभेत घेण्यात आलेला ठराव जशाचा तसा ग्रामसभेत मंजूर करावा लागतो. जर मंजूर करण्यात आला नाही तर, त्याची कारणमिमांसा नोंद करावी लागते.

**D. सर्वसाधारण ग्रामसभा**

ग्रामपंचायतीच्या कारभाराचे वर्ष एप्रिल महिन्याच्या १ तारखेला सुरु होते आणि त्यानंतर येणाऱ्या मार्च महिन्याच्या ३१ तारखेला संपते. या वर्षाला आर्थिक वर्ष किवा वित्तीय वर्ष असे म्हणतात.

प्रत्येक वित्तीय वर्षात ग्रामसभेच्या ४ बैठका व्हाव्या लागतात. प्रत्येक अनिवार्य ग्रामसभा खालीलप्रमाणे विशिष्ट कालावधी दरम्यान होणे अपेक्षित आहे.

| **दिनांक / कालावधी** | | **संबंधित राष्ट्रीय दिवस** |
|---|---|---|
| २६ जानेवारी | - | गणतंत्र दिवस |
| २४ एप्रिल - १ मे | - | पंचायतराज दिवस - महाराष्ट्र दिन |
| ९ - १५ ऑगस्ट | - | क्रांती दिन - स्वातंत्र्य दिन |
| २ ऑक्टोबर | - | महात्मा गांधी जयंती |

**E. विशेष/ विशेष ग्रामसभा**

सरपंच विशेष सभा बोलवू शकतो. गरज पडली तर तालुका पंचायत समिती, जिल्हा परिषदेची स्थायी समिती आणि जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी सांगितले तर विशेष बैठक बोलविता येते.

### F. तहकूब ग्रामसभा

ग्रामसभेसाठी पुरेसे सदस्य उपस्थित झाले नाही तर अशी ग्रामसभा तहकूब करावी लागते. तसेच चालू असलेल्या ग्रामसभेतील काही विषय वेळे अभावी शिल्लक राहिले तर उपस्थित असलेल्या सदस्यांच्या सहमतीने अशी सभा तहकूब करता येते. तहकूब करण्यात आलेल्या सभेच्या बाबतीत सभेला उपस्थित असलेल्या सभासदांसमोर पुढील तहकूब सभेची तारीख, वेळ, ठिकाण त्याच सभेत अध्यक्षांनी जाहीर केले पाहिजे.अशा तहकूब सभेला कोणत्याही नवीन विषयाचा विचार करता येत नाही. कार्यक्रम पत्रिकेवर नवीन विषय घेता येत नाही.

### G. ग्रामसभेची गणपूर्ती

**i. ग्रामसभेकरीता मतदार गणपूर्ती**

ग्रामपंचायत कार्यक्षेत्रात असणाऱ्या एकूण मतदारांपैकी १५ टक्के किंवा १०० यापैकी जी संख्या कमी असेल, तेवढे किमान मतदार ग्रामसभेला हजर असल्यास सभा होऊ शकते. तहकूब सभेला हा नियम लागू नाही. ठरलेल्या वेळेनंतर कमीत कमी १५ मिनिटे आणि जास्तीत जास्त ३० मिनिटे सभेला सदस्य येण्याची वाट पाहावी अशी पध्दत आहे.

**ii. ग्रामपंचायत सभेकरीता सदस्य गणपूर्ती**

कोणत्याही सभेला काही सदस्य आल्याशिवाय सभा सुरु करता येत नाही. सभेला कमीत कमी किती सदस्य आल्यावर सभा सुरु करावी याचे काही नियम आहेत. ही संख्या त्या ग्रामपंचायतीच्या एकूण सदस्यांच्या संख्येवर अवलंबून आहे. ग्रामपंचायतीची साधारण सभा सुरु करण्यापूर्वी एकूण सदस्यांच्या कमीत कमी निम्मे किंवा निम्म्यापेक्षा जास्त सदस्य सभेच्या ठिकाणी (सभागृहात) हजर असावे लागतात. ग्रामपंचायतीच्या सर्वसाधारण जी वेळ ठरविली असेल त्यावेळी सभेसाठी आलेल्या सदस्यांच्या सभेची वाचा कारभार गावाच्या हातात)

| ग्रामपंचायत सदस्य संख्या | ग्रामसभेचीगणपूर्ती होण्यासाठी आवश्यक सदस्य संख्या |
|---|---|
| ७ | ४ |
| ९ | ५ |
| ११ | ६ |
| १३ | ७ |
| १५ | ८ |
| १७ | ९ |

हजेरी पुस्तकात सहया घ्याव्यात. गणतूर्ती इतके सदस्य आले असतील तर गणपूर्ती असे जाहीर करावे लागते. गणपूर्ती होत नसेल तर  सभेच्या  ठरलेल्या वेळेपासून अर्धा तासापर्यंत सदस्य येण्याची वाट पहावी लागते. अर्ध्या तासात गणपूती झाली तर सभा सुरु करता येते. सदस्यांची अर्धा तास वाट पाहूनही गणपूर्ती होत नसेल तर ती सभा तहकूब करावी लागते.

### H. ग्रामसभेची बैठक बोलावण्याचे अधिकार

ग्रामसभेची बैठक बोलावण्याचे अधिकार सरपंचांना व त्यांच्या अनुपस्थितीत उपसरपंचांना आहेत. तालुका पंचायती समिती, स्थायी समिती आणि मुख्य कार्यकारी अधिकारी सरपंचांना सांगून बैठक बोलावू शकतात. अन्यथा मुख्य कार्यकारी अधिकारी, गटविकास अधिकाऱ्यांना सांगून बैठक घेऊ शकतात.

### I. ग्रामसभेची बैठकीची नोटीस

ग्रामपंचायतीच्या प्रत्येक सभासदाला सभेच्या तीन दिवस अगोदर लेखी पत्र दिले जाते त्यात क्रमवार विषय पत्रिका (अजेंडा) सभेची वेळ, ग्रुप ग्रामपंचायत असल्यास गावाचे नाव, ठिकाण व तारीख याचा उल्लेख असावा लागतो. याबाबतची नोटीस सरपंच व त्याच्या अनुपस्थितीत उपसरपंच काढतात. सभेतच सभा संपायच्या वेळी बहुसंख्य सभासदांना विचारुन पुढील सभेची तारीख, वेळ निश्चित केली जाते. खास सभेसाठी ४ दिवस आगाऊ नाटीस काढावी लागते.

### J. ग्रामसभेची विषयपत्रिका

**१. सर्वसाधारण सभेची विषयपत्रिका**

ग्रामपंचायतीच्या होणाऱ्या सभेपुढे खालील विषय प्रामुख्याने घ्यावे लागतात.

i. सभेची गणपूर्ती झाल्यानंतर सुरुवातीस मागील सभेचा वृतांत सभेपुढे दाखवावा लागतो, नंतर अध्यक्षांनी तो वृत्तांत स्वत: वाचून तो कायम केल्याबद्दलचा शेरा लिहून त्याखाली सही करावी लागते. त्यानंतर पुढील विषय चर्चेत घ्यावयाचे असतात.

ii. ग्रामपंचायतीच्या मागील सभेत झालेल्या ठरावाप्रमाणे कार्यवाहीचा आढावा घेणे.

iii. मागील महिन्यातील प्रत्यक्ष जमा आणि खर्च वाचून दाखविणे व त्यावर चर्चा करुन खर्चाला मंजूरी देणे.

iv. पुढील महिन्यात करावयाच्या खर्चाबाबत विचार करणे.

v. वरिष्ठ कार्यालयाकडून आलेली परिपत्रके व पत्रव्यवहाराची माहिती देणे.

vi. मागील महिन्यात झालेल्या जन्म-मृत्यूंच्या आणि विवाहांच्या नोंदीची माहिती घेणे.

vii. ग्रामपंचायत सभासदाकडील करवसुलीचा आढावा घेणे.

सभेची विषयपत्रिका तयार करताना हे सात विषय अगोदर या क्रमाने विषयपत्रिकेवर लिहितात. त्यानंतर ग्रामसभा, सरपंच, सदस्य यांनी ठरविलेले विषय, जिल्हा परिषद, पंचायत समिती, सरकार, सरकारी खाती यांनी सुचविलेले विषयही घेतले जातात. सरतेशेवटी अध्यक्षांच्या परवानगीने ऐनवेळी आलेल्या विषयाचा विचार करणे असा विषय असतो.

**२. पहिल्या ग्रामसभंच्या बैठकीची विषयपत्रिका**

आर्थिक वर्ष संपल्यानंतर पहिल्या दोन महिन्यात ग्रामसभेची जी बैठक होते ती पहिली बैठक होय. या बैठकीत पुढील विषय अग्रक्रम देऊन घ्यावेच लागतात.

i. मागील वर्षातील विकास कामाच्या प्रशासन अहवालाचे वाचन करणे.

ii. मागील वर्षाच्या जमाखर्चाचे वाचन करणे.

iii. मागील लेखापरीक्षण अहवालाचे वाचन करणे आणि गेल्या वर्षात लेखापरीक्षण अहवालाला जी उत्तरे दिली असतील त्याचे वाचन करणे.

iv. मंजूर अंदाजपत्रकाचे वाचन व त्यानुसार चालू वर्षात घ्यावयाच्या विकास कामाची माहिती.

v. पंचायत समिती, जिल्हा परिषदेची स्थायी समिती किंवा जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी सुचविलेले विषय आणि राज्य सरकारने सुचविलेले विषय घ्यावे लागतात. याशिवाय ग्रामपंचायतीला आवश्यक विषय घेता येतात.

### K. ग्रामसभेच्या बैठकीच्या नोटीसीची प्रसिध्दी

ग्रामसभेच्या सभेची नोटीस सात दिवस अगोदर आणि असाधारण म्हणजे खास सभेची नोटीस ४ दिवस आधी काढावी लागते. ग्रामपंचायतीच्या सभेच्या नोटीसीची एक प्रत ग्रामपंचायतीच्या कार्यालयाच्या नोटीस बोर्डावर लावून प्रसिध्द करावी लागते. आणि चावडी किंवा चोरा येथे ठळक ठिकाणी चिकटवून प्रसिध्द करतात. त्याचप्रमाणे कायद्याने ठरविलेल्या नोटीस प्रसिध्द केल्यानंतर उशिरात उशिरा दुसऱ्या दिवशी गावात दवंडी देऊन नोटीशीला प्रसिध्दी द्यावी लागते. ग्रामपंचायतीमध्ये एकापेक्षा जास्त गावे, वाडया, वस्त्या असतील तर प्रत्येक गावात दवंडी देऊन नोटीस प्रसिध्द करावी.

### L. बैठकीचे स्थळ

अशा गावांच्या ग्रामसभेची प्रत्येक वित्तीय वर्षातील पहिली बैठक ग्रामपंचायतीचे कार्यालय ज्या गावात असेल त्याच गावी घ्यावी लागते. तसेच दुसरी म्हणजे पहिल्या सभेनंतर घ्यावयाची बैठक अनुसूचित जातीच्या / जमातीच्या वस्तीत घ्यावी लागते. पुढच्या बैठका कोणत्या गावी घ्याव्या यासाठी नावाची इंग्रजी लिपीत यादी करतात. त्या यादीतील इंग्रजी वर्णानुक्रमे येणाऱ्या गावी पाळी पाळीने बैठक घेतात. बैठक ग्रामपंचायतीच्या कार्यालयात, चावडीत, चोऱ्यात किंवा इतर सार्वजनिक ठिकाणीही घेता येते. खाजगी जागेत बैठक घेता येत नाही.

**M. ग्रामसभेचा अध्यक्ष**

ग्रामसभेला पदाधिकारी नाहीत. ग्रामसभेला एक अध्यक्ष आहे. पंचायतीच्या प्रत्येक सार्वजनिक निवडणूकीनंतरच्या पहिल्या सभेत, आणि त्यानंतर, दरवर्षीच्या पहिल्या सभेमध्ये सरपंच व त्यांच्या अनुपस्थितीत उपसरपंच अध्यक्षस्थानी राहील, आणि ग्रामसभेच्या वर्षातील त्यानंतरच्या इतर सर्व सभांमध्ये ग्रामसभेच्या सभेमध्ये उपस्थित असलेल्या व्यक्तिंकडून निवडलेली एखादी व्यक्ती अध्यक्षस्थानी राहील.

**N. ग्रामसभेच्या बैठकीत सूचना मांडण्याचा सदस्यांना अधिकार**

ग्रामसभेच्या बैठकीत कोणतीही सूचना मांडण्याची एखाद्या इसमाची इच्छा असल्यास त्याने ती बैठकीच्या तारखेच्या कमीत कमी दोन दिवस आधी बैठक बोलावणाऱ्याकडे लेखी द्यावी. अशी सूचना बैठकीत ठेवावी की ठेवू नये ती बैठक बोलाविण्याऱ्याने ठरवावे लागते.

**O. सभेचे नियमन**

अध्यक्षस्थानी असलेल्या व्यक्तीने ग्रामसभेची संपूर्ण बैठक पार पाडेपर्यंत नियमन करावे लागते. सुरुवातीस विषय पत्रिकेतील विषयांची यादी सर्वांना वाचून दाखवावी लागते. विषयास सुसंगत असा प्रश्न विचारण्याचा अधिकार ग्रामसभा सदस्यांना आहे. अशा सर्व प्रश्नांची उत्तरे अध्यक्षांनी तोंडी द्यावी लागतात. विषयाचे स्वरुप लक्षात घेऊन एखाद्या सभासदास चर्चा करण्यास किती वेळ द्यावयाचा हे ठरविण्याचा अधिकार अध्यक्षांना आहे. विषयपत्रिकेत नमूद केलेल्या विषयाशिवाय इतर विषयांवर अध्यक्षांच्या परवानगीशिवाय चर्चा करता येत नाही.

पुढील ग्रामसभेचे नियोजन ग्रामसभा सर्वसाधारणपणे, तिच्या पुढील सभेचा दिनांक, वेळ आणि ठिकाण तिच्या अगोदर सभेत निश्चित करील.

**P. ग्रामसभा प्रश्चात**

ग्रामसभेच्या प्रत्येक सभेचे कार्यवृत्त, ग्रामपंचायतीचा संबंधित सचिव तयार करील व ठेवील आणि त्याच्या अनुपस्थितीत, सभेचे कार्यवृत्त, सरपंच निर्देश देईल त्याप्रमाणे, गावात काम करणारा शिक्षक, तलाठी किंवा अंगणवाडी सेविका यांसारख्या कोणताही शासकीय,

निमशासकीय किंवा पंचायती कर्मचारी तयार करील आणि ते अभिलेखासाठी पंचायतीकडे सुपूर्द केले जाईल.

ग्रामसभेच्या प्रत्येक कामकाजाचा संक्षिप्त वृत्तांत सभा झाल्यापासून सात दिवसांच्या आत जिल्हा ग्रामपंचायत अधिकारी, उपमुख्य कार्यकारी अधिकारी (पंचायत) व गटविकास अधिकारी यांच्याकडे पाठविण्यात आला पाहिजे.

अशा रितीने ग्रामपंचायतीची प्रत्येक सभा ठरलेल्या तारखेला, ठरविलेल्या वेळी आणि ठरलेल्या ठिकाणी घ्यावी लागते.[५]

## १.६ पंचायत क्षेत्र विस्तार कायदा १९९६

### पार्श्वभूमी

| माहिती | भारत | महाराष्ट्र |
|---|---|---|
| आदिवासी लोकसंख्येची टक्केवारी | ८.६३% | ९.३५% |
| भारताच्या एकूण आदिवासींच्या लोकसंख्येच्या १०.०५ टक्के आदिवासी महाराष्ट्रात राहतात. महाराष्ट्रात आदिवासींच्या ४७ जमाती आहेत. या जमाती महाराष्ट्रातील वेगवेगळया जिल्हयांमध्ये वास्तव करीत आहेत. (२०११ च्या जनगणनेनुसार) | | |

आदिवासी भाग हा आर्थिक, भौगोलिक आणि सांस्कृतिक दृष्टया ग्रामीण भागापेक्षा भिन्न आहे. हया भागाचे वेगळेपण ओळखून व अभ्यासून त्या भागाकरीता, संविधानात जशा विशेष तरतुदी करण्यात आल्या आहेत. तशाच त्याला अनुसरुन विविध योजना व कार्यक्रम आखण्यात आले आहेत. आदिवासी भागांकरीता वैविध्यपूर्ण सामाजिक आणि सांस्कृतिक परंपरा लक्षात घेता तेथील स्थानिक स्वराज्य संस्थांची रचना व कार्य समर्पक असावे यासाठी १९९६ साली पंचायत क्षेत्र विस्तार कायदा (PESA - Panchayat Extention to Scheduled Area- Act) अस्तित्वात आला. या कायद्ययाची पार्श्वभूमी व तरतूदींचे तपशील यामध्ये थोडक्यात मांडण्यात आले आहेत.

### १) स्वातंत्र्यपूर्व कालखंड

देशाचा इतिहास आपण अभ्यासला तर आपल्याला असे दिसून येते की आदिवासी जमाती विकास प्रक्रियेत दुर्लक्षित राहिल्या आहेत, अनुसूचित जमाती राहत असलेली जागा व कसत असलेल्या पारंपारिक शेत जमिनी हयांचा वन संरक्षण तरतुदींमुळे विकास होऊ शकला नाही. इंग्रजांच्या काळात आदिवासींची स्वतंत्र सांस्कृतिक ओळख, अस्तित्व नाकारले गेल्याचे आपल्याला दिसते. तसेच स्वातंत्र्योत्तर काळाच्या सुरुवातीला आदिवासी विकासाच्या धोरणाबाबत अनेक वाद निर्माण झाले. अर्वाचीन काळात आदिवासी समुदायांच्या हक्काकरीता अनेक आदिवासी बांधवांनी बंड पुकारले. या बंडाचे पुढारी म्हणून भारतातील विविध भागातून उमाजी नाईक, वीर भागोजी नाईक, वीर बिरसा मुंडा, दादा सौंदाणे अशी नावे समोर आली.

१८३१ - उमाजी नाईक या आदिवासी तरुणाने इंग्रजांच्या जुलमी शेतसारा आकारणीच्या विरोधात जाऊन स्वत: ला राजा घोषित करुन स्वत:चा जाहिरनामा काढला.

१८५७ - भागोजी नाईक यांनी इंग्रजांच्या नोकरीत असतांना स्वत:ला व आदिवासींना मिळणाऱ्या वाईट वागणूकीच्या विरोधी सशस्त्र बंड पुकारले.

१८९५ - बिरसा मुंडा याने आदिवासींना जंगलातून बाहेर काढू पाहणाऱ्या इंग्रजांविरोधात सशस्त्र कायदेभंगाची चळवळ उभारली व राजनैतिक आंदोलने चालवून आदिवासींयांचे अधिकार व हक्क यासाठी संघर्ष केला तसेच आदिवासीयांना शेतसारा न भरण्याचे व कायदे भंगाचे आवाहन केले. भारतीय वन अधिनियम १९२७ (Indian Forest Act) या कायद्यामध्ये आदिवासी हे जंगलासाठी घातक आहेत या गृहिताच्या आधारे त्यांच्या जंगलातील वावर, शेती, वन उपज संकलन इत्यादींवर अनेक बंधने आली. तसेच अनेक अटी पारतंत्र्याच्या काळात त्यांच्यावर लादण्यात आल्या. त्यामुळे इंग्रज व आदिवासी जमातींमध्ये लढाया झाल्या.

### २) स्वातंत्र्योत्तर कालखंड

स्वातंत्र्यानंतर देशातील जनतेच्या विकासाच्या गरजा पूर्ण करत जागतिक पातळीवर भारताला स्थान मिळवून देण्याचे मोठे आवाहन पुढे होते. त्याचबरोबर आदिवासी समुदायाला मुख्य प्रवाहात आणण्याची मोठी जबाबदारी होती. स्वतंत्र भारताने लोकशाही स्वीकारली. लोकशाही

पध्दतीने देश चालविण्याकरीता संविधान तयार करण्याची जबाबदारी संविधान सभेवर सोपविली. भारताच्या सर्व भागांतून प्रतिनिधी या सभेत निवडून आले. या मध्ये श्री. जयपाल सिंग मुंडा हे बिहार भागातून निवडून आले ते स्वत: आदिवासी असून त्यांनी संविधानाचा मसुदा तयार करतांना विविध मुद्यांवर आदिवासींयांची बाजू वेळोवेळी मांडली. या संविधान सभेने तयार केलेल्या संविधानात आदिवासींयांना भारताचे नागरिक म्हणून समान हक्क देण्यात आले (संविधान भाग ३ - मुलभूत हक्क) सर्वांना समान हक्क देऊनही आदिवासींकरीता विशेष तरतूद करण्यात आली. कारण ते ग्रामीण (बीगर आदिवासी) क्षेत्रापेक्षा निराळे होते. आदिवासी क्षेत्राची सांस्कृतिक जडणघडण, रुढी, परंपरा व त्यांची न्याय निवाडयाच्या पध्दती हे भिन्न असल्याने यांचा सर्वकष विचार करण्याची आवश्यकता होती. ही आवश्यकता लक्षात घेऊन संविधानाच्या भाग १० कलम २४४ अन्वये भारतातील आदिवासी बहुल भाग हे अनुसूचित क्षेत्र म्हणून घोषित करण्यात आला. या कलमाबरोबर २ अनुसूची जोडण्यात आल्या ज्यामध्ये या अनुसूचीत क्षेत्राच्या प्रशासनाबाबत स्वतंत्र तरतूदी दिल्या आहेत.

- **अनुसूची ५ -**यात आसाम व मेघालय त्रिपुरा व मिझोराम ही राज्ये वगळता येणारी राज्ये व तेथील घोषित केलेला भाग समाविष्ठ करण्यात आला व त्याप्रमाणे तेथील प्रशासकीय तरतुदी मांडल्या आहेत.
- **अनुसूची ६ -** यात आसाम व मेघालय, त्रिपुरा व मिझोराम ही राज्ये व तेथील घोषित केलेला भाग समाविष्ठ करण्यात आला व त्याप्रमाणे तेथील प्रशासन कसे असावे याबाबत सूचना देण्यात आल्या आहेत.

या बदलाने आदिवासी जमातींच्या गरजांकडे वेगळ्या व स्वतंत्र पध्दतीने पाहायला सुरुवात झाली.

सर्वच स्तरावरील लोकांसाठी प्रभावी व जलद गतीने काम करण्यासाठी १९५७ ला बलवंतराय मेहता समितीच्या शिफारसीने स्त्रिस्तरीय पंचायतीराज संस्थेच्या स्थापनेला चालना मिळाली. परंतू या स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये आदिवासी व ग्रामीण भागासाठी भिन्न तरतुदी

नव्हत्या. त्यानंतर १५ वर्षांनी १९७२ ला वन्यजीवांच्या संरक्षणाच्या हेतूने वन्यजीव संरक्षण अधिनियम १९७२ व वनसंवर्धन अधिनियम १९८० हे कायदे अस्तित्वात आले. या कायद्यातील काही तरतुदींमुळे आदिवासी समुदायाच्या वनातील वावरावर बंधने आली.

**३) पंचायत क्षेत्र विस्तार कायदा १९९६**

शासन स्तरावर आदिवासी जमातींच्या आर्थिक, सामाजिक व शैक्षणिक विकासासाठी विशेष धोरणात्मक काम करता यावे यासाठी अनेक योजनांची आखणी करण्यात आली. या योजना प्रभावीपणे राबविण्यासाठी १९८३ साली स्वतंत्र आदिवासी विभागाची स्थापना करण्यात आली. या विभागाच्या माध्यमातून जलद गतीने आदिवासी क्षेत्राचा व समुदायांचा विकास करण्यासाठी महत्त्वाकांक्षी प्रयत्न करण्यात आले. परंतू असे असताना वन्यजीव संरक्षण अधिनियम व वन्यसंवर्धन अधिनियमाने तयार झालेल्या वातावरणामुळे आदिवासी जनसमुदाय, विविध सामाजिक संस्था व शासन यांच्या पुढाकाराने आदिवासी समुदायाच्या हक्क व अधिकाऱ्यांना संरक्षण देणाऱ्या स्वतंत्र कायद्याची मागणी पुढे आली. दरम्यानच्या काळात विकेंद्रीकरण पाहता ७३ वी घटनादुरुस्ती करुन पंचायती राज संस्थांना घटनात्मक दर्जा देण्यात आला व त्यांची स्थापना ही सर्व राज्यांवर बंधनकारक करण्यात आली. या पार्श्वभूमीवर पंचायत विस्तार कायदा १९९६ अस्तित्वात आला. ज्याद्वारे अनुसूचित भागातील स्थानिक स्वराज्य संस्थांना विशेष अधिकार देण्यात आले. पेसा कायद्यातर्गंत असलेल्या तरतूदी या विशेष करुन अनुसूचित भागांकरीता असून त्या ७३ व्या घटनादुरुस्तीशी सुसंगत आहेत.

अनुसूचित क्षेत्रातील आदिवासींच्या परंपरा व रुढी, त्यांची सांस्कृतिक ओळख, सामुहिक साधन संपत्ती आणि तंटा निवारण्याची रुढ पध्दती आणि गौण उत्पादनावरील मालकी इ. चे रक्षण व जतन करण्यासाठी अनुसूचित क्षेत्रातील ग्रामसभांना व पंचायतींना विशेष अधिकार या अधिनियमाने प्राप्त झाले आहेत. महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम १९५८ व जिल्हा परिषदा व पंयायत समित्या अधिनियम १९६१ यानुसार महाराष्ट्रातील पंचायतीराज काम करते. पण अनुसूचित क्षेत्रातील ग्रामपंचायती व ग्रामसभांना महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियमाबरोबरच पेसा कायद्यातर्गंत असलेल्या अनुसूचित क्षेत्रातील आदिवासी जमातींच्या परंपरा व रुढी, त्यांची

सांस्कृतिक ओळख, सामुहिक साधन संपत्ती आणि तंटा निवारण्याची रुढ पध्दती आणि गौणउत्पादनावरील मालकी इ. चे रक्षण व जतन करण्यासाठी अनुसूचित क्षेत्रातील ग्रामसभांना व पंचायतींना विशेष अधिकार या अधिनियमाने प्राप्त झाले आहेत.




केंद्र शासनाने ज्या विभागात अनुसूचित जमातीची लोकसंख्या अधिक आहे व राज्य सरकारने अनुसूचित क्षेत्र म्हणून घोषित केले आहे. असे शासनाच्या १९८५ च्या अधिसूचनेप्रमाणे महाराष्ट्र राज्यातील १२ जिल्हयातील ५६९१ गावांचा समावेश होतो. पेसा कायद्यातील सर्व तरतूदी या गावांना लागू होतात.

महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम १९५८ व जिल्हा परिषदा व पंयायत समित्या अधिनियम १९६१ यानुसार महाराष्ट्रातील पंचायतीराज काम करतात. पण अनुसूचित क्षेत्रातील ग्रामपंचायती व ग्रामसभांना महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियमाबरोबरच पेसा कायदा अंतर्गत असलेल्या अतिरिक्त जबाबदाऱ्या व हक्क विचारात घेऊन काम करावयाचे आहे. यांची प्रभावी अंमलबजावणी करुन, अनुसूचित क्षेत्रात राहणाऱ्या लोकांच्या हितसंबंधांचे रक्षण करण्याचे आणि त्यासंबंधी प्रभावी अंमलबजावणी सुनिश्चित करण्याचे मुख्य कार्य ग्रामसभांना देण्यात आले आहेत.

**१) पेसा क्षेत्रातील ग्रामसभा**

ग्रामीण ग्रामसभांच्या तुलनेत या आदिवासी क्षेत्रातील ग्रामसभांकडे जास्त विषय आहेत जसे अनुसूचित क्षेत्रातील जमीन संपादन व पुनर्वसन करीता ग्रामसभेची मान्यता, आदिवासींच्या जमीनीच्या हस्तांतरावर निर्बंध, गौण खनिजे, वन उपज, बाजार, गावांतर्गत पाणी साठयांचे नियोजन, आमली पदार्थांची विक्री यावर निर्बंध, सावकारांडून होणारी पिळवणूक थांबविणे इ. पंचायत क्षेत्र विस्तार कायद्यातील तरतूदी प्रत्यक्षात महाराष्ट्रातील ग्रामपंचायतींमध्ये कार्यान्वित करण्यासाठी महाराष्ट्र शासनाने नियम लागू केले आहेत. या नियमामध्ये नमूद केलेल्या तरतूदी पुढे थोडक्यात मांडल्या आहेत.

**२) ग्रामसभेची रचना**

आदिवासी भागात एका ग्रामपंचायतीमध्ये एकाहून अधिक ग्रामसभा असू शकतात. गाव, वस्ती, पाडे हे संबंधित मतदारांच्या ५० टक्के मतांच्या सहाय्याने स्वतंत्र गाव म्हणून मागणी करु शकतात. ही मागणी उपजिल्हाधिकाऱ्यांच्यामार्फत जिल्हाधिकाऱ्याकडे केली जावी व विहीत पध्दतीनुसार मंजूरी मिळाल्यावर त्या गावाला व गावाच्या ग्रामसभेला स्वतंत्र दर्जा प्राप्त होईल.

**३) ग्रामसभेची काही वैशिष्टये**

पेसा क्षेत्रातील ग्रामसभेची ठळक वैशिष्टये पुढीलप्रमाणे आहेत.

- **ग्रामपंचायत व ग्रामसभा** -एका ग्रामपंचायीमध्ये एकाहून अधिक ग्रामसभा असल्या तरी ग्रामपंचायत ही ग्रामसभेची कार्यकारी समिती म्हणून काम बघेल. तसेच ग्रामपंचायतीचा सचिव हा ग्रामसभांचा सचिव असेल.
- **ग्रामसभेचे ठिकाण** -पेसा क्षेत्रातील ग्रामसभा या कुठल्या बंधिस्त ठिकाणी घेतल्या जाणार नाहीत. ग्रामसभेचे कार्यवाही सर्वांना दिसेल व कळेल अशा स्वरुपात जाहिरपणे करण्यात येईल.

- **ग्रामसभेचे अध्यक्षपद -** इतर ग्रामभेच्या बैठकीकरीता अध्यक्षांबाबत तरतूदी या महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियमानुसार आहेत. परंतू जेव्हा सरपंच व उपसरपंच नसतील तेव्हा अनुसूचित जमातीचा सदस्य हा अध्यक्ष निवडला जाईल. जर अनु. जमातींच्या व्यक्तींची संख्या १० टक्केपेक्षा कमी असेल तरच अनुसूचित जमीतीचा नसलेला अध्यक्ष निवडता येईल.
- **ग्रामसभेची गणपूर्ती -** ग्रामसभेला संबंधित गावाच्या लोकसंख्येच्या २५ टक्के किंवा १०० या पैकी जी कमी असेल त्या संख्येएवढी उपस्थिती असेल तर ती ग्राहय धरली जाईल. अन्यथा ती तहकूब केली जाईल. ग्रामसभेत सर्वाच्या सहमतीने निर्णय घेतले जातील. एखाद्या विषयावर सर्व सहमत न झाल्यास तो विषय पुढील ग्रामसभेत ठेवला जाईल. व त्यावर बहुमताने निर्णय घेतला जाईल.
- **ग्रामसभेचे अभिलेख -** पंचायत व ग्रामसभेचे सर्व निर्णय, अभिलेख, दस्तावेज हे सर्व ग्रामस्थांना खुले असते.
- **संयुक्त बैठकी -** जे विषय ग्रामपंचायतीतील इतर गावांशी निगडीत असतील तेथे ग्रामपंचायतीअंतर्गत येणाऱ्या सर्व ग्रामसभांची एकत्रित/ संयुक्त बैठक बोलाविण्यात येईल. अशा बैठकीचा अध्यक्ष हा सर्वानुमते ठरविला जाईल. बैठकीत प्रत्येक ग्रामसभेचे २५ टक्के किंवा १०० यापैकी जी कमी असेल तेवढी उपस्थिती गणपूर्तीकरीता आवश्यक आहे. निर्णय प्रक्रिया ही नेहमीच्या इतर ग्रामसभेनुसार असेल.
- **ग्रामसभेच्या निर्णयावर आक्षेप -** ग्रामसभेच्या कोणत्याही निर्णयाबाबत ग्रामस्थांपैकी कोणाला आक्षेप असेल तर त्याचा पुनर्विचार करण्यासाठी ग्रामसभा घेता येईल. आक्षेप घेणाऱ्या व्यक्तीस व इतर कोणाला गरज वाटत असेल तर तो विषय सोडविण्यासाठी अभिक्षक नेमला जाईल. संबंधित तालुक्याचे गटविकास अधिकारी हा अभिक्षक नेमतील. अभिक्षकाने प्रत्यक्ष ग्रामसभेस उपस्थित राहून प्रश्न सोडविण्यास मदत करावी. जर

त्यानेही प्रश्न सुटला नाही तर हा विषय जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्याकडे नेण्यात येईल.

**४) ग्रामसभेचा अखत्यारीतील विषय**

पेसा क्षेत्रातील ग्रामसभांनी विशेष करुन लक्ष घालण्याचे विषय पुढीलप्रमाणे आहेत. त्यासाठी मार्गदर्शक सूचनांमध्ये काही विशिष्ट कार्यपध्दती आखून दिली आहे.

- **ग्रामसभा लेखे:-** ग्रामसभा एक कोष ठेवेल आणि त्या कोषामध्ये रोख रक्कम आणि माल या दोन्ही स्वरुपाचा असेल. अशा ग्रामसभा कोषाचे नियंत्रण ग्रामसभा करेल. त्यांची नियोजन आणि नियंत्रणाची पध्दती मार्गदर्शक सूचनांमध्ये तपशिलवार दिली जाणार आहे.

- **शांतता व सुरक्षा आणि तंटा मुक्ती:-** गावातील नागरिकांच्या स्वातंत्र्याची जोपासना आणि शांततापूर्ण वातावरण राखण्याची जबाबदारी ग्रामसभेची असेल.

- **नैसर्गिक साधनसंपत्ती, गौण वन्यउपज व जमीन यांचे व्यवस्थापन:-** आदिवासी बहूल क्षेत्रात तेथील वन्यक्षेत्र व त्यातून मिळणारे वन्यउपज महत्त्वाचे आहे. त्यासाठी या भागातील नैसर्गिक संसाधनांचा वापरासोबतच त्यांची जोपासना करण्याची जबाबदारी ही ग्रामसभेची असेल.

- **खाण व खनिजे:-** ग्रामसभेच्या क्षेत्रात असणारी माती, दगड, वाळू आणि इतर गौण खनिजे यांचे उत्खनन व वापर यासाठी नियोजन करणे व त्यांच्या वापरावर योग्य नियंत्रण ठेवणे ही जबाबदारी ग्रामसभेची असेल.

- **मनुष्यबळ:-** केंद्र व राज्य शासनाच्या विविध योजनानुसार ग्रामसभेकरीता योजना तयार करुन ती गावामध्ये राबविणे आणि गावातील प्रत्येक व्यक्तीला काम मिळत असल्याची खात्री ग्रामसभेने घेतली पाहिजे.

- **मादकद्रव्य:-** ग्रामसभेच्या क्षेत्रात मादक पदार्थांचे उत्पादन, सेवन व नियंत्रणाची संपूर्ण जबाबदारी ही ग्रामसभेची असेल.

- **बाजारांचे व्यवस्थापन:-** ग्रामसभेच्या क्षेत्रातील बाजारांना मान्यता देण्याची, त्यांचे नियंत्रण व व्यवस्थापन करण्याची जबाबदारी ग्रामसभेची असेल.
- **सावकारी:-** ग्रामसभेच्या क्षेत्रात सावकारी व कर्जाशी निगडीत विषयांवर ग्रामसभा नियंत्रण ठेवेल.
- **लाभार्थी निवड:-** ग्रामसभेच्या क्षेत्रात विविध शासकीय योजना / कार्यक्रमातर्गंत समर्पक लाभार्थ्यांची निवड करण्याची जबाबदारी ग्रामसभेची असेल.

**५) पेसा क्षेत्रातील ग्रामसभेच्या स्थायी समित्या :**

गावाच्या कारभारातील विविध विषयांवर काम करण्याकरीता ग्रामसभा कर्ज नियंत्रण समिती , बाजार समिती, ग्रामकोष समिती आणि ग्रामसभेस उचित वाटतील अशा इतर समित्या स्थापन करेल. या व्यतिरीक्त ग्रामसभा तात्पुरत्या समित्या देखील स्थापन करु शकेल. या समित्या ग्रामपंचायत व ग्रामसभा या दोन्हीला उत्तरदायी असतील.

- **समितीचे सदस्यत्व -** स्थायी समिती सदस्यांची निवड ग्रामसभेतील उपस्थित सदस्यांमधून करण्यात येईल. समितीमध्ये महिलांचे व समाजातील विविध घटकांचे प्रतिनिधीत्वाबाबत ग्रामसभा निर्णय घेईल. सर्व समित्यांमध्ये महिलांचे प्रतिनिधित्व हे आवश्यक आहे व त्याची संख्या ५० टक्के एकूण सदस्य संख्येपेक्षा कमी नसेल आवश्यकता वाटल्यास समितीमध्ये संबंधित विभागाचा गावाच्या अधिकारीतेतील कर्मचाऱ्यास समितीमध्ये नामनिर्देशित करता येईल परंतु अशा सदस्यास मतदानाचा अधिकार नसेल.
- **समितीचा कार्यकाल -** स्थायी समितीचा कार्यकाल हा स्थापनेपासून २ वर्ष असेल.
- **समितीचे अध्यक्ष व सचिव -** समिती सदस्यांमधून ग्रामसभा अध्यक्ष व सचिवाची निवड करेल.
- **स्थायी समितीची रचना -** ग्रामसभेच्या विविध स्थायी समित्यांची रचना व त्यांच्या अखत्यारितीतील विषयांचे तपशिल पुढीलप्रमाणे आहेत.

- **स्थायी समितीची कार्यपध्दती -** ग्रामसभेने घेतलेल्या निर्णयांची अंमलबजावणी करण्याची जबाबदारी ही संबंधित स्थायी समितीची असेल. या स्थायी समित्या काम करताना पुढील दक्षता घेतील.

- समितीच्या बैठकी खुल्या स्वरुपाच्या असतील
- समितीचा सचिव बैठकीच्या तीन दिवस आधी नोटीस काढेल ज्यात बैठकीची वेळ, ठिकाण, दिनांक व प्रस्तावित कामकाज नमूद केलेले असेल.
- समिती अध्यक्षसह ज्या बैठकीकरीता समितीचे निम्मे सदस्य उपस्थित असतील तर गणपूर्ती होईल.
- ग्रामसभेच्या कोणत्याही सदस्यास समितीच्या बैठकीस उपस्थित राहता येईल पण मतदान करता येणार नाही.
- समितीच्या बैठकीत झालेल्या निर्णयांची नोंदवहीत नोंद ठेवली जाईल व कार्यवृत्तांत सचिव व अध्यक्षाची सही असेल.
- समितीचे निर्णय आणि इतर अभिलेख पुढील ग्रामसभेत मांडण्यात येतील.

सदर पंचायत क्षेत्र विस्तार कायदा १९९६ च्या अधिन राहून विशेष क्षेत्र असलेल्या पालघर जिल्हयाच्या विक्रमगड तालुक्यातील आंबेघर तर्फे धरमपूर या गट ग्रामपंचायतीमधील ग्रामस्थांचे ग्रामसभेतील योगदानाचे संशोधकाने संशोधन केले आहे. या संशोधनातून पंचायत विस्तार क्षेत्रातील ग्रामसभेतील ग्रामस्थांच्या भूमिका व जबाबदाऱ्याची माहीती करुन देण्यासाठी, कायद्याच्या अंमलबजावणीत सुसूत्रता आणण्यासाठी संशोधकाने संशोधनामध्ये प्रयत्न केला आहे. सदर संशोधनातून काही निष्कर्ष आणि सूचना समोर आल्या आहेत त्या संशोधकाने अहवालाच्या शेवटच्या प्रकरणामध्ये नमूद केल्या आहेत.

आदिवासी भाग हा आर्थिक, भौगोलिक आणि सांस्कृतिकदृष्टया ग्रामीण भागापेक्षा भिन्न आहे. या आदिवासी भागामध्ये मोठया प्रमाणावर दारिद्रय व अनेक

समस्या मोठया प्रमाणावर असतात. हा समाज इतर समाजापासून खूप दूरावलेला असल्यामुळे या समाजाचा विकास झालेला नाही.

शासनाने आदिवासी जमातीच्या आर्थिक, सामाजिक व शैक्षणिक विकासासाठी पंचायत क्षेत्र विस्तार कायदा १९९६ लागू केला. परंतू हा कायदा १९९६ साली अस्तित्वात येऊन जवळजवळ २० वर्षे पूर्ण झाली तरी आदिवासी क्षेत्राचा पंचायत क्षेत्र विस्तार कायद्याच्या उद्देशाप्रमाणे विकास झालेला दिसून येत नाही. या उद्देशांप्रमाणे अनुसूचित क्षेत्रातील गट ग्रामपंचायतीच्या ग्रामस्थांचे ग्रामसभेतील योगदान यामध्ये संशोधन केले आहे.[६]

---

प्रस्तूत संशोधन अहवालातील संशोधन विषयाची प्रस्तावना या प्रकरणासाठी पुढील संदर्भांचा उपयोग करण्यात आला.


१. आफळे, मुरलीधर (१९९८). आदिवासी संस्कृती: कला व कथा. औरंगाबाद: सिडको. केदार- एन ४/ सी-१९.

२. देवगांवकर, (डॉ) एस.जी (२०११). आदिवासी विकास प्रशासन. नागपूर: श्री साईनाथ प्रकाशन १ भगवाघर कॉम्प्लेक्स.

३. गारे, (डॉ.) गोविंद (२०१३). आदिवासी समस्या आणि बदलते संदर्भ. पुणे: सुगावा प्रकाशन चित्रशाळा इमारत. पुणे ४११०३०.

४. महाराष्ट्र शासन. आदिवासी विकास विभाग. (२०१५-१६). वार्षिक आदिवासी उपयोजना.

५. ग्रामपंचायत सदस्यांच्या पायाभूत प्रशिक्षण कार्यक्रमाची संदर्भ पुस्तिका (यशदा). ग्राम सेतू प्रकाशक: यशवंतराव चव्हाण विकास प्रकाशन प्रबोधीनी. यशदा राजभवन आवार. बाणेर रोड. पुणे. प्रकाशन. नोव्हेंबर.२०१४

६. ग्रामविकास विभाग मंत्रालय. महाराष्ट शासन. मुंबई पंचायत क्षेत्र विस्तार कायदा.१९९६. (पेसा) प्रकाशक: पेसा कक्ष. राज्य ग्रामिण विकास संस्था. यशवंतराव चव्हाण विकास प्रकाशन प्रबोधीनी (यशदा). पुणे.

७. शासन निर्णय-क्र.व्हिआयपी- २०१२/प्र.क्र.३७/का.१६ दि.२३ जाने.२०१३.

८. महाराष्ट्र शासन. आदिवासी विकास विभा. शासन निर्णय क्र.पेसा अ-२०१५/प्र.क्र.१६६/का.१७ दि.३० सष्टेबर २०१५.

# प्रकरण २ रे

# संदर्भ साहित्याचा आढावा

सदर प्रकरणामध्ये संशोधनाकरीता वापरण्यात आलेल्या संदर्भ साहित्याचा आढावा आणि संशोधकाची निरीक्षणे नोंदविलेली आहेत.

**I) संदर्भ साहित्याचा आढावा**

**१.** आगलावे (डॉ.) प्रदिप (२०००) संशोधन पध्दती - नागपूर, विद्या प्रकाशन. सदर पुस्तिकेमध्ये सामाजिक संशोधनाच्या पध्दतीच्या सामाजिक सर्वेक्षण, सामाजिक संशोधनातील समस्यासुत्रण, गृहितकृत्ये, संशोधन आराखडा, नमुना निवडीचे तंत्र या विषयाच्या माहितीचे विश्लेषण केले आहे. या माहितीचा उपयोग संशोधकाने प्रकरणी करणासाठी वापर केला आहे. व या पुस्तिकेतून संशोधन आराखडयाची माहिती घेण्यात आली आहे.

**२.** आफळे मुरलीधर (१९९८) आदिवासी संस्कृती: कला व कथा, औरंगाबाद, सिडको, केदार- एन ४/ सी-१९. सदर पुस्तिकेमध्ये आदिवासी समाजाची एक दिशा व एक दशा, शासन व्यवस्था आणि आदिवासी समाज, महाराष्ट्र शासन आणि आदिवासी समाज व संस्कृती या माहितीचे लेखन करण्यात आले आहे. या लेखनाचा उपयोग संशोधनकर्त्याने संशोधनाच्या प्रकरणीकरण आणि व्याप्तीसाठी वापर केला आहे. सदर पुस्तिकेतून आदिवासी समाजासाठी शासन व्यवस्था कशा पध्दतीने काम करते याची माहीती घेण्यात आली आहे.

**३.** बरबळे दत्तात्रय चं. (१९९९) स्थानिक स्वराज्य संस्थांमधील महिलांचा राजकीय सहभाग टिळक महाराष्ट विद्यापीठ- एम.फील प्रबंध (अप्रकाशीत) सदर प्रबंधामध्ये स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये महानगरपालिका, नगरपालिका, जिल्हा परिषद, पंचायत समिती, व ग्रामपंचायत यामध्ये महिलांचा असणारा राजकीय सहभाग किती प्रमाणात आहे याचे

विश्लेषण केले आहे. या माहितीचा वापर संधोधन करताना महिलांच्या सहभागाविषयीची माहीती व व्याप्ती याचा अभ्यास करुन त्याचा प्रकरणीकरणासाठी वापर केला आहे.

**४.** देवगांवकर (डॉ) एस.जी (२०११) आदिवासी विकास प्रशासन- नागपूर, श्री साईनाथ प्रकाशन १ भगवाघर कॉम्प्लेक्स. सदर पुस्तिकेमध्ये सरकारची अनेक धोरणे जूनी आणि नवीन आहेत, परंतू त्यांच्या अंमलबजावणीमध्ये अनेक त्रृटी आढळतात. आदिवासी विकासाच्या सुरुवातीपासून ते आजपर्यंतजी वाटचाल झाली त्यामधील यश-अपयशांच्या कारणांची कारणमीमांसा केलेली आहे. म्हणून सदर पुस्तिकेचा उपयोग संशोधनाच्या व्याप्ती आणि प्रकरणीकरणासाठी करण्यात आला आहे. आणि या पुस्तिकेतून संशोधनकर्त्यांने संशोधनासाठी आदिवासी जमातीची माहिती घेतली आहे.

**५.** गारे (डॉ.) गोविंद (२०१३) आदिवासी समस्या आणि बदलते संदर्भ पुणे, सुगावा प्रकाशन चित्रशाळा इमारत ,पुणे ४११०३० पृष्ठ - २५ ते २९ सदर पुस्तिकेमध्ये आदिवासींच्या प्रश्नासंबंधी केलेले चिंतन तसेच वृत्तपत्रांच्या माध्यमांतूनआलेल्या आदिवासी प्रश्नांबाबतच्या समस्यांचे विचार यामध्ये प्राधान्याने मांडलेले आहेत. तसेच आदिवासींच्या विकासासाठी राजकीय विचारधारा व प्रस्थापित राज्यकर्त्यांचा प्रश्नांकडे पाहण्याचा दृष्टिकोन, आदिवासींच्या विकासाच्या वाटचालीतील यश-अपयशातील बारकावे यांचे लेखन केले आहे. म्हणून या लेखनाचा वापर संशोधनकर्त्याने संशोधनाच्या व्याप्ती व प्रकरणीकरणासाठी केला आहे.

**६.** वरकड तू. ता (२०००) आदिवासींच्या अस्तित्वाचे प्रश्न- नागपूर, रामदास पेठ, सेल्फ रिस्पेक्ट मूव्हमेंट ऑफ इंडिजीनस ईप्लॉइज,२०३. सदर पुस्तिकेमध्ये गतकाळातील आदिवासींचे अस्तित्व, आदिवासी क्षेत्राचे विभाजन, आदिवासी विकासाची परिकल्पना, आदिवासी विकासाचा परिहार, विकास प्रक्रियेतील आदिवासी अशी माहिती दिलेली आहे. म्हणून सदर पुस्तिकेतील माहिती संशोधनाच्या व्याप्ती आणि प्रकरणीकरणासाठी

वापर केला आहे. व सदर पुस्तिकेतून आदिवासी समाज व त्या जमातीविषयी संपूर्ण ज्ञान प्राप्त करण्यासाठी उपयोग केला.

**७.** द.कृ. पानमंद (उप. आयुक्त) योजनांची अंमजबजावणी स्थिती आणि आदिवासी जमातींचा विकास- आदिवासी विकास आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, नाशिक. सदर पुस्तिकेमध्ये आदिवासी जमाती, व्यक्ती विकास व क्षेत्रविकासासाठी विचारात घ्यावयाचे घटक, अनुसुचित क्षेत्राचे प्रशासन, प्रशासनाची नैतिक जबाबदारी व आदिवासी जमातीच्या योजना याविषयीची माहिती देण्यात आली आहे. या माहितीचा उपायोग संशोधनाच्या प्रकरणीकरणासाठी करण्यात आला आहे.

**८.** वार्षिक आदिवासी उपयोजना (२०१५-१६), महाराष्ट्र शासन, आदिवासी विकास विभाग. सदर पुस्तिकेमध्ये आदिवासी उपयोजनेविषयी सविस्तर माहीती देण्यात आली आहे. या माहितीचा उपयोग संशोधनकर्त्याने प्रकरणीकरणासाठी केलाआहे. यामधील आदिवासी क्षेत्राची माहिती तसेच आदिवासी उपयोजनेची माहिती घेण्यात आली.

**९.** महाराष्ट्र शासन, आदिवासी विकास विभाग, माहिती पुस्तिका (२०१२-१३) सदर पुस्तिकेमध्ये आदिवासी जमातींच्या योजनांविषयी माहिती दिली आहे. या पुस्तकेतील माहितीचा उपयोग संशोधनकर्त्याने संशोधनाची व्याप्ती तयार करण्यासाठी केला.

**१०.** www.the-sra.org.uk, social Research Association, Ethics Guidelines (२००३). सदर संकेतस्थळावर संशोधन करताना संशोधकाने कोणती तत्वे, मुल्ये, कायदयाचे नियम यांचे सविस्तर वर्णन केलेले आहे. या माहितीचा उपयोग संशोधनकर्त्याने संशोधनाचे साधन म्हणून वापर केला. या संकेतस्थळावरुन संशोधनातील नितीमुल्ये याची माहिती घेण्यात आली.

**११.** www.socialresearchmethods.net/kb/ethics.php, सदर संकेतस्थळावर सामाजिक संशोधनाविषयी मुलभूत माहिती देण्यात आली आहे. या संकेतस्थळावरील माहितीचा उपयोग संशोधनातील नितिमुल्यांचा अभ्यास करण्यासाठी वापर केलाआहे.

**१२.** ग्रामविकास विभाग मंत्रालय, महाराष्ट शासन,मुंबई पंचायत क्षेत्र विस्तार कायदा-१९९६ (पेसा) प्रकाशक:- पेसा कक्ष, राज्य ग्रामिण विकास संस्था, यशवंतराव चव्हाण विकास प्रकाशनप्रबोधीनी (यशदा), पुणे.यातून सविस्तर आढावा घेतला आहे.

**१३.** ग्रामपंचायत सदस्यांच्या पायाभूत प्रशिक्षण कार्यक्रमाची संदर्भ पुस्तिका (यशदा) - ग्राम सेतू प्रकाशक:- यशवंतराव चव्हाण विकास प्रकाशन प्रबोधीनी, यशदा राजभवन आवार, बाणेर रोड, पुणे. प्रकाशन:- नोव्हेंबर,२०१४ पृष्ठ - ६ ते ९ व ३८ ते ४३ या पुस्तिकेतून अनुसूचित क्षेत्रातील ग्रामस्थांना व संबंधित यंत्रणांना या क्षेत्रात करावयाच्या कामाच्या स्वरुपाबद्दल प्रशिक्षणाची माहिती घेतली व त्याचा उपयोग प्रकरणीकरणासाठी उपयोग केला.

**१४.** शासन निर्णय-क्र.व्हिआयपी- २०१२/प्र.क्र.३७/का.१६ दि.२३जाने.२०१३ सदर शासन निर्णयातून अनुसूचित क्षेत्रातील आदिवासी कक्षाची माहिती घेण्यात आली आहे.

**१५.** महाराष्ट्र शासन, आदिवासी विकास विभा, शासन निर्णय क्र.पेसा अ-२०१५/प्र.क्र.१६६/का.१७ दि.३० सप्टेबर २०१५. यामधून पालघर जिल्हयातील अनुसूचित क्षेत्र असणाऱ्या गावांची यादी घेण्यात आली.

**१६.** महाराष्ट्रशासन राजपत्र असाधारण भागचार ब मार्च-४, २०१४ पुस्तिकेत सदर पुस्तिकेतून महाराष्ट्रातील अनुसूचित क्षेत्रातील गावांच्या संख्येची माहिती घेण्यात आली आहे.

उपरोक्त संदर्भ साहित्य १ चा उपयोग संशोधन कर्त्याने संशोधन पध्दती तयार करण्यासाठी वापर केला आहे. तर उर्वरित संदर्भ साहित्याचा उपयोग संशोधनाच्या

प्रकरणीकरणासाठी व प्रत्यक्ष क्षेत्रात संशोधन करताना वापर करण्यात आला. त्याचे सविस्तर मांडणी पाचव्या प्रकरणामध्ये करण्यात आली आहे.

संशोधन अभ्यास करताना संशोधनकर्त्याने केलेली निरीक्षणे पुढीलप्रमाणे सादर करण्यात आली आहेत.

## II. निरीक्षणे :

१. पावसाळ्यात शेती करणे व उन्हाळ्यात तालुक्याच्या किंवा जिल्ह्याच्या ठिकाणी जिथे काममिळेल अशा ठिकाणी जाऊन बांधकामावरती मोलमजूरी करणे अशा उदरनिर्वाहाचे साधन आंबेघर तर्फे धरमपूर या ग्रामपंचायतीमधील ग्रामस्थांचे असल्याचे दिसून आले.

२. ग्रामपंचायतीमध्ये रोजगाराची सोय नाही

३. या ग्रामपंचातीच्या हद्दीत प्रवासासाठी बसची सुविधा नाही.

४. आंबेघर तर्फे धरमपूर ग्रामपंचायतीच्या आंबेघर आणि धामणी या दोन गावांमध्ये डोंगर असल्याने ४ ते ५ किमीचे अंतर आहे.

५. ग्रामसेवक व सरपंच गावामध्ये येत नाहीत असे समजले.

६. ग्रामपंचायतीच्या पाड्यांवरती रस्त्याची सुविधा नाही.

७. ग्रामपंचायतीच्या हद्दीमध्ये कोणीही शेतीतून नफा मिळविण्यासाठी शेती करीत नाही तर फक्त उरनिर्वाहासाठी लागेल तेवढेच पीक घेतले जाते.

८. मुलींमध्ये शिक्षणाचे प्रमाण खूप कमी प्रमाणात दिसून आले.

९. गट ग्रामपंचायत असल्याने ग्रामसभेमध्ये भांडणे होतात असे समजले.

१०. ग्रामसभा ही ग्रामपंचायत कार्यालयामध्ये होत व दोन गावातील अंतर जास्त असल्याने लोक ग्रामसभेला येण्याचे टाळतात.

११. ग्रामसभा असल्याविषयीची माहिती ग्रामसभांना ऐनवेळेस दिली जाते. त्यामुळे ग्रामस्थ ग्रामसभेला कमी असतात.

१२. ग्रामसभेला सुशिक्षित तरुण येत नसल्याचे समजले.

१३. दारु बंदी करण्यास सर्व गावकरी तयार होत नाहीत कारण दारु पिणाऱ्यांचे प्रमाण जास्त असल्याचे दिसून आले.

१४. ग्रामपंचायतीमध्ये ८ वी नंतरच्या शिक्षणाची सोय नाही

१५. उन्हाळ्यात पिण्याच्या पाण्याची गैरसोय होते.

१६. प्रत्येक घरामध्ये शौचालयाची सोय नाही.

# प्रकरण ३ रे

# संशोधन पध्दती

सदर प्रकरणामध्ये संशोधन पध्दतीच्या आराखडयाविषयी माहिती देण्यात आली आहे. यामध्ये अभ्यास विषयाची व्याप्ती, अभ्यास विषयाचे महत्त्व, संशोधनातील नितीमुल्ये, अभ्यासविषयातील उद्दिष्टे, चलपदे, गृहितकृत्ये, संशोधन प्रश्न, संकल्पनाची कार्यवाही व्याख्या, माहिती मिळविण्याचे स्त्रोत, संशोधन आराखडा, नमूना आराखडा, तथ्थे संकलनाची पध्दत, व अभ्यासविषयातील मर्यादा याविषयी माहिती देण्यात आली आहे.

**१) समस्यासुत्रण:-**

आंबेघर तर्फे धरमपूर ही गट ग्रामपंचायत अनुसुचित क्षेत्रात येत असून या गट ग्रामपंचायतीची एकूण लोकसंख्या २२४४ एवढी असून त्यापैकी ११०३ महिला व ११४१ पुरुषांची संख्या आहे. ही गट ग्रामपंचायत ग्रामीण भागापासून वेगळी आहे. हा गट ग्रामपंचायतीचा भाग तालुक्याच्या ठिकाणापासून ४० कि.मी अंतरावर लांब व डोंगराच्या पायथ्याशी वसलेला आहे. त्यामुळे हया भागाचा विकास होऊ शकला नाही. त्यासाठी शासनाने अशा भागाचा विकास करण्यासाठी ७३ वी घटनादुरुस्ती व पंचायत क्षेत्र विस्तार १९९६ कायदयानुसार ग्रामपंचायतीच्या ग्रामसभेला विशेष महत्व दिले आहे. आणि मी स्वत: अनुसुचित क्षेत्रातील ग्रामस्थ/ नागरिक असल्यामुळे ग्रामपंचायतीच्या ग्रामसभेतील योगदान महत्त्वाचे असल्याने मी सदर अभ्यास विषयाची निवड केली आहे.

देशाचा इतिहास आपण अभ्यासला तर आपल्याला असे दिसते की, आदिवासी जमाती विकास प्रक्रियेत दुर्लक्षित राहिल्या आहेत. अनुसूचित जमाती राहत असलेली जागा व कसत असलेल्या पारंपारीक शेत जमिनी हयांचा वन संरक्षणाच्या तरतूदीमुळे विकास होऊ शकला नाही. इंग्रजांच्या काळात आदिवासींची स्वतंत्र्य सांस्कृतिक ओळख व अस्तित्व नाकारले गेल्याचे आपल्याला दिसते. तसेच स्वातंत्र्योत्तर काळाच्या सुरुवातीला आदिवासी विकासाच्या धोरणाबाबत अनेक वाद निर्माण झाले.

स्वातंत्र्यानंतर देशातील जनतेच्या विकासाच्या गरजा पूर्ण करत जगातील पातळीवर भारताला स्थान मिळवून देण्याचे मोठे आवाहन पुढे होते, त्याचबरोबर आदिवासी समुदायाला मुख्य प्रवाहात आणण्यासाठी मोठी जबाबदारी होती.स्वतंत्र्य भारताने लोकशाही स्विकारली.लोकशाही पध्दतीने देश चालविण्याकरीता संविधान तयार करण्यासाठी जबाबदारी संविधान सभेवर सोपीवली भारताच्या सर्व भागांतून प्रतिनिधी या सभेत निवडून आले.यामध्ये श्री.जयसिंग पाल सिंग मुंडा हे बिहार भागातून निवडून आले. ते स्वत: आदिवासी असून त्यांनी संविधानाचा मसूदा तयार करतांना विविध मुददयांवर आदिवासींची बाजू वेळोवेळी मांडली. या संविधान सभेने तयार केलेल्या संविधानात आदिवासींना भारताचे नागरिक म्हणून समान हक्क देण्यात आले.(संविधान भाग-३ मुलभूत हक्क) सर्वांना समान हक्क देऊनही आदिवासींकरीता विशेष तरतूद करण्यात आली. कारण ते ग्रामीण (बिगर आदिवासी) क्षेत्रापेक्षा निराळे होते.आदिवासी क्षेत्राची सांस्कृतिकआदिवासी जडण-घडण, रुढी, परंपरा व त्यांची न्याय निवाडयाच्या पध्दती हे भिन्न असल्याने त्यांचा सर्वकष विचार करण्याची आवश्यकता होती. ही आवश्यकता लक्षात घेऊन संविधानाच्या भाग दहा कलम २४४ अन्वये भारतातील आदिवासी बहूल भाग हे अनुसुचित क्षेत्र म्हणून घोषित करण्यात आला.या कलमाबरोबरच २ अनुसूची जोडण्यात आल्या यामध्ये या अनुसूचित क्षेत्राच्या प्रशासनाबाबत स्वतंत्र्य तरतुदी दिल्या आहेत.

**अनुसूची ६ -** यात आसाम व मेघालय, त्रिपूरा व मिझोराम ही राज्ये वगळता येणारी राज्ये व तेथील घोषित केलेला भाग समाविष्ट करण्यात आला व त्याप्रमाणे तेथील प्रशासकीय तरतुदी मांडल्या आहेत.

**अनुसूची ५ -** यात आसाम व मेघालय, त्रिपूरा व मिझोराम ही राज्ये तेथील घोषित केलेला भाग समाविष्ट करण्यात आला त्याचबरोबर या भागांतील प्रशासन कसे असावे याबाबत सूचना दिल्या आहेत.

या बदलाने आदिवासी जमातींच्या गरजांकडे वेगळया व स्वतंत्र्य पध्दतीने बघायला सुरुवात झाली.

भारतामध्ये २०११ च्या जनगणनेनुसार भारतात ८.६३% तर महाराष्ट्रामध्ये ९.३५% आदिवासी लोक आहेत. महाराष्ट्रात भारताच्या एकूण आदिवासी लोकसंख्येपैकी १०.०५% अनुसूचित जमातीचे लोक आहेत.केंद्र शासनाने ज्या विभागात अनु. जमातीची लोकसंख्या अधिक आहे. व राज्य सरकारने अनुसूचित क्षेत्र म्हणून घोषित केले आहे. असे शासनाच्या १९८५ च्या अधिसूचनेप्रमाणे महाराष्ट्र राज्यातील १२ जिल्हयातील ५६९१ गावांचा समावेश होतो. पेसा कायदयातील तरतूदी या गावांना लागू होतात.आपल्या देशातील अनुसूचीत क्षेत्रातील गावांना पंचायत क्षेत्र विस्तार कायदा १९९६ ने स्वयंशासनाचा अधिकार दिला आहे.या कायदयामध्ये आदिवासींच्या जीवनामध्ये खूप मोठा बदल घडवून आणण्याची क्षमता आहे.या कायदयाला पूरक ठरतील असे कायदे करणे किंवा आहे त्या कायदयामध्ये बदल करणे अशी कार्यवाही शासन करीत आहे.याचाच एक भाग म्हणून महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम १९५८ मध्ये सुधारणा करुन अनुसूचित क्षेत्रातील ग्रामसभेला फार मोठे अधिकार दिले आहेत.

आदिवासी भाग हा आर्थिक भौगोलिक आणि सांस्कृतिकदृष्टया ग्रामीण भागापेक्षा वेगळा आहे.हया भागाचे वेगळेपण ओळखून व अभ्यासून त्या भागाकरीता संविधानात जशा विशेष तरतूदी करण्यात आल्या तशाच त्याला अनुसरुन विविध योजना व कार्यक्रम आखण्यात आले आहेत. आदिवासी भागांतील वैविध्यपूर्ण सामाजिक आणि सांस्कृतिक परंपरा लक्षात घेता तेथील स्थानिक स्वराज्य संस्थांची रचना व कार्य समर्पक असावे यासाठी १९९६ साली पंचायत क्षेत्र विस्तार कायदा (PESA) अस्तित्वात आला.

सन १९९३ च्या पूर्वी पंचायतराज चे अस्तित्व राज्य सत्ताधिशांच्या इच्छाशक्तीवर होते.दुरुस्ती होण्यापुर्वी अगदी पंचायतराज व्यवस्था चांगली आहे. असे असणा-या राज्यात देखील पंचायतराजच्या निवडणूका दहा ते बारा वर्षांनी होत होत्या. पंचायतराज व्यवस्था समक्ष करण्यासाठी ही स्थिती चांगली नव्हती.तिच्यामधील सातत्य त्यामुळे संपत होते.लोक प्रतिनिधी शिवाय पंचायतराज व्यवस्था म्हणजे या व्यवस्थेच्या मूळ हेतूचाच परावभ ही स्थिती संपवणे आवश्यक होते.त्यासाठी घटनेतच तरतूद आवश्यक होती.घटनादुरुस्ती केल्यानेच सर्व राज्यांमध्ये पंचायतराज व्यवस्थेचे किमान स्वरुप आकारास येऊ शकते कारण ऐच्छिक न राहता प्रत्येक

राज्यांवर बंधनकारक होते. त्याकरीता भारताच्या असलेल्या घटनेत(संविधान) दुरुस्ती करुन पंचायतराजकरीता स्वतंत्र्य स्थान दिले. त्यालाच ७३ वी घटना दुरुस्ती झाली असे म्हणतात.

७३ व्या घटनादुरुस्ती पूर्वी पंचायतराज व्यवस्थेचे भौगोलिक विकेंद्रीकरण झाले होते. कोणत्याही ठिकाणी (भौगोलिक अर्थाने) ती एकवटलेली नव्हती.पण सामाजिक अर्थाने ती एकवटलेली होती.विशिष्ट मोजक्या समाज घटकांच्या हातात सत्ता वर्ग झाली होती.परंतू सामाजिक कमकुवत घटक आहेत ते पंचायत व्यवस्थेपासून वंचित होते.त्यांना या व्यवस्थेत आणणे गरजेचे होते आणि सर्वांना प्रतिनिधित्व देणे गरजेचे होते.यासाठी घटनेत दुरुस्ती करणे गरजेचे होते व ती घटनादुरुस्ती १९९३ साली ७३ व्या घटनादुरुस्तीने करुन तीन घटकांसाठी आरक्षण दिले गेले.

१. अनुसूचित जाती / जमाती त्यांच्या समाजातील लोकसंख्येच्या प्रमाणात आरक्षण
२. इतर मागास प्रवर्ग - २७ टक्के आरक्षण
३. महिलांसाठी ७३ व्या घटनादुरुस्तीने केंद्रात ३३ टक्के आरक्षण तर महाराष्ट्र राज्यामध्ये अनु. जाती व जमातीच्या एकूण लोकसंख्येपैकी ५० टक्के तर इतर मागास प्रवर्गाच्या महिलांसाठी ५० टक्के तर खूल्या वर्गातील महिलांसाठी सुध्दा ५० टक्के आरक्षण घटनादुरुस्तीने दिले.

त्याचप्रमाणे ७३ व्या घटनादुरुस्ती जिल्हा परिषदा व पंचायत समिती अधिनियम १९६१ व महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम १९५८ नुसार होणाऱ्या ग्रामपंचायतीमधील ग्रामसभा हया एका वित्तिय वर्षात ४ बैठका ह्या झाल्याच पाहिजेत अशा नियम तयार केला गेला. त्यामुळे ग्रामपंचायतीला विशेष महत्त्व प्राप्त झाले.

शासन स्तरावरुन आदिवासी जमातीच्या आर्थिक, सामाजिक व शैक्षणिक विकासासाठी विशेष धोरणात्मक काम करता यावे यासाठी अनेक योजनांची आणखी करण्यात आली.या योजना प्रभावीपणे राबविण्यासाठी १९८३ साली स्वतंत्र आदिवासी विभागाची स्थापना करण्यात आली.या विभागाच्या माध्यमातून जलद गतीने आदिवासी क्षेत्राचा व समुदायांचा विकास

करण्यासाठी महत्त्वाकांक्षी प्रयत्न करण्यात आले. परंतु असे असताना वन्य जीवन संरक्षण अधिनियम व वन संवर्धन अधिनियमाने तयार झालेल्या वातावरणामुळे आदिवासी जनसमुदाय, विविध सामाजिक संस्था व शासन यांच्या पुढाकाराने आदिवासी समुदायाच्या हक्क व अधिकारांना संरक्षण देणाऱ्या स्वतंत्र कायदयाची मागणी पुढे आली. दरम्यानच्या काळात विकेंद्रीकरणाची आवश्यकता पाहता ७३ वी घटना दुरुस्ती करुन पंचायती राज संस्थांना घटनात्मक दर्जा देण्यात आला व त्यांची स्थापना ही सर्व राज्यांवर बंधनकारक करण्यात आली. या पार्श्वभूमीवर पंचायत क्षेत्र विस्तार कायदा १९९६ अस्तित्वात आला. ज्यादारे अनुसूचीत भागांतील स्थानिक स्वराज्य संस्थांना विशेष अधिकार देण्यात आले.पेसा कायदयाअंतर्गत असलेल्या तरतूदी या विशेषकरुन अनुसुचित भागांकरीता असून त्या ७३ व्या घटना दुरुस्तीशी सुसंगत आहेत.

अनुसुचित क्षेत्रातील आदिवासी जमातींच्या परंपरा व रुढी, त्यांची सांस्कृतिक ओळख, सामुहिक साधनसंपत्ती आणि तंटा निवारण्याची रुढ पध्दती आणि गौण उत्पादनावरील मालकी इत्यादींचे रक्षण व जतन करण्यासाठी अनुसूचित क्षेत्रातील ग्रामसभांना व पंचायतींना विशेष अधिकार या अधिनियमाने प्राप्त झाले आहेत. महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम १९५८ व जिल्हा परिषद व पंचायत समित्या अधिनियम १९६१ यानुसार महाराष्ट्रातील पंचायतराज काम करते. पण अनुसूचित क्षेत्रातील ग्रामपंचायती व ग्रामसभांना महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियमाबरोबरच पेसा कायदा अंतर्गत असलेल्या अनुसूचित क्षेत्रातील आदिवासी जमातींच्या परंपरा व रुढी, त्यांची सांस्कृतिक ओळख, सामुहिक साधनसंपत्ती आणि तंटा निवारण्याची रुढ पध्दती आणि गौण उत्पादनावरील मालकी इत्यादींचे रक्षण व जतन करण्यासाठी अनुसूचित क्षेत्रातील ग्रामसभांना व पंचायतींना विशेष अधिकार या अधिनियमाने प्राप्त झाले आहेत. महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम १९५८ व जिल्हा परिषदा व पंचायत समित्या अधिनियम १९६१ यानुसार महाराष्ट्रातील पंचायतराज संस्था काम करतात.पण अनुसूचित क्षेत्रातील ग्रामपंचायती व ग्रामसभांना महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियमाबरोबरच पेसा कायदयाअंतर्गत असलेल्या अतिरिक्त जबाबदाऱ्या व हक्क विचारात घेऊन काम करावयाचे आहे.यांची अंमलबजावणी करुन,

अनुसूचित क्षेत्रात राहणाऱ्या लोकांच्या हितसंबंधाचे रक्षण करण्याचे अणि त्यासंबंधीचे प्रभावी अंमलबजावणी सुनिश्चित करण्याचे मुख्य कार्य ग्रामसभांना देण्यात आले आहेत.

ग्रामीण ग्रामसभांच्या तुलनेत या आदिवासी क्षेत्रातील ग्रामसभांकडे जास्त विषय आहेत जसे अनु.क्षेत्रातील जमीन संपादन व पुर्नवसन करीता ग्रामसभेची मान्यता. आदिवासींच्या जमिनीच्या हस्तातरावर निर्बंध. गौण खनिजे, वन उपज, बाजार, गावांतर्गत पाणी साठयांचे नियोजन, अंमली पदार्थांची विक्री, सेवन यावर निर्बंध, सावकारांकडून होणारी पिळवणूक थांबविणे, इत्यादी पंचायत क्षेत्र विस्तार कायदयातील तरतूदी प्रत्यक्षात महाराष्ट्रातील ग्रामपंचायतीमध्ये कार्यान्वित करण्यासाठी महाराष्ट्र शासनाने नियम लागू केले आहेत. यामध्ये १) ग्रामसभेची रचना २) ग्रामसभेची वैशिष्टये ३) ग्रामसभेच्या अखत्यारीतील विषय ४) पेसा क्षेत्रातील ग्रामसभेच्या स्थायी समित्या तसेच २०१३ च्या शासन निर्णयानुसार मा.राज्यपाल यांच्या कार्यालयामध्ये आदिवासी कक्ष स्थापन करुन त्याच्याव्दारे अनुसूचित क्षेत्राचा वार्षिक अहवाल तयार करुन आदिवासी भागाच्या विकासाचा आढावा घेतला गेला.

अशाप्रकारच्या विविध तरतूदी अनुसूचित क्षेत्रासाठी करण्यात आल्या आहेत. परंतु भारत देश स्वातंत्र्य होऊन ६८ वर्षे पूर्ण झाली तरी आदिवासी भाग इतर समाजाच्यामानाने खूप मागासलेला आहे. व जरी विकासाच्या दृष्टिने अनुसूचित क्षेत्रासाठी पंचायत क्षेत्र विस्तार कायदा तयार केला व त्याव्दारे आदिवासी क्षेत्राचा विकास करण्यासाठी प्रयत्न केले जात आहेत.परंतू हा कायदा लागू होऊन २० वर्षे झाली. तरी पण अनुसूचित क्षेत्राचा विकास झाल्याचे दिसून येत नाही. कारण या अनुसुचित क्षेत्रातील पारंपारिक पध्दतीने केली जाणारी शेती, पायाभूत सोय-सुविधांचा अभाव यामध्ये रस्ते, पाणी, दळणवळण सोयीचा अभाव, आरोग्य, शिक्षण, रोजगार यांचा अभाव अशा विविध समस्या तसेच अनुसुचित क्षेत्रातील लोकांमध्ये असलेल्या समस्या व्यासनाधिनता, कुटुंबनियोजनाचा अभाव, बालविवाह अशा विविध कारणांमुळे त्या क्षेत्राचा विकास झालेला दिसून येत नाही. परंतु या कारणांवर मात करण्यासाठी ग्रामपंचायतीच्या ग्रामसभा ही एक खूप मोठी ताकद आहे. आणि त्यासाठी यामध्ये ग्रामपंचायतीतील ग्रामस्थांचे

योगदान खूप महत्त्वाचे आहे. म्हणून मी सदर आंबेघर तर्फे धरमपूर या गट ग्रामपंचायतीच्या ग्रामस्थांचे योगदान या अभ्यास विषयाची निवड केली आहे.

**२) संदर्भ साहित्याचा आढावा:-**

प्रस्तुत संशोधनाकरीता संदर्भ साहित्याचा आढावा घेण्यात आला आहे. परंतू सदर संदर्भ साहित्याच्या आढाव्याविषयी प्रकरण क्र. २ मध्ये सविस्तर स्वरुपात मांडण्यात आले आहे.

**३) अभ्यास विषयाची व्याप्ती:-**

- **भौगोलिक व्याप्ती** - सदर अभ्यास विषयाच्या संशोधनासाठी अनुसूचित क्षेत्र असलेल्या पालघरजिल्हयामधील जव्हार, विक्रमगड, तलासरी, डहाणू, मोखाडा, वाडा यांचा अनुसूचित क्षेत्रात समावेश होतो. या अनुसूचित क्षेत्रातील विक्रमगड तालुक्यातील १०० गावे हे अनुसूचित क्षेत्रामध्ये येत असून त्यामधीलआंबेघर तर्फे धरमपूर या गट ग्रामपंचायतीचा अभ्यास क्षेत्र म्हणून निवड केली आहे. या गट ग्रामपंचायतीतील आंबेघर आणि धामणी या गावांचा अभ्यास केला.

- **विषयव्याप्ती** -अनुसूचित क्षेत्रामधील गट ग्रामपंचायतीच्या ग्रामस्थांचे ग्रामसभेतील योगदानअभ्यास विषयाच्या संशोधनासाठी संशोधनकर्त्यांने आदिवासी जनतेचे हक्क, संस्कृती/रितीरिवाज, घटनात्मक तरतूदी, आजवर आदिवासी जमातीच्या विकासासाठी केलेले प्रयत्न व त्यामध्ये आलेल्या अडचणी व त्यावरील उपयोजना जनतेच्या माहितीसाठी सुविधा, ग्रामसभा स्थापनेचा उददेश, ग्रामस्थांची भुमिका व त्या अनुषंगाने करावयाची कार्यवाही, विकासासाठी सुरु केलेली कार्यवाही व झालेले निर्णय,शिक्षणाचा अभाव, अनारोग्य, अविकसित शेती / पारंपारिक शेती, पारंपारिक व्यवसाय, भूमिहीन, बेघर, शेतमजूरी, अल्पउत्पन्न, अमर्याद गरजा, अज्ञान / अंधश्रध्दा, दारिद्रय, सिंचन विरहीत शेती, उदयोगधंदयांचा अभाव, दळणवळणाच्या साधनांचा अभाव किंवा बारामाही रस्त्यांचा अभाव, स्थानिक रोजगाराचा अभाव, ऊर्जा, सार्वजनिक आरोग्यकेंद्रात

मुलभूत सुविधा व कर्मचा-यांची कमतरता, पाणी टंचाई अशा प्रकारे सदर संशोधनकरताना शैक्षणिक, आर्थिक, सामाजिक, राजकीय, सांस्कृतिक या विषयाबाबतची माहिती उत्तरदात्यांना प्रश्न विचारुन माहिती घेतली.

**४) अभ्यास विषयाचे महत्व:-**

अनुसूचित क्षेत्रामधील गट ग्रामपंचायतीच्या ग्रामस्थांचे ग्रामसभेतील योगदान या संशोधन अभ्यास विषयामुळे केंद्र शासन व राज्य शासन तसेच स्वयंसेवी संस्था यांना आदिवासी नागरिकांसाठी योजना तयार करताना किंवा आदिवासी क्षेत्रामध्ये काम करताना मदत होईल, त्याचप्रमाणे अनुसूचीत क्षेत्र विस्तार कायदयाअंतर्गत येणाऱ्या ग्रामपंचायतीतील सभासदांना त्यांची भूमिकामाहिती होईल.तसेच इतर संशोधन कर्त्यास या संशोधनाचा पुढील संशोधन करण्यात मदत होईल.

**५) संशोधनातील नीतीमुल्ये:**

- सदर संशोधनकार्य करताना संशोधनासाठीचे सर्व नैतिक मुल्ये, तत्त्वे,नियमावलींचा संशोधनकर्त्याकडून योग्य प्रकारे वापर केला.
- संशोधन विषय अभ्यासासाठी सर्व अटी, शर्ती, व वेळेच बंधन पाळले गेले.
- संशोधक या नात्याने तथ्थे संकलन करताना विषयाला अनुसरुन सर्व नियम पाळले आहेत.
- अभ्यास विषयाचा हेतू पूर्ण करण्यासाठी ध्येय, उद्दिष्टये, गृहितकृत्ये, धोरण यांची पडताळणीकेली.
- संशोधनासाठी वैयक्तिक आणि सामुहिक स्वरुपाची मदत घेतली.
- संशोधनाची तथ्थे संकलन करताना संशोधन अभ्यास विषयाची सर्व माहिती उत्तरदात्यांना दिली.
- संशोधन करताना वैज्ञानिक पध्दतीचा वापर केला गेला.
- तथ्थे संकलन करताना कोणताही पूर्वग्रह ठेवलेला नव्हता.
- सर्व तथ्थे वस्तूनिष्ठ स्वरुपाचे घेतले.

- अनुसूचित क्षेत्रामधील गट ग्रामपंचायतीच्या ग्रामस्थांचे ग्रामसभेतील योगदान या अभ्यास विषयाचीतथ्थे संकलन करताना कोणाचीही फसवणूक केलेली नाही.
- आंबेघर तर्फे धरमपूर या संशोधन क्षेत्रात जाऊन तथ्थे संकलन करताना संशोधकाने स्वत: ला व इतरांना कोणाला काही धोका निर्माण होणार नाही याची काळजी घेतली.
- संशोधन करताना शासनाच्या नियमांचे पालन करुन संशोधन केले.
- तथ्थे संकलन केल्यानंतर उपलब्ध झालेल्या माहितीचे योग्य प्रकारे वर्गीकरण करुन आलेले निष्कर्ष सादर केले.

अशा प्रकारे संशोधन करताना संशोधनासाठी वापरले जाणारी सर्व नैतिकमुल्यांचायोग्य प्रकारे वापर करुन अनुसुचित क्षेत्रातील आंबेघर तर्फे धरमपूर या ग्रामपंचायतीच्या ग्रामस्थांचेग्रामसभेतील योगदान या विषयी संशोधन केले.

**६) अभ्यासविषयातील उद्दिष्टये:-**

१) अनुसूचीत क्षेत्रातील ग्रामपंचायतीच्या ग्रामसभेची कार्यपध्दती अभ्यासणे.

२) आंबेघर तर्फे धरमपूर गट ग्रामपंचायतीची सध्यस्थिती अभ्यासणे.

३) आंबेघर तर्फे धरमपूर गट ग्रामपंचायतीने केलेल्या विकास कामाचा आढावा घेणे.

४) आंबेघर तर्फे धरमपूर गट ग्रामपंचायतीच्या ग्रामस्थांची आर्थिक स्थिती अभ्यासणे.

५) अनुसूचीत क्षेत्रातील आंबेघर तर्फे धरमपूर गट ग्रामपंचायतीच्या ग्रामसभेतील सभासदांचे योगदान अभ्यासणे.

६) अनुसूचीत क्षेत्रातील आंबेघर तर्फे धरमपूर गट ग्रामपंचायतीतील सभासदांचा ग्रामसभेकडे बघण्याचा दृष्टिकोण अभ्यासणे.

७) अनुसुचित क्षेत्रातील गट ग्रामपंचायत आंबेघर तर्फे धरमपूर गट ग्रामपंचायतीचे भावी नियोजन अभ्यासणे.

८) अनुसुचित क्षेत्रातील गट ग्रामपंचायत आंबेघर तर्फे धरमपूर गट ग्रामपंचायतीच्या सभासदांमध्ये पेसा कायद्याविषयी असणारी जनजागृती अभ्यासणे.

**७) अभ्यासविषयातील चलपदे:-**

| स्वतंत्र्य चल | | अवलंबित्व चल |
|---|---|---|
| १) शिक्षण | - | i) जाणीवजागृती |
| | | ii) विकास |
| २) लोकांचा सहभाग | - | i) निर्णय घेण्यास मदत |
| | | ii) अंमलबजावणी |
| ३) आर्थिक स्थिती | - | i) राहणीमान |
| | | ii) सामाजिक दर्जा/ स्थान |

**८) गृहितकृत्ये:-**

- ग्रामपंचायतीच्या ग्रामसभेमध्ये लोकसहभाग वाढल्यास गावाचा अधिक विकास होण्यास मदत होईल.
- ग्रामस्थांनी ग्रामसभेमध्ये एकत्र येऊन आपल्या ग्रामपंचायतीतील समस्यांवर चर्चा करुन समस्या सोडविण्यासाठी पयत्न केल्यास गावाच्या समस्या कमी होऊ शकतात.

**९) संशोधन प्रश्न:-**

१) अनुसूचीत क्षेत्रातील ग्रामपंचायतीच्या ग्रामसभेची कार्यपध्दती कशी आहे?

२) आंबेघर तर्फे धरमपूर गट ग्रामपंचायतीची सध्यस्थिती कशी आहे?

३) आंबेघर तर्फे धरमपूर गट ग्रामपंचायतीने कोणती विकास कामे केली आहेत?

४) आंबेघर तर्फे धरमपूर गट ग्रामपंचायतीच्या ग्रामस्थांची आर्थिक स्थिती कशी आहे?

५) अनुसूचीत क्षेत्रातील आंबेघर तर्फे धरमपूर गट ग्रामपंचायतीच्या ग्रामसभेतील सभासदांचे योगदान कसे आहे?

६) अनुसूचीत क्षेत्रातील आंबेघर तर्फे धरमपूर गट ग्रामपंचायतीतील सभासदांचा ग्रामसभेकडे बघण्याचा दृष्टिकोण कश्याप्रकारचा आहे?

७) अनुसुचित क्षेत्रातील आंबेघर तर्फे धरमपूर गट ग्रामपंचायतीमधील शैक्षणिक स्थिती कशी आहे?

८) अनुसुचित क्षेत्रातील आंबेघर तर्फे धरमपूर गट ग्रामपंचायतीचे भावी नियोजन कोणते आहे?

**१०) संकल्पनांची कार्यवाही व्याख्या:-**

- **अनुसुचित क्षेत्र** - विक्रमगड तालुक्यातील आंबेघर तर्फे धरमपूर गट ग्रामपंचायतीच्याभौगोलिक क्षेत्रात एकूण लोकसंख्येपैकी आदिवासी जमातीची लोकसंख्या निम्म्यापेक्षा अधिक आहे. व राष्ट्रपतींनी आदिवासी क्षेत्र म्हणून घोषित केलेले आहे. म्हणून या क्षेत्राला अनुसुचित क्षेत्र असे म्हणतात.

- **गट ग्रामपंचायत** -विक्रमगड तालुक्यातील आंबेघर तर्फे धरमपूर ग्रामपंचायतीच्या आंबेघर आणि धामणी या दोन गावांची लोकसंख्या ६०० पेक्षा कमी आहे, म्हणून या दोन गावांची मिळून गट ग्रामपंचायत तयार केली आहे.

**११) माहितीचे स्त्रोत:-** अनुसूचित क्षेत्रामधील गट ग्रामपंचायतीच्या ग्रामस्थांचे ग्रामसभेतील योगदान या संशोधन अभ्यास विषयाची तथ्थे संकलनासाठी प्राथमिक आणि दुय्यम स्त्रोतांचा वापर केला.

- **प्राथमिक स्त्रोत:-** संशोधनकर्ता आंबेघर तर्फे धरमपूर या गट ग्रामपंचायतीच्या प्रत्यक्ष क्षेत्रात जाऊन निरीक्षण, मुलाखत व मुलाखत अनुसूची या स्त्रोतांचा वापर करुन तथ्थे संकलन केली.

- **दुय्यम स्त्रोत:-** यामध्ये प्रकाशित-आयोग व समितीचे अहवाल, शासकीय, गॅजेटिसर, संशोधन संस्था, पुस्तके, वर्तमानपत्रे, मासिके तर अप्रकाशित- शासकीय रेकॉर्ड, संशोधन अहवाल यांचा तथ्थे संकलनासाठी द्वितीय स्त्रोत म्हणून वापर केला.

**१२) संशोधन आराखडा:-**

सदर संशोधन अभ्यास विषयासाठी वर्णनात्मक संशोधन आराखडा वापरण्यात आला. कारण आंबेघर तर्फे धरमपूर या गट ग्रामपंचायतीच्या अनुसुचित क्षेत्राविषयी व तेथील ग्रामस्थांविषयी माहिती मिळाली. तसेच ग्रामस्थांचे योगदान, ग्रामपंचायतीची सद्यस्थिती ग्रामसभेची कार्यपध्दती, ग्रामस्थांचे योगदान यांचे स्पष्टीकरण करण्यासाठी स्पष्टीकरणात्मक संशोधन आराखडयाचा वापर केला. अशाप्रकारे सदर संशोधनात वर्णनात्मक संशोधन आराखडा व स्पष्टीकरणात्मक संशोधन आराखडा असा मिश्र संशोधन आराखडयाचा वापर केला.

**१३) नमुना आराखडा:-**

- **समग्र:-** पालघर जिल्हयामधील विक्रमगड तालुक्यातील आंबेघर तर्फे धरमपूर यागट ग्रामपंचायतीचा अभ्यास विषयाचे क्षेत्र म्हणून केला गेला. कारण आंबेघर तर्फे धरमपूर या गट ग्रामपंचायतीत अनु. जमातीचे नागरिक मोठया संख्येने असल्याने अभ्यासण्यासाठी या आंबेघर तर्फे धरमपूरग्रामपंचायतीची निवड करण्यात आली.
- **नमुना आकार :-**विक्रमगड तालुक्यातील आंबेघर तर्फे धरमपूरगट ग्रामपंचायतीच्या आंबेघर व धामणी या दोन गावांतूनएकूण १०० नमुन्याचा आकार निवडण्यात आला.
- **नमुना निवड पध्दती आणि तंत्रे :-**अनुसूचित क्षेत्रामधील गट ग्रामपंचायतीच्या ग्रामस्थांचे ग्रामसभेतील योगदानविषयाच्या संशोधन अभ्यासासाठी संशोधकाला आंबेघर तर्फे धरमपूर गट ग्रामपंचायतीकडून प्रौढ मतदारांची यादी उपलब्ध झाली. त्यासाठी संभाव्यता नमुना निवड पध्दतीचा उपयोग करुन आंबेघर व धामणीया दोन गावांतून प्रत्येकी वय वर्षे १८ ते ३५ वर्षांमधील २५ महिला व २५पुरुष आणि वय वर्षे ३६ व त्यापुढील २५ महिला व २५ पुरुष अशा दोन्ही गावातून ५० -५० अशी दोन्ही गावातूनप्रमाणात निवड करावी लागणार असल्याने स्तरीत यादृच्छिक नमुना निवड पध्दतीचा नमुना निवडीसाठी उपयोग करण्यात आला.

**१४) तथ्ये संकलनाच्या पध्दती:-**

सदर विषय अभ्यासासाठी संशोधनकर्ताने निरीक्षण व चर्चा या तथ्येसंकलनाच्या पध्दतीचा वापर केला.

- **तथ्य संकलनाची साधने:-** सदर संशोधन हे अनुसूचित क्षेत्रातील ग्रामपंचायतीमधील सभासदांचे ग्रामसभेतील योगदान याचा अभ्यास करण्यासाठी संशोधनकर्त्याने स्वत: प्रश्न विचारुन उत्तरतदात्यांनी दिलेली उत्तरे मुलाखती अनुसूचीत नोंदवून घेतली.

**१५) तथ्य प्रक्रिया:-** सदर संशोधन अभ्यासासाठी मुलाखत अनुसूची प्रत्यक्ष अभ्यास विषयाच्या क्षेत्रातमध्ये जाऊन उत्तरदात्यांना प्रश्न विचारुन त्यांनी दिलेली माहिती मुलाखत अनुसूचीमध्ये नोंदवून घेतली. तसेच निरीक्षण आणि द्वितीय माहितीच्या स्त्रोतांचा वापर करुन तथ्य संकलन करण्यात आले.

**१६) प्रकरणीकरण:-**

| | |
|---|---|
| १ | अभ्यासविषयाची प्रस्तावना |
| २ | संदर्भ साहित्याचा आढावा |
| ३ | संशोधन पध्दती |
| ४ | अभ्यास क्षेत्राचा आराखडा |
| ५ | तथ्य विश्लेषण आणि अर्थ निर्वाचन |
| ६ | निष्कर्ष, गृहितकृत्याची पडताळणी, शिफारसी अणि संशोधन विषयाचा सारांश |
| ७ | संदर्भ सूची |
| | परिशिष्ठे<br>अ) मुलाखत अनुसूची |

**१७) समाजकार्य मध्यस्थीची आवश्यकता:-**समाजकार्याचे लक्ष्य, निती - मुल्ये तसेच मान्यता हे सर्व मानवतावादी तत्त्वावार आधारित आहे. प्रत्येक व्यक्तींमध्ये सन्मानाची भावना व सुधारण्याची क्षमता असते. यावर समाजकार्याचा विश्वास आहे. समुदायातील उपलब्ध

साधनसामुग्रीचा वापर करुन सुयोग्य संघटन घडवून आणून समुदायाचा विकास करणे शक्य आहे. समाजकार्याच्या सामुदायिक विकास या पध्दतीचा वापर करुन अनुसूचित क्षेत्रामध्ये होणारे राजकारण, होणारी गटबाजी तसेच अनुसूचित क्षेत्रातील असलेले मागासलेपण यावर उपाय शोधनू सामाजिक गतिशिलता निर्माण करण्यासाठी समाजकार्य मध्यस्थी करते. त्यासाठी समाजकार्य मध्यस्थीची आवश्यकता आहे. म्हणून समाजकार्यकर्ता सदर क्षेत्रात मध्यस्थी म्हणून पुढीलप्रमाणे भूमिका पार पाडतो.

i) अनुसूचित क्षेत्रातील नागरिकांमध्ये/ लोकांना शैक्षणिक महत्त्व पटवून देणे.

ii) अनुसूचित क्षेत्रातील सामाजिक, आर्थिक, कौटुंबिक तसेच व्यक्तीगत मागासलेपणाची माहिती मिळवून त्याविषयी सविस्तर अहवाल तयार करणे. व त्या अहवालाच्या आधारे शासन, धोरणकर्ते तसेच विविध सामाजिक विकास संस्था यांच्याद्वारे निश्चित अशा सुधारणावादी निर्णयाप्रत येऊ शकतील.

iii) अनुसूचित जमातीच्या तरुणांमध्ये विविध कौशल्ये व पध्दतींच्या आधारे आंतर क्रियात्मक पर्यवेक्षण करावे की, जेणेकरुन अनुसूचित जमातीच्या तरुणांमध्ये जाणीव निर्माण होऊन आपापल्या भागाचा विकास करण्यासाठी पुढाकार घेतील.

iv) व्यक्ती सहकार्य, गटकार्य तसेच सामुदायिक संघटन याद्वारे अनुसूचित जमातीच्या लोकांना कायदेशिर तसेच त्यांना असणाऱ्या शासनाच्या सोय-सुविधा तसेच योजनांची माहिती कार्यशाळा आयोजित करुन त्यांच्यामध्ये जनजागृती करणे.

v) अनुसूचित क्षेत्रातील असणाऱ्या अनुसूचित जमातीच्या लोकांना पंचायत क्षेत्र विस्तार कायदा १९९६ (पेसा) या कायद्याविषयी जनजागृती करणे.

या प्रकारे समाजकार्य मध्यस्थीची आवश्यकता आहे.

अनुसूचित क्षेत्रामध्ये काम करताना व्यावसायिक समाजकार्याच्या i) व्यक्ती सहकार्य ii) गटकार्य iii) सामुदायिक संघटन iv) सामाजिक संशोधन v) सामाजिक प्रशासन व vi) सामाजिक कृती या सर्व पध्दतीचा वापर करता येईल.

## **१८) अभ्यास विषयातील मर्यादा :-**

पालघर जिल्हयामधील विक्रमगड तालुक्यातील अनुसूचित क्षेत्र असणाऱ्या आंबेघर तर्फे धरमपूर या ग्रामपंचायतीमध्ये ग्रामसभेला उपस्थित राहणाऱ्या ग्रामस्थांची माहिती घेताना अनेक अडचणी आल्या त्यातील निवडक मर्यादा पुढीलप्रमाणे.

१) प्रत्येक निवेदकाला अभ्यास विषय समजून सांगण्यात भरपूर वेळ गेला.

२) या क्षेत्रामध्ये अशाप्रकारची माहीती या अगोदर कधीही भरण्यात आली नसल्यामुळे निवेदक माहिती देताना घाबरत होते.

३) निवेदकांमध्ये अशिक्षित आणि अल्प शिक्षणाचे प्रमाण जास्त असल्यामुळे त्यांना माहीती देण्यास टाळाटाळ करीत होते.

४) महीला निवेदकांकडून माहीती घेताना भरपूर वेळ गेला.

५) सदर संशोधन अभ्यास मर्यादित वेळेत पूर्ण करावयाचा असल्याने वेळेची मर्यादा आली.

६) एकेका निवेदकाची माहीती घेण्यासाठी खूप वेळ थांबावे लागत असे.

# प्रकरण ४ रे

## अभ्यास क्षेत्राचा आराखडा

सदर प्रकरणामध्ये संशोधन अभ्यासासाठी निवडण्यात आलेल्या अभ्यास क्षेत्राची ओळख,अभ्यास क्षेत्राचा आराखडा याविषयीची माहिती देण्यात आलेली आहे.

**४.१) अभ्यास क्षेत्राच्या जिल्हा व तालुक्याविषयी माहिती :-**

**जिल्हा -**पालघर जिल्हा १ ऑगस्ट २०१४ रोजी ठाणे जिल्ह्याचे विभाजन होऊन स्वतंत्र पालघर जिल्हयाची निर्मिती झाली. पालघर जिल्ह्याला शहरी, ग्रामीण व डोंगरी अशा वैशिष्ट्यपूर्ण रचना लाभली आहे. या जिल्ह्याला ७० कि.मी चा समुद्र किनारा लाभला आहे. सन २०११ च्या जनगणनेनुसार पालघर जिल्ह्याची एकूण लोकसंख्या ३०,१४,४३४ असून दारिद्र्यरेषेखालील कुटूंब संख्या १,०१,५५१ एवढी आहे. या जिल्हयामध्ये पालघर, वसई, वाडा, जव्हार, मोखाडा, विक्रमगड, तलासरी आणि डहाणू असे एकूण ८ तालुके आहेत. ८ पंचायत समित्या आहेत. तर ४७४ ग्रामपंचायती आहेत. त्यापैकी ४११ ग्रामपंचायती अनुसूचित क्षेत्राअंतर्गंत येतात. तर ८१७ गावे ही पेसा क्षेत्रात येतात.


**तालुका -**पालघर जिल्ह्यातील ८ तालुक्यांपैकी विक्रमगड तालूक्यातील आंबेघर तर्फे धरमपूर या ग्रुप ग्रामपंचायतीची अभ्यास क्षेत्र म्हणून निवड करण्यात आली आहे.

विक्रमगड तालुक्याला पालघर, वाडा, जव्हार आणि डहाणू अशा चार तालुक्यांची हद्द जोडण्यात आली आहे. विक्रमगड तालुका हा जिल्ह्याच्या मध्यवर्ती ठिकाणी असून या तालुक्याची निर्मिती २६ जानेवारी २००२ रोजी झाली. या तालुक्यामध्ये आदिवासी जमातीमध्ये कोकणा, वारली, ठाकूर, महादेव कोळी, मल्हार कोळी, ढोरकोळी व कातकरी या जमाती आहेत. या विविध जाती जमातीचे लोक राहत असले तरी सर्वांमध्ये सामाजिक ऐक्य आहे. परंपरागत सण, उत्सव व समारंभ इत्यादी मध्ये सर्वजण गुण्यागोविंदाने राहतात. येथील आदिवासी तारपानृत्य विशेष प्रसिध्द आहे.

विक्रमगड तालुक्याची एकूण लोकसंख्या १,३७,६२५ एवढी असून त्यापैकी अनुसूचित जमातीची लोकसंख्या १,२६,३६८ एवढी आहे. म्हणजेच एकूण लोकसंख्येच्या ९२% एवढी आहे.तसेच दारिद्र्यरेषेखालील कुटूंबांची संख्या १६,४९० एवढी आहे. या तालुक्यामध्ये १ ग्रामीण रुग्णालय आहे. तर ३ प्राथमिक आरोग्य केंद्रे व ३ प्राथमिक आरोग्य उपकेंद्रे आहेत.

**४.२. अभ्यास क्षेत्र:-**

विक्रमगड तालुक्यातील आंबेघर तर्फे धरमपूर ही गट ग्रामपंचायत असून सदर ग्रामपंचायतीचा संशोधन अभ्यास क्षेत्र म्हणून निवड करण्यात आली. या ग्रामपंचायतीमध्ये दोन गावे येतात १) आंबेघर गांव २) धामणी गांव




- **आंबेघर गांव:-** आंबेघर गांव हे डहाणू तालुक्याच्या हद्दिला लागून वसलेले आहे. या गावाची एकूण लोकसंख्या ९२१ असून १००% अनुसूचित जमातीची आहे. या गावात एकूण ४ पाडे आहेत. येथे रिक्षा ही प्रमुख वाहतूकीची सोय आहे. या गावाला चार ही बाजूस डोंगर झाडांनी वेढलेले आहे. येथिल शेती हा प्रमुख व्यवसाय आहे.

- **आंबेघर गांव:-** या गावची एकूण लोकसंख्या १३२३ एवढी आहे. या गावात धामणी धरण हे मोठे धरण असून येथिल लोक शेती, डोंगरातून लाकूड फाटा गोळा करणे, डिंक

गोळा करणे, व शहराच्या ठिकाणी जाऊन बांधकामवर बिगारी काम करणे हे प्रमुख उदरनिर्वाहाचे साधन आहे. हे गाव नैसर्गिक साधनसंपत्तीने समृध्द आहे. या गावात एकूण ५ पाडे आहेत.

अभ्यास विषयाचा आराखडा या प्रकरणामध्ये जिल्हा, तालुका, तसेच अभ्यास क्षेत्र असलेले आंबेघर तर्फे धरमपूर यागट ग्रामपंचायतीतील आंबेघर गांव व धामणी गांव या दोन्ही गांवाची थोडक्यात माहिती मांडण्यात आलेली आहे.

# प्रकरण ५ वे

# तथ्य विश्लेषण आणि निर्वचन

## सारणी क्र.१

## निवेदकांचे वय दर्शविणारी सारणी

| अ.क्र | तपशील | वारंवारिता | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | **वय वर्षे १८ ते ३५ पूर्ण** | ५० | ५०% |
| २ | **वय वर्षे ३६ ते त्यापुढील** | ५० | ५०% |
| **एकूण** | | १०० | १००% |

वरील सारणीवरुन असे निदर्शनास येते की, एकूण १०० निवेदकांपैकी १८ ते ३५ वर्षे वयोगटातील निवेदकांची संख्या ५० (५०%) आहे, ३६ ते त्यापुढील वयोगटातील निवेदकांची संख्या ५० (५०%) आहे,

**सारणी क्र. २**

**निवेदकांची वैवाहिक स्थिती दर्शविणारी सारणी**


| अ.क्र | तपशील | वारंवारिता | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | विवाहित | ७० | ७०% |
| २ | अविवाहित | २५ | २५% |
| ३ | परितक्त्या | ० | ०% |
| ४ | विधवा/ विधूर | ५ | ५% |
| एकूण | | १०० | १००% |

वरील सारणीवरुन असे निदर्शनास येते की, एकूण १०० निवेदकांपैकी विवाहित असलेल्या निवेदकांची संख्या ७० (७०%) आहे , अविवाहित असलेल्या निवेदकांची संख्या २५ (२५%) आहे, तरविधवा/ विधूर निवेदकांची संख्या ५ (५%) आहे.

वरील सारणीवरुन असे निष्कर्षास येते की, परितक्त्या असणारे ग्रामस्थ ग्रामसभेला येत नाहीत. तर ग्रामसभेला विवाहीत असणाऱ्या ग्रामस्थांचे प्रमाण सर्वांत जास्त ७०% आहे.

**आलेख क्र. १**

**निवेदकांच्या शिक्षणाचे प्रमाण दर्शविणारा आलेख**




वरील आलेखावरुन असे निदर्शनास येते की, एकूण १०० निवेदकांपैकी,शिक्षण झालेल्या निवेदकांची संख्या ६० (६०%) आहे, तर शिक्षण झालेले नाही. अशा निवेदकांची संख्या ४० (४०%) आहे

या वरील सारणीवरुन असे निष्कर्षास येते की, ग्रामसभेला येणाऱ्या निवेदकांपैकी ४०% निवेदक अशिक्षित आहेत.

**सारणी क्र. ३**

**निवेदकांचे शिक्षण दर्शविणारी सारणी**

| अ.क्र | तपशील | वारंवारिता | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | अशिक्षित | ४० | ४०% |
| २ | प्राथमिक | ३० | ३०% |
| ३ | माध्यमिक | १४ | १४% |
| ४ | उच्च माध्यमिक | २ | २% |
| ५ | पदवी | १० | १०% |
| ६ | पदव्यीत्तर | ४ | ४% |
| एकूण | | १०० | १००% |

वरील सारणीवरुन असे निदर्शनास येते की, एकूण १०० निवेदकांपैकी अशिक्षित असणाऱ्या निवेदकांची संख्या ४० (४०%) आहे , प्राथमिक शिक्षण झालेल्या निवेदकांची संख्या ३० (३०%) आहे, माध्यामिक शिक्षण झालेल्या निवेदकांची संख्या १४ (१४%) आहे, उच्च माध्यामिक शिक्षण झालेल्या निवेदकांची संख्या २ (२%) आहे, आणि पदवीचे शिक्षण पुर्ण झालेल्या निवेदकांची संख्या १० (१०%) आहे, तसेच पदव्यीत्तर शिक्षण झालेल्या निवेदकांची संख्या ४ (४%) आहे.

वरील सारणीवरुन असे निष्कर्षास येते की, १० वीच्या पुढील शिक्षण घेतलेल्या निवेदकांचे प्रमाण फक्त १६% आहे.

**सारणी क्र. ४**

**निवेदकांच्या कुटुंबातील माणसे दर्शविणारी सारणी**


| अ.क्र | तपशील | वारंवारिता | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | दोन | ३ | ३% |
| २ | तीन | ९ | ९% |
| ३ | चार | १६ | १६% |
| ४ | पाच | २६ | २६% |
| ५ | सहा व त्यापेक्षा जास्त | ४६ | ४६% |
| एकूण | | १०० | १००% |

वरील सारणीवरुन असे निदर्शनास येते की, एकूण १०० निवेदकांपैकी कुटुंबात दोनच माणसे आहेत असे सांगणाऱ्या निवेदकांची संख्या ३ (३%) आहे , कुटुंबात तीन माणसे आहेत असे सांगणाऱ्या निवेदकांची संख्या ९ (९%) आहे,कुटुंबात चार माणसे आहेत असे सांगणाऱ्या निवेदकांची संख्या १६ (१६%) आहे, आणि कुटुंबाता पाच माणसे आहेत असे सांगणाऱ्या निवेदकांची संख्या २६ २६%) आहे, तसेच कुटुंबात सहा व त्यापेक्षा जास्त माणसे आहेत असे सांगणाऱ्या निवेदकांची संख्या ४६ (४६%) आहे.

वरील सारणीवरुन असे निष्कर्षास येते की, आंबेघर तर्फे धरमपूर या ग्रामपंचायतीमध्ये सहा व त्यापेक्षा जास्त माणसे असणारी ४६% कुटुंबे आहेत.

**आलेख क्र. २**

**निवेदकांची दारिद्रयरेषेखालील कुटुंबांची संख्या दर्शविणारा आलेख**




वरील आलेखावरुन असे निदर्शनास येते की, एकूण १०० निवेदकांपैकी,दारिद्रयरेषेखालील असणाऱ्या निवेदकांची संख्या ७३ (७३%) आहे, तर दारिद्रयरेषेखालील नसणाऱ्या निवेदकांची संख्या २७ (२७%) आहे,

वरील आलेखावरुन असे निष्कर्षास येते की, आंबेघर तर्फे धरमपुर या ग्रामपंचायतीमध्ये ७३ % कुटुंबे दारिद्रयरेषेखालील आहेत.

**सारणी क्र. ५**

**निवेदकांचे उदरनिर्वाहाचे साधन दर्शविणारी सारणी**

| अ.क्र | तपशील | वारंवारिता | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | नोकरी | ० | ०% |
| २ | शेती | ७६ | ७६% |
| ३ | मोल मजूरी | २३ | २३% |
| ४ | व्यवसाय | १ | १% |
| एकूण | | १०० | १००% |

वरील सारणीवरुन असे निदर्शनास येते की, एकूण १०० निवेदकांपैकी शेती करणाऱ्या निवेदकांची संख्या ७६ (७६%) आहे, मोल मजूरी करणाऱ्या निवेदकांची संख्या २३ (२३%) आहे,व व्यवसाय करणाऱ्या निवेदकांची संख्या १ (१%) आहे, तर नोकरी करणारा एकही निवेदक आढळला नाही.

वरील सारणीवरुन असे निष्कर्षास येते की, आंबेघर तर्फे धरमपूर या ग्रामपंचायतीच्या ग्रामसभेला येणारी ७६% लोक स्वत:ची शेती करतात. २३% लोक दुसऱ्याच्या शेतावर काम तसेच वेठबिगारीची कामे करुन आपला उदरनिर्वाह करतात, तर नोकरी करणारी एकही व्यक्ती ग्रामसभेला येत नाही. आणि व्यावसाय करण्याचे प्रमाण फक्त १% आहे.

**सारणी क्र. ६**

**निवेदकांचे वार्षिक उत्पन्न दर्शविणारी सारणी**

| अ.क्र | तपशील | वारंवारिता | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | २५००० रु. पेक्षा कमी | ४४ | ४४% |
| २ | २५००० रु. ते ५०००० रु. पर्यंत | ३२ | ३२% |
| ३ | ५०००१ रु. ते एक लाख रुपये पर्यंत | ९ | ९% |
| ४ | १ लाख रुपये पेक्षा जास्त | २ | २% |
| ५ | माहिती नाही | १३ | १३% |
| एकूण | | १०० | १००% |

वरील सारणीवरुन असे निदर्शनास येते की, एकूण १०० निवेदकांपैकी २५००० रु. पेक्षा कमी वार्षिक उत्पन्न असणाऱ्या निवेदकांची संख्या ४४ (४४%) आहे, २५००० रु. ते ५०००० रु. पर्यंत वार्षिक उत्पन्न असणाऱ्या निवेदकांची संख्या ३२ (३२%) आहे, ५०००१ रु ते एक लाख रुपये पर्यंत वार्षिक उत्पन्न असणाऱ्या निवेदकांची संख्या ९ (९%) आहे, आणि१ लाख पेक्षा जास्त वार्षिक उत्पन्न असणाऱ्या निवेदकांची संख्या २ (२%) आहे, तसेच कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न माहिती नसणाऱ्या निवेदकांची संख्या १३ (१३%) आहे.

वरील सारणीवरुन असे निष्कर्षास येते की, आबेघर या ग्रामपंचायतीमध्ये ४४% लोकांचे वार्षिक उत्पन्न २५०००/- रुपयांपेक्षा कमी आहे. तसेच १३ % लोकांना आपले वार्षिक उत्पन्न किती आहे हेच माहिती नाही.

## सारणी क्र. ७

## निवेदकांच्या ग्रामसभेबद्दलचा अर्थ दर्शविणारी सारणी

| अ.क्र | तपशील | वारंवारिता | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | गावातील मतदार स्त्री- पुरुषांनी गावाच्या विकासासाठी एकत्र येऊन घेतलेली सभा | ४४ | ४४% |
| २ | गावातील समस्यांवर चर्चा करुन तोडगा काढण्याची सभा | ५६ | ५६% |
| एकूण | | १०० | १००% |

वरील सारणीवरुन असे निदर्शनास येते की, एकूण १०० निवेदकांपैकी, गावातील मतदार स्त्री- पुरुषांनी गावाच्या विकासासाठी एकत्र येऊन घेतलेली सभाअशा ग्रामसभेचा अर्थ सांगणाऱ्या निवेदकांची संख्या ४४ (४४%) आहे, गावातील समस्यांवर चर्चा करुन तोडगा काढण्याची सभा अशा ग्रामसभेचा अर्थ सांगणाऱ्या निवेदकांची संख्या ५६ (५६%) आहे.

वरील सारणीवरुन असे निष्कर्षास येते की, गावातील ५६% ग्रामस्थांच्या मते ग्रामसभा याचा अर्थ गावातील समस्यांवर चर्चा करुन त्याच्यावर तोडगा काढणे होय.

**सारणी क्र. ८**

**निवेदकांनी मांडलेली ग्रामसभा घेण्याबाबतची कारणे दर्शविणारी सारणी.**

| अ.क्र | तपशील | वारंवारिता | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | गावाच्या विकासासाठी | ८९ | ८९% |
| २ | लोकप्रतिनिधींच्या फायद्यासाठी | ३ | ३% |
| ३ | सांगता येत नाही | ८ | ८% |
| ४ | अधिकाऱ्यांच्या फायद्यासाठी | ० | ०% |
| एकूण | | १०० | १००% |

वरील सारणीवरुन असे निदर्शनास येते की, एकूण १०० निवेदकांपैकी गावाच्या विकासासाठी ग्रामसभा घेतली जाते असे मत व्यक्त करणाऱ्या निवेदकांची संख्या ८९ (८९%) आहे, लोकप्रतिनिधींच्या फायद्यासाठी ग्रामसभा घेतली जाते असे मत व्यक्त करणाऱ्या निवेदकांची संख्या ३ (३%) आहे, तर सांगता येत नाही असे मत व्यक्त करणाऱ्या निवेदकांची संख्या ८ (८%) आहे.

वरील सारणीवरुन असे निष्कर्षास येते की, गावाच्या विकासासाठी ग्रामसभा घेतली जाते असे ८९% निवेदकांना वाटते.

## सारणी क्र. ९

## निवेदकांना ग्रामसभा असल्याची माहिती देण्याचे स्त्रोत दर्शविणारी सारणी

| अ.क्र | तपशील | वारंवारिता | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | पत्राने | १५ | १५% |
| २ | दवंडी पेटवून | ० | ०% |
| ३ | वर्तमानपत्राने | ० | ०% |
| ४ | वैयक्तीक माहिती देवून | ८५ | ८५% |
| एकूण | | १०० | १००% |

वरील सारणीवरुन असे निदर्शनास येते की, एकूण १०० निवेदकांपैकी ग्रामसभा असल्याची माहिती पत्राने दिली जाते असे सांगणाऱ्या निवेदकांची संख्या १५ (१५%) आहे, तसेच ग्रामसभा असल्याची माहिती व्यक्तीगत स्वरुपाने दिली जाते असे सांगणाऱ्या निवेदकांची संख्या ८५ (८५%) आहे, तर दवंडी पेटवून व वर्तमानपत्राचा ग्रामसभा असल्याची माहिती देण्यासाठी वापर केला जात नाही.

वरील सारणीवरुन असे निष्कर्षास येते की, ग्रामपंचायतीची ग्रामसभा असल्याची माहिती ८५% लोकांना व्यक्तीगत स्वरुपाने दिली जाते. तर दवंडी पेटवून व वर्तमानपत्राचा ग्रामसभा असल्याची माहिती देण्यासाठी वापर केला जात नाही.

**सारणी क्र. १०**

**निवेदकांना ग्रामसभा असल्याची अगोदर माहिती देण्याचा कालावधी दर्शविणारी सारणी**

| अ.क्र | तपशील | वारंवारिता | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | एक | ४७ | ४७% |
| २ | सहा | १६ | १६% |
| ३ | तीन | ३६ | ३६% |
| ४ | पाच | २ | २% |
| एकूण | | १०० | १००% |

वरील सारणीवरुन असे निदर्शनास येते की, एकूण १०० निवेदकांपैकी,ग्रामसभा असल्याची माहिती ग्रामसभेच्या एक दिवस अगोदर दिली जाते असे सांगणाऱ्या निवेदकांची संख्या ४७ (४७%) आहे, ग्रामसभेच्या तीन दिवस अगोदर माहिती दिली जाते असे सांगणाऱ्या निवेदकांची संख्या ३६ (३६%) आहे, ग्रामसभेच्या सहा दिवस अगोदर माहिती दिली जाते असे सांगणाऱ्या निवेदकांची संख्या १६ (१६%) आहे, आणि ग्रामसभेच्या पाच दिवस अगोदर माहिती दिली जाते असे सांगणाऱ्या निवेदकांची संख्या २ (२%) आहे.

वरील सारणीवरुन असे निष्कर्षास येते की, ग्रामसभा असल्याची माहिती ४७% लोकांना ग्रामसभेच्या एक दिवस अगोदर दिली जाते.

**सारणी क्र. ११**

**निवेदकांच्या मते ग्रामसभा घेण्याचे ठिकाण दर्शविणारी सारणी**

| अ.क्र | तपशील | वारंवारिता | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | ग्रामपंचायत कार्यालय | ७५ | ७५% |
| २ | गावाच्या मोकळया जागेत | २५ | २५% |
| ३ | घरी | ० | ०% |
| ४ | प्रत्येक पाडयावरती | ० | ०% |
| एकूण | | १०० | १००% |

वरील सारणीवरुन असे निदर्शनास येते की, एकूण १०० निवेदकांपैकी,ग्रामसभा ग्रामपंचायत कार्यालयामध्ये घेतली जाते असे मत व्यक्त करणाऱ्या निवेदकांची संख्या ७५ (७५%) आहे, आणि ग्रामसभा गावच्या मोकळया जागेत घेतली जाते असे मत व्यक्त करणाऱ्या निवेदकांची संख्या २५ (२५%) आहे, तसेच प्रत्येक पाडयावरती आणि एखाद्याच्या घरी ग्रामसभा घेतली जाते असे म्हणणारा एकही निवेदक आढळला नाही.

वरील सारणीवरुन असे निष्कर्षास येते की, आंबेघर तर्फे धरमपूर या ग्रामपंचायतीच्या ७५% ग्रामसभा ग्रामपंचायत कार्यालयामध्येच घेतल्या जातात. तर ग्रामपंचायतीच्या पाडयांवरती ग्रामसभा घेतल्याच जात नाहीत.

## सारणी क्र. १२

## निवेदकांच्या मते ग्रामसभेची गणपूर्ती होण्यास आवश्यक असलेली ग्रामस्थांची संख्या दर्शविणारी सारणी

| अ.क्र | तपशील | वारंवारिता | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | ५० | ८ | ८% |
| २ | १०० | ५३ | ५३% |
| ३ | १५० | १० | १०% |
| ४ | ७५ | ८ | ८% |
| ५ | माहिती नाही | २१ | २१% |
| एकूण | | १०० | १००% |

वरील सारणीवरुन असे निदर्शनास येते की, एकूण १०० निवेदकांपैकी,ग्रामसभेची गणपूर्ती होण्यासाठी ५० ग्रामस्थांची आवश्यकता आहे असे सांगणाऱ्या निवेदकांची संख्या ८ (८%) आहे, ग्रामसभेची गणपूर्ती होण्यासाठी १०० ग्रामस्थांची आवश्यकता आहे असे सांगणाऱ्या निवेदकांची संख्या ५३ (५३%) आहे, आणि ग्रामसभेची गणपूर्ती होण्यासाठी १५० ग्रामस्थांची आवश्यकता आहे असे सांगणाऱ्या निवेदकांची संख्या १० (१०%) आहे, व ग्रामसभेची गणपूर्ती होण्यासाठी ७५ ग्रामस्थांची आवश्यकता आहे असे सांगणाऱ्या निवेदकांची संख्या ८ (८%) आहे, तसेच ग्रामसभेची गणपूर्ती संख्या माहिती नसणाऱ्या निवेदकांची संख्या २१ (२१%) आहे.

वरील सारणीवरुन असे निष्कर्षास येते की, ग्रामसभेला येणाऱ्या २१% लोकांना ग्रामसभेची गणपूर्ती होण्यासाठी आवश्यक असणारी संख्या माहिती नाही.

**सारणी क्र. १३**

**ग्रामसभेला विषयसूची वाचून दाखविण्याविषयीचे निवेदकांचे मत दर्शविणारी सारणी**

| अ.क्र | तपशील | वारंवारिता | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | होय | ९६ | ९६% |
| २ | नाही | ४ | ४% |
| | एकूण | १०० | १००% |

वरील सारणीवरुन असे निदर्शनास येते की, एकूण १०० निवेदकांपैकी,ग्रामसभेला विषयसूची वाचून दाखविली जाते असे सांगणाऱ्या निवेदकांची संख्या ९६ (९६%) आहे, तरग्रामसभेला विषयसूची वाचून दाखविली जात नाही असे सांगणाऱ्या निवेदकांची संख्या ४ (४%) आहे.

## सारणी क्र. १४

## निवेदकांच्या मते ग्रामसभेला विषयसूची वाचणारी व्यक्ती दर्शविणारी सारणी

| अ.क्र | तपशील | वारंवारिता | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | ग्रामसभा अध्यक्ष | १ | १% |
| २ | ग्रामसेवक | ९८ | ९८% |
| ३ | सरपंच | १ | १% |
| ४ | ग्रामस्थ | ० | ०% |
| एकूण | | १०० | १००% |

वरील सारणीवरुन असे निदर्शनास येते की, एकूण १०० निवेदकांपैकी,ग्रामसभेला ग्रामसभा अध्यक्ष विषयसूची वाचून दाखवितात असे सांगणाऱ्या निवेदकांची संख्या १ (१%) आहे, वग्रामसभेला ग्रामसेवक विषयसूची वाचून दाखवितात असे सांगणाऱ्या निवेदकांची संख्या ९८ (९८%) आहे, तसेच सरपंच विषयसूची वाचून दाखवितात असे सांगणाऱ्या निवेदकांची संख्या १ (१%) आहे.

**सारणी क्र. १५**

**निवेदकांच्या मते ग्रामसभेचे अध्यक्षपद भूषविणारी व्यक्ती दर्शविणारी सारणी**

| अ.क्र | तपशील | वारंवारिता | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | सरपंच | ५९ | ५९% |
| २ | ग्रामसेवक | १८ | १८% |
| ३ | ग्रामस्थ | ० | ०% |
| ४ | विस्तार अधिकारी | ० | ०% |
| ५ | सांगता येत नाही | २३ | २३% |
| एकूण | | १०० | १००% |

वरील सारणीवरुन असे निदर्शनास येते की, एकूण १०० निवेदकांपैकी,ग्रामसभेचे अध्यक्षपद सरपंच स्विकारत असतात असे सांगणाऱ्या निवेदकांची संख्या ५९ (५९%) आहे, वग्रामसभेचे अध्यक्षपद ग्रामसेवक स्विकारत असतात असे सांगणाऱ्या निवेदकांची संख्या १८ (१८%) आहे, आणि ग्रामसभेचे अध्यक्षपद कोणाकडे असते याविषयी सांगता येत नाही असे सांगणाऱ्या निवेदकांची संख्या २३ (२३%) आहे,

वरील सारणीवरुन असे निष्कर्षास येते की, ग्रामसभेला येणाऱ्या २३% ग्रामस्थांना ग्रामसभेचे अध्यक्षपद कोणाकडे असते हेच माहिती नाही .

**सारणी क्र. १६**

**निवेदकांच्या मते ग्रामसभेच्या वेळी मागील बैठकीचा आढावा घेण्याविषयीचे मत दर्शविणारी सारणी**

| अ.क्र | तपशील | वारंवारिता | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | होय | ६५ | ६५% |
| २ | नाही | २५ | २५% |
| ३ | सांगता येत नाही | १० | १५% |
| एकूण | | १०० | १००% |

वरील सारणीवरुन असे निदर्शनास येते की, एकूण १०० निवेदकांपैकी,ग्रामसभेच्या वेळी मागील बैठकीचा आढावा घेतला जातो असे मत व्यक्त करणाऱ्या निवेदकांची संख्या ६५ (६५%) आहे, वग्रामसभेच्या वेळी मागील बैठकीचा आढावा घेतला जात नाही असे मत व्यक्त करणाऱ्या निवेदकांची संख्या २५ (२५%) आहे, तसेच मागील बैठकीचा आढावा घेण्याविषयी सांगता येत नाही असे मत व्यक्त करणाऱ्या निवेदकांची संख्या १० (१०%) आहे.

## सारणी क्र. १७

### निवेदकांच्या मते ग्रामसभेमध्ये कल्याणकारी योजनांची व नवीन आलेल्या कायद्यांची माहिती देण्याविषयीचे मत दर्शविणारी सारणी

| अ.क्र | तपशील | वारंवारिता | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | होय | ५४ | ५४% |
| २ | नाही | ४३ | ४३% |
| ३ | सांगता येत नाही | ३ | ३% |
| एकूण | | १०० | १००% |

वरील सारणीवरुन असे निदर्शनास येते की, एकूण १०० निवेदकांपैकी,ग्रामसभेमध्ये कल्याणकारी योजनांची व नवीन आलेल्या कायद्यांची  माहिती दिली जाते असे मत व्यक्त करणाऱ्या निवेदकांची संख्या ५४ (५४%) आहे, वग्रामसभेमध्ये कल्याणकारी योजनांची व नवीन आलेल्या कायद्यांची  माहिती दिली जात नाही असे मत व्यक्त करणाऱ्या निवेदकांची संख्या ४३ (४३%) आहे, तसेच ग्रामसभेमध्ये कल्याणकारी योजनांची व नवीन आलेल्या कायद्यांची माहिती देण्याविषयी सांगता येत नाही असे मत व्यक्त करणाऱ्या निवेदकांची संख्या ३ (३%) आहे.

वरील सारणीवरुन असे निष्कर्षास येते की, ५४% ग्रामस्थांच्या मतेग्रामसभेमध्ये कल्याणकारी योजनांची व नवीन आलेल्या कायद्यांची माहिती दिली जात नाही.

**सारणी क्र. १८**

**निवेदकांच्या मते ग्रामसभेमध्ये साधारणपणे चर्चिले जाणारे विषय दर्शविणारी सारणी**


| अ.क्र | तपशील | वारंवारिता | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | विषय सूचीवर नमूद केलेले विषय | ७ | ७% |
| २ | रोजगार हमी, वनहक्क, क़षी , रस्ते , वीज, पाणी | ३३ | ३३% |
| ३ | घरकूल, शौचालय, कुपोषण, रोजगार, रस्ते | ६० | ६०% |
| एकूण | | १०० | १००% |

वरील सारणीवरुन असे निदर्शनास येते की, एकूण १०० निवेदकांपैकी,ग्रामसभेमध्ये विषय सूचीवर नमूद केलेले विषयचर्चिले जातात असे मत व्यक्त करणाऱ्या निवेदकांची संख्या ७ (७%) आहे, रोजगार हमी, वनहक्क, कृषी , रस्ते , वीज, पाणीहे विषयचर्चिले जातात असे मत व्यक्त करणाऱ्या निवेदकांची संख्या ३३ (३३%) आहे, तसेच घरकूल, शौचालय, कुपोषण, रोजगार, रस्तेहे विषयचर्चिले जातात असे मत व्यक्त करणाऱ्या निवेदकांची संख्या ६० (६०%) आहे.

वरील सारणीवरुन असे निष्कर्षास येते की, घरकूल, शौचालय, कुपोषण, रोजगार, रस्तेहे विषय ग्रामसभेमध्ये ६०% प्रमाणात चर्चिले जातात.

**आलेख क्र. ३**

**निवेदकांच्या मते पेसा कायद्याविषयी माहिती असलेल्यांची संख्या दर्शविणारा आलेख**




वरील आलेखावरुन असे निदर्शनास येते की, एकूण १०० निवेदकांपैकी,पेसा कायदा माहीती आहे असे मत व्यक्त करणाऱ्या निवेदकांची संख्या ३२ (३२%) आहे, तर पेसा कायदा माहीती नाही असे मत व्यक्त करणाऱ्या निवेदकांची संख्या ६८ (६८%) आहे,

वरील सारणीवरुन असे निष्कर्षास येते की, पेसा कायदा माहीती नसणाऱ्या निवेदकांची संख्या ६८% आहे.

## सारणी क्र. १९

### निवेदकांच्या मते पेसा कायदा म्हणजे काय याविषयीचे मत दर्शविणारी सारणी

| अ.क्र | तपशील | वारंवारिता | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | आपला गाव आपला विकास करण्यासाठी शासनाने तयार केलेला कायदा | ८ | ८% |
| २ | आदिवासांना दिलेला विशेष अधिकार | ६ | ६% |
| ३ | गाव कल्याणाची योजना | ३ | ३% |
| ४ | शासन ग्रामपचायतींना निधी देतो त्यातून विकास कामे करावयाची असतात | १५ | १५% |
| ५ | माहिती नाही | ६८ | ६८% |
| | एकूण | १०० | १००% |

वरील सारणीवरुन असे निदर्शनास येते की, एकूण १०० निवेदकांपैकी, पेसा कायदा म्हणजे आपला गाव आपला विकास करण्यासाठी शासनाने तयार केलेला कायदा असे सांगणाऱ्या निवेदकांची संख्या ८ (८%) आहे, तर पेसा कायदा म्हणजे आदिवासांना दिलेला विशेष अधिकार असे सांगणाऱ्या निवेदकांची संख्या ६ (६%) आहे, गाव कल्याणाची योजना म्हणजे पेसा कायदा असे सांगणाऱ्या निवेदकांची संख्या ३ (३%) आहे, तर पेसा कायदा शासन ग्रामपचायतींना निधी देतो त्यातून विकास कामे करावयाची असतात असे सांगणाऱ्या निवेदकांची संख्या १५ (१५%) आहे, आणि पेसा कायदा माहीती नाही असे सांगणाऱ्या निवेदकांची संख्या ६८ (६८%) आहे.

वरील सारणीवरुन असे निष्कर्षास येते की, पेसा कायदा माहिती आहे असे सांगणाऱ्या निवेदकांचे प्रमाण ३२% आहे. परंतू पेसा कायद्याविषयी निवेदकांच्या आकलनामध्ये भिन्नता दिसते.

**सारणी क्र. २०**

**निवेदकांच्या मते पेसा कायद्याअंतर्गत दिलेले अधिकार दर्शविणारी सारणी**


| अ.क्र | तपशील | वारंवारिता | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | गौण उपज व शांतता व सुव्यवस्था यांचा वापर | १६ | १६% |
| २ | नैसर्गिक साधन संपत्तीचा पुरेपुर वापर करुन गावचा विकास करणे | १३ | १३% |
| ३ | माहित नाही | ७१ | ७१% |
| एकूण | | १०० | १००% |

वरील सारणीवरुन असे निदर्शनास येते की, एकूण १०० निवेदकांपैकी, पेसा कायद्या अंतर्गत गौण उपज व शांतता व सुव्यवस्था यांचा वापर करण्याविषयीचा अधिकार देण्यात आला आहे असे सांगणाऱ्या निवेदकांची संख्या १६ (१६%) आहे, तर पेसा कायद्या अंतर्गत नैसर्गिक साधन संपत्तीचा पुरेपुर वापर करुन गावचा विकास करण्याचा अधिकार देण्यात आला आहे असे सांगणाऱ्या निवेदकांची संख्या १३ (१३%) आहे, परंतू पेसा कायद्या अंतर्गत कोणते अधिकार देण्यात आले आहेत हे माहिती नसलेल्या निवेदकांची संख्या ७१ (७१%) आहे.

वरील सारणीवरुन असे निष्कर्षास येते की, पेसा कायद्या अंतर्गत दिलेल्या अधिकाराविषयी माहिती नसलेल्या निवेदकांचे प्रमाण सर्वाधिक ६८% आहे. तर १६% निवेदकांना गौण उपज व शांतता व सुव्यवस्था राखणे हा अधिकार पेसा कायद्याअंतर्गत अनु. जमातीसाठी देण्यात आला आहे असे वाटते.

**आलेख क्र. ४**

**पेसा कायद्यामुळे आदिवासी क्षेत्राचा विकास होण्यास मदत होईल याविषयीचे निवेदकांचे मत दर्शविणारा आलेख**





वरील आलेखावरुन असे निदर्शनास येते की, एकूण १०० निवेदकांपैकी,पेसा कायद्यामुळे आदिवासी क्षेत्राचा विकास होण्यास मदत होईल या विधानाशी सहमत असणाऱ्या निवेदकांची संख्या ४१ (४१%) आहे, पेसा कायद्यामुळे आदिवासी क्षेत्राचा विकास होण्यास मदत होईल या विधानाशी पूर्णत: सहमत असणाऱ्या निवेदकांची संख्या १० (१०%) आहे, तर पेसा कायद्यामुळे आदिवासी क्षेत्राचा विकास होण्यास मदत होईल या विधानाशी असहमत असणाऱ्या निवेदकांची संख्या ११ (११%) आहे, आणि पेसा कायद्यामुळे आदिवासी क्षेत्राचा विकास होण्याविषयी काही सांगता येत नाही असे सांगणाऱ्या निवेदकांची संख्या ३० (३०%) आहे,

वरील आलेखावरुन असे निष्कर्षास येते की, पेसा कायद्यामुळे आदिवासी क्षेत्राचा विकास होण्यास मदत होईल या विधानाशी सहमत असणाऱ्या निवेदकांचे प्रमाण सर्वाधिक ४२% आहे.

**आलेख क्र. ५**

**निवेदकांच्या मते वनहक्क कायदा माहिती असलेल्यांची संख्या दर्शविणारा आलेख**




वरील आलेखावरुन असे निदर्शनास येते की, एकूण १०० निवेदकांपैकी,वनहक्क कायदा माहिती आहे असे मत व्यक्त करणाऱ्या निवेदकांची संख्या ५९ (५९%) आहे, तर वनहक्क कायदा माहिती नाही असे मत व्यक्त करणाऱ्या निवेदकांची संख्या ४१ (४१%) आहे.

वरील आलेखावरुन असे निष्कर्षास येते की, वनहक्ककायदा माहिती माहिती नसलेल्या निवेदकांचे प्रमाण ४१% आहे.

## सारणी क्र. २१

## वनहक्क माहिती असलेल्या निवेदकांचे मत दर्शविणारी सारणी

| अ.क्र | तपशील | वारंवारिता | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | वन रक्षणासाठीचा कायदा | २५ | २५% |
| २ | वनावरील आदिवासींचा हक्क | १५ | १५% |
| ३ | वन जमिनी कसत असलेल्यांच्या नावे करणे | ११ | ११% |
| ४ | जंगलातील वृक्ष लागवड करणे | ८ | ८% |
| ५ | माहिती नाही | ४१ | ४१% |
| | एकूण | १०० | १००% |

वरील सारणीवरुन असे निदर्शनास येते की, एकूण १०० निवेदकांपैकी,वनहक्क म्हणजे वन रक्षणासाठीचा कायदा असे मत व्यक्त करणाऱ्या निवेदकांची संख्या २५ (२५%) आहे, वनहक्क म्हणजे वनावरील आदिवासींचा हक्क असे मत व्यक्त करणाऱ्या निवेदकांची संख्या १५ (१५%) आहे, वनहक्क म्हणजे वन जमिनी कसत असलेल्यांच्या नावे करणे असे मत व्यक्त करणाऱ्या निवेदकांची संख्या ११ (११%) आहे, तर वनहक्क म्हणजे जंगलात वृक्ष लागवड करणे असे मत व्यक्त करणाऱ्या निवेदकांची संख्या ८ (८%) आहे, आणि वनहक्काविषयी काहीही माहीती नाही असे मत व्यक्त करणाऱ्या निवेदकांची संख्या ४१ (४१%) आहे,

वरील सारणीवरुन असे निष्कर्षास येते की, वनहक्काविषयी काहीही माहीती नसणाऱ्या निवेदकांचे प्रमाण ४१% आहे.

**सारणी क्र. २२**

**घरकूल योजनेचा लाभ मिळालेल्या विषयीचे निवेदकांचे मत दर्शविणारी सारणी**

| अ.क्र | तपशील | वारंवारिता | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | होय | ६८ | ६८% |
| २ | नाही | ३२ | ३२% |
| एकूण | | १०० | १००% |

वरील सारणीवरुन असे निदर्शनास येते की, एकूण १०० निवेदकांपैकी,घरकूल योजनेचा लाभ मिळालेला आहे असे मत मांडणाऱ्या निवेदकांची संख्या ६८ (६८%) आहे, तर घरकूल योजनेचा लाभ मिळालेला नाही असे मत मांडणाऱ्या निवेदकांची संख्या ३२ (३२%) आहे.

वरील सारणीवरुन असे निष्कर्षास येते की, घरकूल योजनेचा लाभ मिळालेला आहे अशा निवेदकांचे प्रमाण सर्वाधिक ६८% आहे.

## सारणी क्र. २३

### निवेदकांच्या मते घरकूल योजनेसाठी लाभ मिळालेली रक्कम दिर्शविणारी सारणी

| अ.क्र | तपशील | वारंवारिता | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | ५० हजार रुपये | ० | ०% |
| २ | ७५ हजार रुपये | ५३ | ५३% |
| ३ | ९० हजार रुपये | १९ | १९% |
| ४ | १ लाख २० हजार रु. | १२ | १२% |
| ५ | सांगता येत नाही | १६ | १६% |
| एकूण | | १०० | १००% |

वरील सारणीवरुन असे निदर्शनास येते की, एकूण १०० निवेदकांपैकी,७५ हजार रुपये घरकूल योजनेसाठी लाभ मिळाला असे मत मांडणाऱ्या निवेदकांची संख्या ५३ (५३%) आहे, ९० हजार रुपये घरकूल योजनेसाठी लाभ मिळाला असे मत मांडणाऱ्या निवेदकांची संख्या १९ (१९%) आहे, १ लाख २० हजार रुपये घरकूल योजनेसाठी लाभ मिळाला असे मत मांडणाऱ्या निवेदकांची संख्या १२ (१२%) आहे, तर घरकूल योजनेसाठी लाभ मिळालेली रक्कम सांगता येत नाही असे मत मांडणाऱ्या निवेदकांची संख्या १६ (१६%) आहे.

वरील सारणीवरुन असे निष्कर्षास येते की, घरकूल योजनेचा लाभ घेतला परंतू किती टक्के लाभ मिळाला हे माहिती नाही अशा निवेदकांची संख्या १६% आहे.

**सारणी क्र. २४**

**निवेदकांच्या मते घरकूल न मिळालेल्याची कारणे दिर्शविणारी सारणी**


| अ.क्र | तपशील | वारंवारिता | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | लाभ मिळाला आहे | ६८ | १९% |
| २ | दारिद्रयरेषेखालील यादीत नाव नाही | १९ | १९% |
| ३ | माहीती नाही | १३ | १३% |
| एकूण | | १०० | १००% |

वरील सारणीवरुन असे निदर्शनास येते की, एकूण १०० निवेदकांपैकी,घरकूल योजनेचा लाभ मिळालेला आहे असे म्हणणाऱ्या निवेदकांची संख्या ६८ (६८%) आहे, तर दारिद्रयरेषेखालील यादीत नाव नसल्यामुळे घरकूल योजनेचा लाभ मिळालेला नाही असे म्हणणाऱ्या निवेदकांची संख्या १९ (१९%) आहे, आणि घरकूल योजनेचा लाभ न मिळण्यामागचे कारण माहिती नसणाऱ्या निवेदकांची संख्या १३ (१३%) आहे.

वरील सारणीवरुन असे निष्कर्षास येते की, दारिद्रयरेषेखालील यादीत नाव नसल्यामुळे घरकूल योजनेचा लाभ मिळालेला नाही असे म्हणणाऱ्या निवेदकांची संख्या १९ (१९%) आहे.

**आलेख क्र. ६**

**घरी शौचालय बांधले असल्याविषयीचे निवेदकांचे मत दिर्शविणारा आलेख**




वरील आलेखावरुन असे निदर्शनास येते की, एकूण १०० निवेदकांपैकी,घरी शौचालय बांधलेले आहे असे मत व्यक्त करणाऱ्या निवेदकांची संख्या ७३ (७३%) आहे, घरी शौचालय बांधण्यात आलेले नाही असे मत व्यक्त करणाऱ्या निवेदकांची संख्या २७ (२७%) आहे.

वरील आलेखवरुन असे निष्कर्षास येते की, ७३% ग्रामस्थांच्या घरी शौचालय बांधलेले आहे. तर २७% ग्रामस्थांच्या घरी अजूनही शौचालय बांधण्यात आलेले नाही.

**सारणी क्र. २५**

**निवेदकांच्या मते घरी शौचालय उपलब्ध नसण्याची कारणे दिर्शविणारी सारणी**


| अ.क्र | तपशील | वारंवारिता | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | शौचालय बांधले आहे | ७३ | ७३% |
| २ | शौचालय बांधायला पैसे नाहीत | २७ | २७% |
| एकूण | | १०० | १००% |

वरील सारणीवरुन असे निदर्शनास येते की, एकूण १०० निवेदकांपैकी,घरी शौचालय असलेल्या निवेदकांची संख्या ७३ (७३%) आहे, तर घरी शौचालय बांधायला पैसे नाहीत असे म्हणणाऱ्या निवेदकांची संख्या २७ (२७%) आहे,

वरील सारणीवरुन असे निष्कर्षास येते की, पैसे नाहीत म्हणून शौचालय बांधले नाही असे २७% निवेदकांचे म्हणणे आहे.

**आलेख क्र. ७**

**पाणी पिण्याच्या सुविधेचे स्त्रोत दर्शविणारा आलेख**




वरील आलेखावरुन असे निदर्शनास येते की, एकूण १०० निवेदकांपैकी,पाणी पिण्यासाठी विहीर या सुविधेचा वापर करतात असे मत व्यक्त करणाऱ्या निवेदकांची संख्या ६७ (६७%) आहे, आणि बोअरवेल या पाणी पिण्यासाठी सुविधेचा वापर करतो असे मत व्यक्त करणाऱ्या निवेदकांची संख्या ३३ (३३%) आहे, तर नळाचे आणि टंकरचे पाणी पिण्यासाठी सुविधेचा कोणीही वापर करीत नाही.

वरील आलेखवरुन असे निष्कर्षास येते की, पाणी पिण्यासाठी विहीर या सुविधेचा ६७% ग्रामस्थ वापर करतात.

**सारणी क्र. २६**

**पिण्याच्या पाण्याच्या सुविधेविषयी निवेदकांचे मत दर्शविणारी सारणी**

| अ.क्र | तपशील | वारंवारिता | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | एपिल, मे , जून या महिन्यामध्ये खूप पाणी टंचाई होते | २० | २०% |
| २ | नळ योजना गावात राबिवली पाहिजे | ५२ | ५२% |
| ३ | बोअरवेल शासनाने मारुन दिलेले आहेत पण त्याला पाणीच नाही | २० | २०% |
| ४ | पावसाळयात पाणी आणण्यासाठी खूप त्रास होतो. | ८ | ८% |
| एकूण | | १०० | १००% |

वरील सारणीवरुन असे निदर्शनास येते की, एकूण १०० निवेदकांपैकी,एपिल, मे, जून या महिन्यामध्ये खूप पाणी टंचाई होते असे म्हणणाऱ्यानिवेदकांची संख्या २० (२०%) आहे, गावात नळ योजना राबिवीली पाहिजेअसे म्हणणाऱ्या निवेदकांची संख्या ५२ (५२%) आहे, तर बोअरवेल शासनाने मारुन दिलेले आहेत पण त्याला पाणीच नाही असे म्हणणाऱ्या निवेदकांची संख्या २० (२०%) आहे, आणि पावसाळयात पाणी आणण्यासाठी खूप त्रास होतो असे म्हणणाऱ्या निवेदकांची संख्या ८ (८%) आहे.

वरील सारणीवरुन असे निष्कर्षास येते की, पाणी आणण्यासाठी खूप लांब जावे लागत असल्यामुळे ५२% निवेदकांचे म्हणणे आहे की गावात नळ योजना राबवली गेली पाहिजे. तसेच एप्रिल, मे व जून या तीन महिन्यांमध्ये पिण्याच्या पाण्यासाठी खूप त्रास सहन करावा लागतो.

**सारणी क्र. २७**

**ग्रामपंचायतीमधील पाडयांवरती शिक्षणाच्या सुविधेविषयीचे निवेदकांचे मत दर्शविणारी सारणी**

| अ.क्र | तपशील | वारंवारिता | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | होय | ८४ | ८४% |
| २ | नाही | १६ | १६५ |
| | एकूण | १०० | १००% |

वरील सारणीवरुन असे निदर्शनास येते की , एकूण १०० निवेदकांपैकी, पाडयावरती शिक्षणाची सोय आहे असे म्हणणाऱ्या निवेदकांची संख्या ८४ (८४%) आहे, तर पाडयावरती शिक्षणाची सोय नाही असे म्हणणाऱ्या निवेदकांची संख्या १६ (१६%) आहे.

वरील सारणीवरुन असे निष्कर्षास येते की, १६% निवेदकांच्या पाडयावरती शिक्षणाची सुविधा नसल्यामुळे तेथील मुलांना गावातील शाळांमध्ये जावे लागते.

## सारणी क्र. २८

## ग्रामपंचायतीमधील पाडयांवरती उपलब्ध असलेल्या शिक्षणाच्या सुविधा दर्शविणारी सारणी

| अ.क्र | तपशील | वारंवारिता | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | १ ली ते ४ थी | ४२ | ४२% |
| २ | १ ली ते ७ वी | ० | ०% |
| ३ | १ ली ते ८ वी | ४२ | ४२% |
| ४ | १ ली ते १० वी | ० | ०% |
| ५ | पाडयावरती शाळा नाही | १६ | १६% |
| एकूण | | १०० | १००% |

वरील सारणीवरुन असे निदर्शनास येते की , एकूण १०० निवेदकांपैकी, पाडयावरती १ ली ते ४ थी पर्यंत शाळा आहे असे म्हणणाऱ्या निवेदकांची संख्या ४२ (४२%) आहे, आणि पाडयावरती १ ली ते ८ थी पर्यंत शाळा आहे असे म्हणणाऱ्या निवेदकांची संख्या ४२ (४२%) आहे, तर आमच्या पाडयावरती शाळाच नाही असे म्हणणाऱ्या निवेदकांची संख्या १६ (१६%) आहे.

वरील सारणीवरुन असे निष्कर्षास येते की, सदर ग्रामपंचायतीमध्ये ८ वी पर्यंतच शिक्षणाची सुविधा आहे. आणि पुढील शिक्षणासाठी त्यांना बाहेर जावे लागते.

## सारणी क्र. २९

## ग्रामपंचायतीच्या हददीमध्ये आरोग्य सुविधेच्या उपलब्धतेविषयी दर्शविणारी सारणी

| अ.क्र | तपशील | वारंवारिता | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | होय | ६४ | ६४% |
| २ | नाही | २८ | २८% |
| ३ | माहिती नाही | ८ | ८% |
| एकूण | | १०० | १००% |

वरील सारणीवरुन असे निदर्शनास येते की , एकूण १०० निवेदकांपैकी,ग्रामपंचायतीच्या हददीमध्ये आरोग्य सुविधेची उपलब्धता आहे असे म्हणणाऱ्या निवेदकांची संख्या ६४ (६४%) आहे, आणि ग्रामपंचायतीच्या हददीमध्ये आरोग्य सुविधेची उपलब्धता नाही असे म्हणणाऱ्या निवेदकांची संख्या २८ (२८%) आहे, तर ग्रामपंचायतीच्या हददीमध्ये आरोग्य सुविधा असल्याबाबत माहिती नाही असे म्हणणाऱ्या निवेदकांची संख्या ८ (८%) आहे.

वरील सारणीवरुन असे निष्कर्षास येते की, ग्रामपंचायतीच्या हददीमध्ये आरोग्य सुविधा असून त्याचा वापर होत नसल्याने त्याविषयी सर्व ग्रामस्थांना माहिती नाही.

## सारणी क्र. ३०

## निवेदकांच्या मते ग्रामपंचायतीच्या हददीमध्ये आरोग्याची सुविधा उपलब्ध होण्यासाठी केलेले विशेष प्रयत्न दर्शविणारी सारणी

| अ.क्र | तपशील | वारंवारिता | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | ग्रामपंचायतीमध्ये ठराव मंजूर करुन घेतला | ७ | ७% |
| २ | ग्रामसभेमध्ये मुददा मांडला | १६ | १६% |
| ३ | काहीच नाही | ७७ | ७७% |
| एकूण | | १०० | १००% |

वरील सारणीवरुन असे निदर्शनास येते की , एकूण १०० निवेदकांपैकी,ग्रामपंचायतीच्या हददीमध्ये आरोग्याची सुविधा उपलब्ध होण्यासाठीग्रामपंचायतीमध्ये ठराव मंजूर करुन घेतलाअसे म्हणणाऱ्या निवेदकांची संख्या ७ (७%) आहे, ग्रामपंचायतीच्या हददीमध्ये आरोग्याची सुविधा उपलब्ध होण्यासाठीग्रामसभेमध्ये मुददा मांडलाअसे म्हणणाऱ्या निवेदकांची संख्या १६ (१६%) आहे, तर ग्रामपंचायतीच्या हददीमध्ये आरोग्याची सुविधा उपलब्ध होण्यासाठीकाहीच प्रयत्न केले नाहीत असे म्हणणाऱ्या निवेदकांची संख्या ७७ (७७%) आहे.

वरील सारणीवरुन असे निष्कर्षास येते की,आरोग्याची सुविधा उपलब्ध होण्यासाठी७७% ग्रामस्थांनी काहीच प्रयत्न केलेले नाहीत.

**सारणी क्र. ३१**

**ग्रामपंचायतीच्या हददीमध्ये आरोग्याची सुविधा उपलब्ध नसल्याने ग्रामस्थांना इतरत्र आरोग्याच्या सुविधेसाठी जावे लागणारे अंतर व ठिकाण दर्शविणारी सारणी**

| अ.क्र | तपशील | वारंवारिता | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | १०-१५ कि.मी अंतरावर कासा या ठिकाणी | ४८ | ४८% |
| २ | कधी कधी सायवन येथे ८ कि.मी अंतरावर | ८ | ८% |
| ३ | तलवाडा या ठिकाणी ८ कि.मी अंतरावर | ४४ | ४४% |
| एकूण | | १०० | १००% |

वरील सारणीवरुन असे निदर्शनास येते की , एकूण १०० निवेदकांपैकी,ग्रामपंचायतीच्या हददीमध्ये आरोग्याची सुविधा उपलब्ध नसल्यामुळे१०-१५ कि.मी अंतरावर कासा या ठिकाणीआरोग्य सुविधेसाठी जावे लागते असे सांगणाऱ्या निवेदकांची संख्या ४८ (४८%) आहे, तर ग्रामपंचायतीच्या हददीमध्ये आरोग्याची सुविधा उपलब्ध नसल्यामुळेकधी कधी ८ कि.मी अंतरावरील सायवनया ठिकाणीआरोग्य सुविधेसाठी जावे लागते असे सांगणाऱ्या निवेदकांची संख्या ८ (८%) आहे, तसेच गावात आरोग्याची सुविधा उपलब्ध नसल्यामुळे८ कि.मी अंतरावर तलवाडा या ठिकाणी आरोग्य सुविधेसाठी जावे लागते असे सांगणाऱ्या निवेदकांची संख्या ४४ (४४%) आहे.

वरील सारणीवरुन असे निष्कर्षास येते की, आरोग्य सुविधेसाठी ग्रामस्थांना १०-१५ कि.मी अंतरावर जावे लागते.

## सारणी क्र. ३२

## ग्रामपंचायतीच्या हददीमधील आरोग्याच्या सुविधेविषयी निवेदकांचे मत दर्शविणारी सारणी


| अ.क्र | तपशील | वारंवारिता | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | गावातील आरोग्य केंद्रात नर्स किंवा डॉक्टर २४ तास राहणे गरजेचे आहे | ५३ | ५३% |
| २ | गावात आरोग्य केंद्र असून त्याचा फायदा मिळत नसल्यामुळे दवाखान्यात खूप लांब जावे लागते | ३१ | ३१% |
| ३ | खाजगी दवाखाने परवडत नाही | १० | १०% |
| ४ | पावसाळयामध्ये आरोग्याच्या समस्या खूप वाढतात | ६ | ६% |
| एकूण | | १०० | १००% |

वरील सारणीवरुन असे निदर्शनास येते की , एकूण १०० निवेदकांपैकी,ग्रामपंचायतीच्या हददीमधील आरोग्याच्या सुविधेविषयीगावातील आरोग्य केंद्रात नर्स किंवा डॉक्टर २४ तास राहणे गरजेचे आहे असे मत असणाऱ्या निवेदकांची संख्या ५३ (५३%) आहे, गावात आरोग्य केंद्र असून त्याचा फायदा मिळत नसल्यामुळे दवाखान्यात दुसरीकडे खूप लांब जावे लागतेअसे मत असणाऱ्या निवेदकांची संख्या ३१ (३१%) आहे, तर खाजगी दवाखाने परवडत नाही असे मत असणाऱ्या निवेदकांची संख्या १० (१०%) आहे. आणि ग्रामपंचायतीच्या हददीमध्ये आरोग्याची सुविधा उपलब्ध नसल्यामुळेपावसाळयामध्ये आरोग्याच्या समस्या खूप वाढतात असे मत असणाऱ्या निवेदकांची संख्या ६ (६%) आहे.

वरील सारणीवरुन असे निष्कर्षास येते की, गावामध्ये शासकीय आरोग्य केंद्र आहे परंतू ते २४ तास बंद असल्यामुळे गावातील लोकांना दवाखान्यात खूप लांब जावे लागते. पावसाळयात आजारांचे प्रमाण वाढते त्यामुळे लोकांना खूप त्रास सहन करावा लागतो. तसेच खाजगी दवाखाने परवडत नाही.

**आलेख क्र. ८**

**निवेदकांच्या मते ग्रामपंचायतीच्या अंतर्गत पाडयांवरती कुपोषणविषयी निवेदकांचे मत दर्शविणारा आलेख**




वरील आलेखावरुन असे निदर्शनास येते की, एकूण १०० निवेदकांपैकी,ग्रामपंचायतीच्या अंतर्गत पाडयांवरती कुपोषण आहे असे मत व्यक्त करणाऱ्या निवेदकांची संख्या ६२ (६२%) आहे, आणि ग्रामपंचायतीच्या अंतर्गत पाडयांवरती कुपोषण नाही असे मत व्यक्त करणाऱ्या निवेदकांची संख्या १२ (१२%) आहे, तर ग्रामपंचायतीच्या अंतर्गत पाडयांवरती कुपोषण असल्याविषयी सांगता येत नाही असे मत व्यक्त करणाऱ्या निवेदकांची संख्या २६ (२६%) आहे,

वरील आलेखवरुन असे निष्कर्षास येते की, आंबेघर तर्फे धरमपूर याग्रामपंचायतीच्या अंतर्गत पाडयांवरती कुपोषण आहे असे ६२% निवेदकांचे मत आहे.

## सारणी क्र. ३३

### निवेदकांच्या मते कुपोषणाचे प्रमाण कमी करण्यासाठी ग्रामपंचायतीने केलेले प्रयत्न दर्शविणारी सारणी

| अ.क्र | तपशील | वारंवारिता | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | अंगणवातील कर्मचाऱ्यांच्या मिटींग घेतल्या | २४ | २४% |
| २ | अंगणवातीला भेटी दिल्या | १५ | १५% |
| ३ | ग्रामसभेमध्ये पालकांना मुलांच्या आहाराकडे लक्ष दिण्यास सांगितले | ५४ | ५४% |
| ४ | काहीच नाही | ७ | ७% |
| एकूण | | १०० | १००% |

वरील सारणीवरुन असे निदर्शनास येते की , एकूण १०० निवेदकांपैकी,कुपोषणाचे प्रमाण कमी करण्यासाठी ग्रामपंचायतीनेअंगणवातील कर्मचाऱ्यांच्या मिटींग घेतल्या असे सांगणाऱ्यानिवेदकांची संख्या २४ (२४%) आहे, कुपोषणाचे प्रमाण कमी करण्यासाठी ग्रामपंचायतीनेअंगणवातीला भेटी दिल्या असे सांगणाऱ्यानिवेदकांची संख्या १५ (१५%) आहे, तर कुपोषणाचे प्रमाण कमी करण्यासाठी ग्रामपंचायतीनेग्रामसभेमध्ये पालकांना मुलांच्या आहाराकडे लक्ष दिण्यास सांगितले असे सांगणाऱ्यानिवेदकांची संख्या ५४ (५४%) आहे, आणि कुपोषणाचे प्रमाण कमी करण्यासाठी ग्रामपंचायतीनेकाहीच केलेले नाही असे सांगणाऱ्यानिवेदकांची संख्या ७ (७%) आहे,

वरील सारणीवरुन असे निष्कर्षास येते की, कुपोषणाचे प्रमाण कमी करण्यासाठी ग्रामपंचायतीने अंगणवाडी कर्मचाऱ्यांच्या मिटींग घेतल्या तसेच ग्रामसभेमध्ये कपोषण चर्चा करुन कुपोषित बालकांच्या पालकांना सुध्दा बालकांच्या आहाराकडे लक्ष देण्यास सूचविले.

**सारणी क्र. ३४**

**घरात विजेची सोय असल्याचे निवेदकांचे मत दर्शविणारी सारणी**

| अ.क्र | तपशील | वारंवारिता | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | होय | ९६ | ९६% |
| २ | नाही | ४ | ४% |
| एकूण | | १०० | १००% |

वरील सारणीवरुन असे निदर्शनास येते की , एकूण १०० निवेदकांपैकी,घरात विजेची सोय आहे अशा निवेदकांची संख्या ९६ (९६%) आहे, तर घरात विजेची सोय आहे अशा निवेदकांची संख्या ४ (४%) आहे,

वरील सारणीवरुन असे निष्कर्षास येते की, आंबेघर तर्फे धरमपूर या ग्रामपंचायतीमधील सर्व घरांमध्ये वीजेची सुविधा उपलब्ध आहे.

**सारणी क्र. ३५**

**विजेच्या सुविधेविषयी निवेदकांचे मत दर्शविणारी सारणी**

| अ.क्र | तपशील | वारंवारिता | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | विजबिल खूप जास्त येते | ३५ | ३५% |
| २ | वीज खूप मोठया प्रमाणात खंडीत केली जाते | ३३ | ३३% |
| ३ | विजेचे खांब खूप जूने झालेले आहेत परंतू त्यांच्याकडे दूर्लक्ष होते | २४ | २४% |
| ४ | वीजेच्या सुविधेविषयी काहीही समस्या नाही | ८ | ८% |
| एकूण | | १०० | १००% |

वरील सारणीवरुन असे निदर्शनास येते की , एकूण १०० निवेदकांपैकी,विजबिल खूप जास्त येते असे वीचेच्या सुविधेविषयी मत मांडणाऱ्यानिवेदकांची संख्या ३५ (३५%) आहे, वीज खूप मोठया प्रमाणात खंडीत केली जाते असेवीचेच्या सुविधेविषयी मत मांडणाऱ्या निवेदकांची संख्या ३३ (३३%) आहे, तर विजेचे खांब खूप जूने झालेले आहेत परंतू त्यांच्याकडे दूर्लक्ष होते असे मत मांडणाऱ्या निवेदकांची संख्या २४ (२४%) आहे, आणि वीजेच्या सुविधेविषयी काहीही तक्रार नाही असे मत मांडणाऱ्या निवेदकांची संख्या ८ (८%) आहे.

वरील सारणीवरुन असे निष्कर्षास येते की, वीज मोठया प्रमाणावर खंडीत करणे आणि वीज बिल खूप जास्त येणे या अडचणी येथील ग्रामस्थांच्या वीज सुविधेबाबत मोठया समस्या आहेत.

**सारणी क्र. ३६**

**ग्रामपंचायतीच्या हददीमधील पाडयांवरती अंगणवाडी सोय असण्याविषयी निवेदकांचे मत दर्शविणारी सारणी**

| अ.क्र | तपशील | वारंवारिता | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | होय | ८७ | ८७% |
| २ | नाही | १३ | १३% |
| एकूण | | १०० | १००५ |

वरील सारणीवरुन असे निदर्शनास येते की, एकूण १०० निवेदकांपैकी,आमच्या पाडयावरती अंगणवाडीचीसोय आहे असे सांगणाऱ्यानिवेदकांची संख्या ८७ (८७%) आहे, तर आमच्या पाडयावरती अंगणवाडीची सोय नाही असे सांगणाऱ्यानिवेदकांची संख्या १३ (१३%) आहे.

वरील सारणीवरुन असे निष्कर्षास येते की, १३% निवेदकांच्या पाडयांवरती अंगणवाडीची सुविधा नाही.

## सारणी क्र. ३७

### निवेदकांच्या मते अंगणवाडीची पाहणी करणारे अधिकारी दर्शविणारी सारणी

| अ.क | तपशील | वारंवारिता | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | ग्रामसेवक, सरपंच | ३५ | ३५% |
| २ | विस्तार अधिकारी | ० | ०% |
| ३ | ग्रामस्थ | ९ | ९% |
| ४ | महिला बालकल्याणचे अधिकारी | २४ | २४% |
| ५ | सांगता येत नाही | ३२ | ३२% |
| एकूण | | १०० | १००% |

वरील सारणीवरुन असे निदर्शनास येते की , एकूण १०० निवेदकांपैकी,अंगणवाडीची पाहणी ग्रामसेवक आणि सरपंच करतात असे सांगणाऱ्या निवेदकांची संख्या ३५ (३५%) आहे, अंगणवाडीची पाहणी महिला बालकल्याणचे अधिकारी करतात असे सांगणाऱ्या निवेदकांची संख्या २४ (२४%) आहे, तर अंगणवाडीची पाहणी कोण करतात हे सांगता येत नाही असे सांगणाऱ्या निवेदकांची संख्या ३२ (३२%) आहे.

वरील सारणीवरुन असे निष्कर्षास येते की, ३५% निवेदकांच्या मते अंगणवाडीची पाहणी ग्रामसेवक आणि सरपंच करतात.

**सारणी क्र. ३८**

**निवेदकांच्या मते अंगणवाडीची पाहीणी करण्याचा कालावधी दर्शविणारी सारणी**

| अ.क्र | तपशील | वारंवारिता | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | एक किंवा दोन वर्षांतून कधीतरी एकदा | १४ | १४% |
| २ | वर्षांतून एकदा | ६ | ६% |
| ३ | माहीती नाही | ८० | ८०% |
| एकूण | | १०० | १००% |

वरील सारणीवरुन असे निदर्शनास येते की , एकूण १०० निवेदकांपैकी,अंगणवाडीची पाहणी ही एक किंवा दोन वर्षांतून कधीतरी एकदा होते असे सांगणाऱ्या निवेदकांची संख्या १४ (१४%)आहे, अंगणवाडीची पाहणी ही एका वर्षांतून एकदा होते असे सांगणाऱ्या निवेदकांची संख्या ६ (६%)आहे, आणि अंगणवाडीची पाहणी कधी केली जाते हे माहीती नाही असे सांगणाऱ्या निवेदकांची संख्या ८० (८०%) आहे.

वरील सारणीवरुन असे निष्कर्षास येते की, ८०% निवेदकांच्या मते अंगणवाडीची पाहणी कधी केली जाते हे माहीती नाही.

## सारणी क्र. ३९

## ग्रामपंचायतीच्या हददीमधील पाडयांवरती रस्त्यांच्या उपलब्ध सुविधेविषयी निवेदकांचे मत दर्शविणारी सारणी

| अ.क्र | तपशील | वारंवारिता | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | पक्क्या | ६२ | ६२% |
| २ | कच्च्या | २५ | २५% |
| ३ | पायवाट | १३ | १३% |
| ४ | मातीचे | ० | ०% |
| एकूण | | १०० | १००% |

वरील सारणीवरुन असे निदर्शनास येते की, एकूण १०० निवेदकांपैकी,आमच्या पाडयावरती पक्का रस्ता आहे असे सांगणाऱ्या निवेदकांची संख्या ६२ (६२%) आहे, आणि आमच्या पाडयावरती कच्चा रस्ता आहे असे सांगणाऱ्या निवेदकांची संख्या २५ (२५%) आहे, तर आमच्या पाडयावरती नुसती पायवाट आहे असे सांगणाऱ्या निवेदकांची संख्या १३ (१३%) आहे.

वरील सारणीवरुन असे निष्कर्षास येते की, ६२% लोकांच्या पाडयावरती पक्क्या रस्त्याची सुविधा आहे, तर २५% लोकांच्या पाडयावरती पक्क्या रस्त्याची सुविधा नाही. आणि १३% लोकांना आपल्या पाडयावर जाण्यासाठी पायवाटेने जावे लागते.

## सारणी क्र. ४०

## निवेदकांच्या मते रस्ता तयार होण्यासाठी केलेले विशेष प्रयत्न दर्शविणारी सारणी


| अ.क्र | तपशील | वारंवारिता | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | ग्रामसभेत मुददा मांडून ठराव पास करुन घेतला | ३४ | ३४% |
| २ | पंचायत समिती स्तरावर अर्ज दिले | २ | २% |
| ३ | ग्रामसेवकास शासनाकडे वेळोवळी पाठपुरावा करण्यास सांगितले | ४ | ४% |
| ४ | काहीच नाही | ६० | ६०% |
| एकूण | | १०० | १००% |

वरील सारणीवरुन असे निदर्शनास येते की, एकूण १०० निवेदकांपैकी,गावातील रस्ता तयार होण्यासाठी ग्रामसभेत मुददा मांडून ठराव पास करुन घेतला असे म्हणणाऱ्या निवेदकांची संख्या ३४ (३४%) आहे, गावातील रस्ता तयार होण्यासाठीपंचायत समिती स्तरावर अर्ज दिलेअसे म्हणणाऱ्या निवेदकांची संख्या २ (२%) आहे, तर गावातील रस्ता तयार होण्यासाठीग्रामसेवकास शासनाकडे वेळोवळी पाठपुरावा करण्यास सांगितले असे म्हणणाऱ्या निवेदकांची संख्या ४ (४%) आहे, आणि गावातील रस्ता तयार होण्यासाठीकाहीही प्रयत्न केलेले नाहीत असे म्हणणाऱ्या निवेदकांची संख्या ६० (६०%) आहे.

वरील सारणीवरुन असे निष्कर्षास येते की, गावातील रस्ता तयार होण्यासाठी४०% लोकांनी प्रयत्न केले. तर ६०% लोकांनी काहीच प्रयत्न केलेले नाहीत.

**आलेख क्र. ९**

**ग्रामपंचायतीने रोजगार उपलब्ध करुन दिला असल्याविषयीचे निवेदकांचे मत दर्शविणारा आलेख**




वरील आलेखावरुन असे निदर्शनास येते की, एकूण १०० निवेदकांपैकी,ग्रामपंचायतीने रोजगार उपलब्ध करुन दिला असे मत मांडणाऱ्या निवेदकांची संख्या २८ (२८%) आहे, तर ग्रामपंचायतीने रोजगार उपलब्ध करुन दिलेला नाही असे मत मांडणाऱ्या निवेदकांची संख्या ७२ (७२%) आहे.

वरील आलेखावरुन असे निष्कर्षास येते की, ७२% निवेदकांच्या म्हणण्यानुसार ग्रामपंचायतीने रोजगार उपलब्ध करुन दिलेला नाही.

## सारणी क्र. ४१

## निवेदकांच्या मते ग्रामपंचायतीने उपलब्ध करुन दिलेल्या रोजगाराच्या सुविधा दर्शविणारी सारणी

| अ.क्र | तपशील | वारंवारिता | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | रोजगार हमीची कामे दिली जातात पण एक दोन आठवडे फक्त | २० | २०% |
| २ | सर्व लोकांना काम मिळत नाही फक्त निवडक लोकांनाच मिळते | ८ | ८% |
| ३ | कामे दिली जात नाहीत | ७२ | ७२% |
| एकूण | | १०० | १००% |

वरील सारणीवरुन असे निदर्शनास येते की, एकूण १०० निवेदकांपैकी, ग्रामपंचायतीमध्ये रोजगार हमीची कामे दिली जातात पण एक दोन आठवडे फक्त असे म्हणणाऱ्या निवेदकांची संख्या २० (२०%) आहे, ग्रामपंचायीमध्येसर्व लोकांना काम मिळत नाही फक्त निवडक लोकांनाच मिळते असे म्हणणाऱ्या निवेदकांची संख्या ८ (८%) आहे, तर ग्रामपंचायत रोजगार हमीची कामे उपलब्ध करुन देत नाही असे म्हणणाऱ्या निवेदकांची संख्या ७२ (७२%) आहे.

वरील सारणीवरुन असे निष्कर्षास येते की, ७२% निवेदकांच्या मताप्रमाणे ग्रामपंचायतीमध्ये रोजगार हमीची कामे उपलब्ध करुन दिली जात नाहीत. आणि दिलीच तर काही ठराविकच लोकांना काहीच दिवसांपूरतीच दिली जातात.

## सारणी क्र. ४२

**निवेदकांनी गावामध्ये रोजगार उपलब्ध व्हावा यासाठी केलेले विशेष प्रयत्न दर्शविणारी सारणी**


| अ.क्र | तपशील | वारंवारिता | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | ग्रामसभेत मुददा मांडला | ३३ | ३३% |
| २ | तहसिलदार यांच्याशी भेट | ० | ०% |
| ३ | लोकांना त्याबाबत माहिती दिली | २१ | २१% |
| ४ | काहीच नाही | ४६ | ४६% |
| एकूण | | १०० | १००% |

वरील सारणीवरुन असे निदर्शनास येते की, एकूण १०० निवेदकांपैकी,गावामध्ये रोजगार उपलब्ध व्हावा म्हणून ग्रामसभेत मुददा मांडलाअसे मत मांडणाऱ्या निवेदकांची संख्या ३३ (३३%) आहे, आणि गावामध्ये रोजगार उपलब्ध व्हावा म्हणून लोकांना त्याबाबत माहिती दिली असे मत मांडणाऱ्या निवेदकांची संख्या २१ (२१%) आहे, तर गावामध्ये रोजगार उपलब्ध व्हावा म्हणून काहीच प्रयत्न केलेले नाहीत अशा निवेदकांची संख्या ४६ (४६%) आहे.

वरील सारणीवरुन असे निष्कर्षास येते की, गावामध्ये रोजगार उपलब्ध व्हावा म्हणून तहसिलदार यांना अर्ज द्यावा लागतो परंतू तसे एकाही ग्रामस्थाने केले नाही. तसेच ४६% ग्रामस्थांनी रोजगार उपलब्ध होण्यासाठी काहीच केलेले नाही.

**आलेख क्र. १०**

**निवेदकांची ग्रामसभेतील उपस्थिती दर्शविणारा आलेख**




वरील आलेखावरुन असे निदर्शनास येते की, एकूण १०० निवेदकांपैकी,ग्रामसभेला उपस्थित राहतो असे मत व्यक्त करणाऱ्या निवेदकांची संख्या ५७ (५७%) आहे, आणि ग्रामसभेला उपस्थित राहत नाहीत असे मत व्यक्त करणाऱ्या निवेदकांची संख्या ९ (९%) आहे, तर कधी- कधी ग्रामसभेला हजर राहतो असे मत व्यक्त करणाऱ्या निवेदकांची संख्या ३४ (३४%) आहे.

वरील आलेखावरुन असे निष्कर्षास येते की, ५७% निवेदक हे प्रत्येक ग्रामसभेला उपस्थित राहतात तर ४३% निवेदक हे ग्रामसभेला कधीतरी ग्रामसभेला येतात.

**सारणी क्र. ४३**

**निवेदकांच्या मते ग्रामसभेमध्ये ग्रामस्थांची उपस्थित न राहण्यामागची कारणे दर्शविणारी सारणी**


| अ.क्र | तपशील | वारंवारिता | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | ग्रामसभेला उपस्थित राहतो | ५७ | ५७% |
| २ | आमची मते लाकांना पटत नाहीत म्हणून आम्ही ग्रामसभेला येत नाही | ६ | ६% |
| ३ | लोकांच्या वेळेनुसार ग्रामसभा घेतली जात नाही | १५ | १५% |
| ४ | ग्रामपंचायत कार्यालय खूप लांब आहे | २२ | २२% |
| एकूण | | १०० | १००% |

वरील सारणीवरुन असे निदर्शनास येते की, एकूण १०० निवेदकांपैकी,ग्रामसभेला उपस्थित राहतो असे सांगणाऱ्या निवेदकांची संख्या ५७ (५७%) आहे, आमची मते लाकांना पटत नाहीत म्हणून आम्ही ग्रामसभेला येत नाही असे सांगणाऱ्या निवेदकांची संख्या ६ (६%) आहे, लोकांच्या वेळेनुसार ग्रामसभा घेतली जात नाही असे सांगणाऱ्या निवेदकांची संख्या १५ (१५%) आहे, आणि ग्रापंचायत कार्यालय खूप लांब आहेम्हणून आम्ही ग्रामसभेला येत नाही असे सांगणाऱ्या निवेदकांची संख्या २२ (२२%) आहे.

वरील सारणीवरुन असे निष्कर्षास येते की, ६% निवेदकांच्या म्हणण्याप्रमाणे ग्रामसभेला ग्रामस्थांमध्ये मतभेद होतात असे दिसते. तसेच ग्रामसभा ग्रामस्थांच्या वेळेप्रमाणे घेतल्या जात नाहित.

**आलेख क्र. ११**

**निवेदकांचे ग्रामसभेमध्ये मुददा मांडण्याचे मत दर्शविणारा आलेख**




वरील आलेखावरुन असे निदर्शनास येते की, एकूण १०० निवेदकांपैकी,आम्ही ग्रामसभेमध्ये मुददा मांडतो असे मत मांडणाऱ्या निवेदकांची संख्या ६२ (६२%) आहे, तर ग्रामसभेमध्ये मुददा न मांडणाऱ्या निवेदकांची संख्या ३८ (३८%) आहे.

वरील आलेखावरुन असे निष्कर्षास येते की, ३८% निवेदक ग्रामसभेमध्ये मुददा मांडत नाहीत.

## सारणी क्र. ४४

### निवेदकांच्या मते ग्रामपंचायतीच्या समित्यांमध्ये निवड झालेले सदस्य दर्शविणारी सारणी

| अ.क्र | तपशील | वारंवारिता | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | ग्रामकोष समिती | २ | २% |
| २ | शांतता/ तंटा मुक्ती समिती | १२ | १२% |
| ३ | मादव द्रव्य नियंत्रण | ० | ०% |
| ४ | नियोजन व व्यवस्थापन समिती | १५ | १५% |
| ५ | कर्ज नियंत्रण समिती | ० | ०% |
| ६ | कोणत्याही नाही. | ७१ | ७१% |
| एकूण | | १०० | १००% |

वरील सारणीवरुन असे निदर्शनास येते की, एकूण १०० निवेदकांपैकी,ग्रामकोष समितीमध्ये निवड झालेली आहेअसे मत मांडणाऱ्या निवेदकांची संख्या २ (२%) आहे, शांतता/ तंटा मुक्ती समितीमध्ये निवड झालेली आहे असे मत मांडणाऱ्या निवेदकांची संख्या १२ (१२%) आहे, आणि नियोजन व व्यवस्थापन समितीमध्ये निवड झालेली आहे असे मत मांडणाऱ्या निवेदकांची संख्या १५ (१५%) आहे, तर कोणत्याही समितीमध्ये निवड झालेली नाही असे मत मांडणाऱ्या निवेदकांची संख्या ७१ (७१%) आहे,

वरील सारणीवरुन असे निष्कर्षास येते की, कोणत्याही समितीमध्ये निवड झालेली नाही अशा निवेदकांचे प्रमाण सर्वाधिक ७१% आहे. तर मादक द्रव्य नियंत्रण व कर्ज नियंत्रण या समित्याच सदर ग्रामपंचायतीमध्ये स्थापन करण्यात आलेल्या नाहीत.

## सारणी क्र. ४५

### ग्रामसभेला जास्तीत जास्त ग्रामस्थांनी उपस्थित राहावे असे निवेदकांचे मत दर्शविणारी सारणी

| अ.क्र | तपशील | वारंवारिता | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | होय | १०० | १००% |
| २ | नाही | ० | ०% |
| एकूण | | १०० | १००% |

वरील सारणीवरुन असे निदर्शनास येते की, एकूण १०० निवेदकांपैकी,ग्रामसभेला जास्तीत जास्त ग्रामस्थांनी उपस्थित राहावे असे म्हणणाऱ्या निवेदकांची संख्या १०० (१००%) आहे, तरग्रामसभेला जास्तीत जास्त ग्रामस्थांनी उपस्थित राहू नये असे म्हणणाऱ्या निवेदकांची संख्या एकही नाही.

वरील सारणीवरुन असे निष्कर्षास येते की, १००% निवेदकांना असे वाटते की, ग्रामसभेला जास्तीत जास्त ग्रामस्थांनी उपस्थित राहावे.

**सारणी क्र. ४६**

**निवेदकांच्या मते ग्रामसभेला उपस्थित न राहणाऱ्या ग्रामस्थांना ग्रामसभेमध्ये झालेल्या चर्चेविषयी माहिती देण्याचे मत दर्शविणारी सारणी**

| अ.क्र | तपशील | वारंवारिता | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | होय | ८९ | ८९% |
| २ | नाही | ११ | ११% |
| एकूण | | १०० | १००% |

वरील सारणीवरुन असे निदर्शनास येते की, एकूण १०० निवेदकांपैकी,ग्रामसभेला उपस्थित न राहणाऱ्या ग्रामस्थांना ग्रामसभेमध्ये झालेल्या चर्चेविषयी माहिती देतो असे म्हणणाऱ्या निवेदकांची संख्या ८९ (८९%) आहे, तरग्रामसभेला उपस्थित न राहणाऱ्या ग्रामस्थांना ग्रामसभेमध्ये झालेल्या चर्चेविषयी माहिती देत नाही असे म्हणणाऱ्या निवेदकांची संख्या ११ (११%) आहे.

वरील सारणीवरुन असे निष्कर्षास येते की, ग्रामसभेला उपस्थित न राहणाऱ्या ग्रामस्थांना ग्रामसभेमध्ये झालेल्या चर्चेविषयी माहिती देतो असे म्हणणाऱ्या निवेदकांचे प्रमाण सर्वाधिक ८९% आहे.

## सारणी क्र. ४७

### ग्रामपंचायतीच्या गावांमध्ये शिक्षण समिती नेमण्याविषयीचे निवेदकांचे मत दर्शविणारी सारणी

| अ.क्र | तपशील | वारंवारिता | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | होय | ६४ | ६४% |
| २ | नाही | ८ | ८% |
| ३ | सांगता येत नाही | २८ | २८% |
| एकूण | | १०० | १००% |

वरील सारणीवरुन असे निदर्शनास येते की, एकूण १०० निवेदकांपैकी,गावामध्ये शिक्षण समिती नेमण्यात आलेली आहे असे सांगणाऱ्या निवेदकांची संख्या ६४ (६४%) आहे, आणि गावामध्ये शिक्षण समिती नेमण्यात आलेली नाही असे सांगणाऱ्या निवेदकांची संख्या ८ (८%) आहे, तसेच गावामध्ये शिक्षण समिती नेमण्याविषयी सांगता येणार नाही असे सांगणाऱ्या निवेदकांची संख्या २८ (२८%) आहे.

वरील सारणीवरुन असे निष्कर्षास येते की, गावातील शिक्षण समिती विषयी काहीही माहिती नाही अशा निवेदकांची संख्या २८% आहे. तर शिक्षण समिती नेमण्यात आलेली नाही असे ८% निवेदकांचे मत आहे.

**सारणी क्र. ४८**

**गावातील शाळेला भेट देण्याविषयीचे निवेदकांचे मत दर्शविणारी सारणी**

| अ.क्र | तपशील | वारंवारिता | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | होय | ५८ | ५८% |
| २ | नाही | ४२ | ४२% |
| एकूण | | १०० | १००% |

वरील सारणीवरुन असे निदर्शनास येते की, एकूण १०० निवेदकांपैकी,शाळेला भेट देतो असे मत मांडणाऱ्या निवेदकांची संख्या ५८ (५८%) आहे, तर शाळेला भेट नाही असे मत मांडणाऱ्या निवेदकांची संख्या ४२ (४२%) आहे.

वरील सारणीवरुन असे निष्कर्षास येते की, ५८% निवेदकांचे पाल्य शाळेत असल्यामुळे ते शाळेला भेट देतात.

**सारणी क्र. ४९**

**निवेदकांच्या मते ग्रामपंचायतीमधील माहिती असलेल्या समित्या दर्शविणारी सारणी**


| अ.क्र | तपशील | वारंवारिता | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | तंटामुक्त समिती, शिक्षण समिती , वनहक्क समिती, पाणी पुरवठा समिती, आरोग्य समिती | १५ | १५% |
| २ | शिक्षण समिती | ३२ | ३२% |
| ३ | तंटामुक्त समिती, पाणी पुरवठा समिती | ४८ | ४८% |
| ४ | तंटामुक्त समिती, शिक्षण समिती , आरोग्य समिती | ५ | ५% |
| एकूण | | १०० | १००% |

वरील सारणीवरुन असे निदर्शनास येते की, एकूण १०० निवेदकांपैकी,ग्रामपंचायतीमध्ये तंटामुक्त समिती, शिक्षण समिती , वनहक्क समिती, पाणी पुरवठा समिती, आरोग्य समिती अशा समित्या आहेत असे सांगणाऱ्या निवेदकांची संख्या १५ (१५%) आहे, फक्त शिक्षण समिती माहिती असलेल्या निवेदकांची संख्या ३२ (३२%) आहे. आणि तंटामुक्त समिती, पाणी पुरवठा समितीअशा समित्या आहेत असे सांगणाऱ्या निवेदकांची संख्या ४८ (४८%) आहे, तसेच तंटामुक्त समिती, शिक्षण समिती, आरोग्य समिती अशा समित्या माहीती आहेत असे सांगणाऱ्या निवेदकांची संख्या ५ (५%) आहे.

वरील सारणीवरुन असे निष्कर्षास येते की, तंटामुक्त समिती, पाणी पुरवठा समितीअशा समित्या माहीती आहेत असे सांगणाऱ्या निवेदकांचे प्रमाण सर्वाधिक ४८% आहे.

**आलेख क्र. १२**

**निवेदकांच्या मते ग्रामपंचायतीमध्ये भांडणे - तंटे होण्याबददलचे मत दर्शविणारा आलेख**




वरील आलेखावरुन असे निदर्शनास येते की, एकूण १०० निवेदकांपैकी,ग्रामपंचायतीमध्ये भांडणे - तंटे होतात असे मत व्यक्त करणाऱ्या निवेदकांची संख्या ७६ (७६%) आहे, आणि ग्रामपंचायतीमध्ये भांडणे - तंटे होत नाहीत असे मत व्यक्त करणाऱ्या निवेदकांची संख्या २४ (२४%) आहे.

वरील आलेखवरुन असे निष्कर्षास येते की, सदर ग्रामपंचायतीची तंटा मुक्त गाव म्हणून निवड झालेली आहे. तरीसुध्दा ग्रामपंचायतीमध्ये भांडणे - तंटे होतात असे मत व्यक्त करणाऱ्या निवेदकांचे प्रमाण ७६% आहे.

**सारणी क्र. ५०**

**निवेदकांच्या मते ग्रामपंचायतीमधील भांडणे - तंटे सोडविण्याची पध्दत दर्शविणारी सारणी**


| अ.क्र | तपशील | वारंवारिता | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | पोलीस पाटीस, तंटामुक्त समितीचे अध्यक्ष आणि गावकरी मिळून चर्चा करुन दोंन्ही गटांची समजूत काढून | ७५ | ७५% |
| २ | कधी - कधी पोलीस स्टेशन ला जाऊन | २५ | २५% |
| एकूण | | १०० | १००% |

वरील सारणीवरुन असे निदर्शनास येते की, ग्रामपंचायतीमधील भांडणे - तंटे ही पोलीस पाटीस, तंटामुक्त समितीचे अध्यक्ष आणि गावकरी मिळून चर्चा करुन दोंन्ही गटांची समजूत काढूनसोडविली जातात असे सांगणाऱ्या निवेदकांची संख्या ७५ (७५%) आहे, तर कधी - कधी पोलीस स्टेशन ला जाऊन ग्रामपंचायतीमधील भांडणे - तंटे सोडविली जातात. असे सांगणाऱ्या निवेदकांची संख्या २५ (२५%) आहे,

वरील सारणीवरुन असे निष्कर्षास येते की, ग्रामपंचायतीमधील ७५% भांडणे ही पोलीस पाटीस, तंटामुक्त समितीचे अध्यक्ष आणि गावकरी मिळून चर्चा करुन दोंन्ही गटांची समजूत काढून सोडविली जातात.

**आलेख क्र. १३**

**निवेदकांच्या मते ग्रामपंचायतीमध्ये अमली पदार्थांचे उत्पादन करण्याविषयीचे मत दर्शविणारा आलेख**




वरील आलेखावरुन असे निदर्शनास येते की, एकूण १०० निवेदकांपैकी,ग्रामपंचायतीमध्ये अमली पदार्थांचे उत्पादन केले जाते असे मत व्यक्त करणाऱ्या निवेदकांची संख्या ८७ (८७%) आहे, आणि ग्रामपंचायतीमध्ये अमली पदार्थांचे उत्पादन केले जात नाही असे मत व्यक्त करणाऱ्या निवेदकांची संख्या १३ (१३%) आहे.

वरील आलेखवरुन असे निष्कर्षास येते की, ८७% निवेदकांच्या मते ग्रामपंचायतीमध्ये अमली पदार्थांचे उत्पादन केले जाते.

**सारणी क्र. ५१**

**निवेदकांच्या मते ग्रामपंचायतीमध्ये अमली पदार्थांच्या निर्मितीवर आणि सेवन करण्यावर बंदी घातली जावी की नाही याविषयीचे मत दर्शविणारी सारणी**

| अ.क्र | तपशील | वारंवारिता | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | होय | ९३ | ९३% |
| २ | नाही | ७ | ७% |
| एकूण | | १०० | १००% |

वरील सारणीवरुन असे निदर्शनास येते की, एकूण १०० निवेदकांपैकी,अमली पदार्थांच्या निर्मितीवर आणि सेवन करण्यावर बंदी घातली जावी असे मत मांडणाऱ्या निवेदकांची संख्या ९३ (९३%) आहे, तर अमली पदार्थांच्या निर्मितीवर आणि सेवन करण्यावर बंदी घातली जाऊ नये असे मत मांडणाऱ्या निवेदकांची संख्या ७ (७%) आहे.

वरील सारणीवरुन असे निष्कर्षास येते की, ९३% ग्रामस्थांना अमली पदार्थांच्या निर्मितीवर आणि सेवन करण्यावर बंदी घातली जावी असे वाटते. तर ७% ग्रामस्थांना असे वाटते अमली पदार्थांच्या निर्मितीवर आणि सेवन करण्यावर बंदी घातली जाऊ नये.

## सारणी क्र. ५२

### ग्रामपंचायतीमधील अमली पदार्थांच्या निर्मितीवर आणि सेवन करण्यावर बंदी घालण्यासाठी केलेले विशेष प्रयत्न किंवा करावयाचे प्रयत्न याविषयी निवेदकांचे मत दर्शविणारी सारणी

| अ.क्र | तपशील | वारंवारिता | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | गावातील लोकांनी एकत्र निर्णय घेऊन गावात दारु तयार करणेच बंद केले पाहीजे | ७२ | ७२% |
| २ | दारु पिणाऱ्यावर दंड आकारणी करायला पाहीजे | २२ | २२% |
| ३ | गावात दारु बंदी विषयी जनजागृती केली पाहीजे | ६ | ६% |
| एकूण | | १०० | १००% |

वरील सारणीवरुन असे निदर्शनास येते की, एकूण १०० निवेदकांपैकी, अमली पदार्थांच्या निर्मितीवर आणि सेवन करण्यावर बंदी घालण्यासाठीगावातील लोकांनी एकत्र निर्णय घेऊन गावात दारु तयार करणेच बंद केले पाहीजे असे म्हणणाऱ्या निवेदकांची संख्या ७२ (७२%) आहे, दारु पिणाऱ्यावर दंड आकारणी करायला पाहीजे असे म्हणणाऱ्या निवेदकांची संख्या २२ (२२%) आहे, तरगावात दारु बंदी विषयी जनजागृती केली पाहीजे असे म्हणणाऱ्या निवेदकांची संख्या ६ (६%) आहे,

वरील सारणीवरुन असे निष्कर्षास येते की, अमली पदार्थांच्या निर्मितीवर आणि सेवन करण्यावर बंदी घालण्यासाठी७२% निवेदकांना असे वाटते की, ग्रामस्थांनी एकत्रित निर्णय घेऊन दारु बंदी करायला हवी.

## सारणी क्र. ५३

## आठवडा बाजार करण्यासाठी ग्रामस्थांना जावे लागणारे गावापासूनचे अंतर दर्शविणारी सारणी

| अ.क्र | तपशील | वारंवारिता | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | गावातच | ० | ०% |
| २ | ५ कि.मी व त्यापेक्षा जास्त | २५ | २५% |
| ३ | २ कि.मी व त्यापेक्षा जास्त | २० | २०% |
| ४ | १० कि.मी व त्यापेक्षा जास्त | ५५ | ५५% |
| एकूण | | १०० | १००% |

वरील सारणीवरुन असे निदर्शनास येते की, एकूण १०० निवेदकांपैकी,आठवडा बाजार करण्यासाठी गावापासून ५ कि.मी व त्यापेक्षा जास्त लांब जावे लागते असे म्हणणाऱ्या निवेदकांची संख्या २५ (२५%) आहे, आणि आठवडा बाजार करण्यासाठी गावापासून २ कि.मी व त्यापेक्षा जास्त लांब जावे लागते असे म्हणणाऱ्या निवेदकांची संख्या २० (२०%) आहे, तसेच गावापासून १० कि.मी व त्यापेक्षा जास्त लांब आठवडा बाजार करण्यासाठीजावे लागते असे म्हणणाऱ्या निवेदकांची संख्या ५५ (५५%) आहे.

वरील सारणीवरुन असे निष्कर्षास येते की, आंबेघर तर्फे धरमपूर या ग्रामपंचायतीच्या हददीमध्ये आठवडा बाजार भरला जात नाही. त्यामुळे या ग्रामपंचायतीमधील ग्रामस्थांना साधारण १० ते १२ कि.मी अंतरावर आठवडा करण्यासाठी जावे लागते.

**सारणी क्र. ५४**

**निवेदकांच्या मते गावात आठवडा बाजार भरण्यासाठी केलेले प्रयत्न दर्शविणारी सारणी**

| अ.क्र | तपशील | वारंवारिता | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | होय | ० | ०% |
| २ | नाही | १०० | १००% |
| एकूण | | १०० | १००% |

वरील सारणीवरुन असे निदर्शनास येते की, एकूण १०० निवेदकांपैकी,गावात आठवडा बाजार भरावा यासाठी काहीही प्रयत्न केलेले नाहीतअसे म्हणणाऱ्या निवेदकांची संख्या १०० (१००%) आहे, तर गावात आठवडा बाजार भरावा यासाठी प्रयत्न केले असे एकही निवेदक नाही.

वरील सारणीवरुन असे निष्कर्षास येते की, गावात आठवडा बाजार भरण्यासाठी गावातील कोणीही काहीही प्रयत्न केलेले नाहीत.

**सारणी क्र. ५५**

**ग्रामपंचायतीचा विकास होण्याबददलचे निवेदकांचे मत दर्शविणारी सारणी**

| अ.क्र | तपशील | वारंवारिता | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | होय | १०० | १००% |
| २ | नाही | ० | ०% |
| एकूण | | १०० | १००% |

वरील सारणीवरुन असे निदर्शनास येते की, एकूण १०० निवेदकांपैकी,ग्रामपंचायतीचा विकास व्हावा असे वाटणाऱ्या निवेदकांची संख्या १०० (१००%) आहे, तर एकाही निवेदकाला गाव विकासापासून दूर राहावे असे वाटत नाही.

वरील सारणीवरुन असे निष्कर्षास येते की, ग्रामपंचायतीमधील सर्व ग्रामस्थांना ग्रामपंचायतीचा विकास व्हावा असे वाटते.

**सारणी क्र. ५६**

**निवेदकांच्या मते गावाचा विकास होण्यासाठी करावयाचे प्रयत्न दर्शविणारी सारणी**

| अ.क्र | तपशील | वारंवारिता | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | सरपंच व ग्रामसेवक यांनी गावात मुलभूत सोय-सुविधांचा विकास करायला पाहीजे | ६० | ६०% |
| २ | गावातील लोकांमध्ये एकता पाहीजे | ३६ | ३६% |
| ३ | ग्रामपंचायतीला दिलेल्या निधिचा योग्य प्रकारे वापर करण्यात आला पाहीजे | ४ | ४% |
| एकूण | | १०० | १००% |

वरील सारणीवरुन असे निदर्शनास येते की, एकूण १०० निवेदकांपैकी, गावाचा विकास होण्यासाठी सरपंच व ग्रामसेवक यांनी गावात मुलभूत सोय-सुविधांचा विकास करायला पाहीजे असे मत व्यक्त करणाऱ्या निवेदकांची संख्या ६० (६०%) आहे, गावाचा विकास होण्यासाठी गावातील लोकांमध्ये एकता पाहीजे असे मत व्यक्त करणाऱ्यानिवेदकांची संख्या ३६ (३६%) आहे, तर गावाचा विकास होण्यासाठी ग्रामपंचायतीला प्राप्त झालेल्या निधिचा योग्य प्रकारे वापर करण्यात आला पाहीजे असे मत व्यक्त करणाऱ्यानिवेदकांची संख्या ४ (४%) आहे.

वरील सारणीवरुन असे निष्कर्षास येते की, गावाच्या विकासासाठी मुलभूत सोय-सुविधांचा विकास होणे खूप गरजेचे आहे.

**सारणी क्र. ५७**

**निवेदकांच्या मते ग्रामपंचायतीच्या परिसरात आढळणारी संसाधने दर्शविणारी सारणी**


| अ.क्र | तपशील | वारंवारिता | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | रस्ते, नद्या, डोंगर | ३५ | ३५% |
| २ | विहीर, नद्या, जंगल, जनावरे | २६ | २६% |
| ३ | लाकडे, नदी | १० | १०% |
| ४ | माहिती नाही | २९ | २९% |
| एकूण | | १०० | १००% |

वरील सारणीवरुन असे निदर्शनास येते की, एकूण १०० निवेदकांपैकी, ग्रामपंचायतीच्या परिसरात रस्ते, नद्या, डोंगर अशी संसाधने आढळतात असे सांगणाऱ्या निवेदकांची संख्या ३५ (३५%) आहे, विहीर, नद्या, जंगल, जनावरे अशी संसाधने ग्रामपंचायतीच्या परिसरात आढळतात असे सांगणाऱ्या निवेदकांची संख्या २६ (२६%) आहे, तर ग्रामपंचायतीच्या परिसरात लाकडे, नदी अशी संसाधने आढळतात असे सांगणाऱ्या निवेदकांची संख्या १० (१०%) आहे, आणि ग्रामपंचायतीच्या परिसरात आढळणारी संसाधने माहीती नाही असे सांगणाऱ्या निवेदकांची संख्या २९ (२९%) आहे.

वरील सारणीवरुन असे निष्कर्षास येते की, २९% निवेदकांना ग्रामपंचायतीच्या परिसरात आढळणारी संसाधने कोणती आहेत हे सांगता येत नाही. तर ७१% लोकांनी ग्रामपंचायतीच्या परिसरात आढळणारी संसाधने सांगण्याचा प्रयत्न केलेला आहे.

**आलेख क्र. १४**

**ग्रामपंचायतीमध्ये निवडून दिलेल्या लोकप्रतिनिधींच्या कामांविषयी निवेदकांचे मत दर्शविणारा आलेख**




वरील आलेखावरुन असे निदर्शनास येते की, एकूण १०० निवेदकांपैकी,ग्रामपंचायतीमध्ये निवडून दिलेल्या लोकप्रतिनिधींच्या कामांविषयी समाधानी आहोत असे मत मांडणाऱ्या निवेदकांची संख्या ३३ (३३%) आहे, आणि ग्रामपंचायतीमध्ये निवडून दिलेल्या लोकप्रतिनिधींच्या कामांविषयी समाधानी नाही असे मत मांडणाऱ्या निवेदकांची संख्या ६७ (६७%) आहे.

वरील आलेखवरुन असे निष्कर्षास येते की, ६७% निवेदकग्रामपंचायतीमध्ये निवडून दिलेल्या लोकप्रतिनिधींच्या कामांविषयी समाधानी नाहीत.

**सारणी क्र. ५८**

**ग्रामसभेविषयीचे निवेदकांचे मत दर्शविणारी सारणी**

| अ.क्र | तपशील | वारंवारिता | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | विकास कामांचा ग्रामसभा पाठपुरावा करीत नाही | १८ | १८% |
| २ | ग्रामसभा वेळेवर होत नाहीत | १५ | १५% |
| ३ | गावातील जास्तीत जास्त ग्रामस्थांना ग्रामसभेला उपस्थित राहीले पाहीजे | ३० | ३०% |
| ४ | महिलांच्या समस्यांवर चर्चा केली गेली पाहीजे | १५ | १५% |
| ५ | तरुण मुलांचे म्हणणे ऐकून घेतले पाहीजे | २२ | २२% |
| एकूण | | १०० | १००% |

वरील सारणीवरुन असे निदर्शनास येते की, एकूण १०० निवेदकांपैकी, ग्रामसभा ही विकास कामांचा ग्रामसभा पाठपुरावा करीत नाही असे मत असणाऱ्यानिवेदकांची संख्या १८ (१८%) आहे,ग्रामसभा वेळेवर होत नाहीत असे ग्रामसभेविषयी मत असणाऱ्या निवेदकांची संख्या १५ (१५%) आहे,गावातील जास्तीत जास्त ग्रामस्थांना ग्रामसभेला उपस्थित राहीले पाहीजे असे मत असणाऱ्या निवेदकांची संख्या ३० (३०%) आहे, तर ग्रामसभेध्ये महिलांच्या समस्यांवर चर्चा केली गेली पाहीजे असे मत असणाऱ्यानिवेदकांची संख्या १५ (१५%) आहे, आणि तरुण मुलांचे म्हणणे ऐकून घेतले पाहीजे असे ग्रामसभेविषयी मत असणाऱ्या निवेदकांची संख्या २२ (२२%) आहे.

वरील सारणीवरुन असे निष्कर्षास येते की, ग्रामसभेला महिलांच्या प्रश्नांवर चर्चा केली जात नाही. तसेच तरुणांचे मत विचारात घेतले जात नाही.

## सारणी क्र. ५९

## ग्रामपंचायतीमधील पाडयांवरती ग्रामसभा होण्याविषयी निवेदकांचे मत दर्शविणारी सारणी


| अ.क्र | तपशील | वारंवारिता | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | होय | ३६ | ३६% |
| २ | नाही | ५८ | ५८% |
| ३ | कधीतरी | ६ | ६% |
| एकूण | | १०० | १००% |

वरील सारणीवरुन असे निदर्शनास येते की, एकूण १०० निवेदकांपैकी, आमच्यापाडयांवरती ग्रामसभा होते असे सांगणाऱ्या निवेदकांची संख्या ३६ (३६%) आहे, तर आमच्यापाडयांवरती ग्रामसभा होत नाही असे सांगणाऱ्या निवेदकांची संख्या ५८ (५८%) आहे, आणि आमच्यापाडयांवरती ग्रामसभा कधीतरी होते असे सांगणाऱ्या निवेदकांची संख्या ६ (६%) आहे.

वरील सारणीवरुन असे निष्कर्षास येते की, ग्रामपंचायतीमधील प्रत्येक वार्डमध्ये ग्रामसभेची बैठक होत नाही असे ५८% निवेदकांचे म्हणणे आहे.

**आलेख क्र. १५**

**ग्रामसभेचा फायदा होण्याविषयीचे निवेदकांचे मत दर्शविणारा आलेख**





वरील आलेखावरुन असे निदर्शनास येते की, एकूण १०० निवेदकांपैकी,ग्रामसभेचा फायदा झाला असे मत व्यक्त करणाऱ्या निवेदकांची संख्या ६५ (६५%) आहे, आणि ग्रामसभेचा फायदा झालेला नाही असे मत व्यक्त करणाऱ्या निवेदकांची संख्या ३५ (३५%) आहे.

वरील आलेखावरुन असे निष्कर्षास येते की, ग्रामसभेला उपस्थित राहील्यामुळे त्याचा वैयक्तिक व गावाचा विकास होण्यास फायदा झाला असे ६५% निवेदकांचे मत आहे.

**आलेख क्र. १६**

**ग्रामसभेमुळे निवेदकांना मिळालेला फायदा दर्शविणारा आलेख**




वरील आलेखावरुन असे निदर्शनास येते की, एकूण १०० निवेदकांपैकी,ग्रामसभेमुळे घरकूल योजनेचा लाभ मिळाला आहे असे मत मांडणाऱ्या निवेदकांची संख्या ६२ (६२%) आहे, ग्रामसभेमुळे रोजगार मिळाला आहे असे मत मांडणाऱ्या निवेदकांची संख्या ९ (९%) आहे, ग्रामसभेमुळे शेतीची अवजारे मिळाली आहेत असे मत मांडणाऱ्या निवेदकांची संख्या ११ (११%) आहे,आणि ग्रामसभेमुळे इतर योजनेचा लाभ मिळाला आहे असे मत मांडणाऱ्या निवेदकांची संख्या ८ (८%) आहे, तर ग्रामसभेमुळे कोणताही फायदा मिळालेला नाही असे मत मांडणाऱ्या निवेदकांची संख्या १० (१०%) आहे.

वरील आलेखावरुन असे निष्कर्षास येते की, ६५% ग्रामस्थांना ग्रामसभेमुळे घरकूल योजनेचा लाभ मिळाला आहे. आणि २८% ग्रामस्थांना इतर योजनांचा लाभ मिळाला आहे. तर १०% ग्रामस्थांना कोणताच लाभ मिळालेला नाही.

## सारणी क्र. ६०

## ग्रामसभेमुळे गावचा विकास होण्याच्या मदतीबाबत निवेदकांचे मत दर्शविणारी सारणी

| अ.क्र | तपशील | वारंवारिता | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | होय | ५३ | ५३% |
| २ | नाही | ३१ | ३१% |
| ३ | थोडया प्रमाणात | १६ | १६% |
| एकूण | | १०० | १००% |

वरील सारणीवरुन असे निदर्शनास येते की, एकूण १०० निवेदकांपैकी, ग्रामसभेमुळे गावचा विकास होण्यास मदत झाली असे मत व्यक्त करणाऱ्या निवेदकांची संख्या ५३ (५३%) आहे, तर ग्रामसभेमुळे गावचा विकास होण्यास मदत झालेली नाही असे मत व्यक्त करणाऱ्या निवेदकांची संख्या ३१ (३१%) आहे, आणि ग्रामसभेमुळे थोडया प्रमाणात गावचा विकास होण्यास मदत झाली असे मत व्यक्त करणाऱ्या निवेदकांची संख्या १६ (१६%) आहे.

वरील सारणीवरुन असे निष्कर्षास येते की, ३१% निवेदकांना असे वाटते की, ग्रामसभेमुळे गावचा विकास होण्यास मदत झालेली नाही.

# प्रकरण ६ वे

# निष्कर्ष, गृहितकृत्याची पडताळणी, शिफारसी अणि संशोधन विषयाचा सारांश

सदर प्रकरणामध्ये नमूद करण्यात आलेले निष्कर्ष हे तथ्यांचे विश्लेषण आणि निर्वचन केल्यानंतर दिसून आलेले निष्कर्ष आहेत. तसेच या प्रकरणामध्ये ग्रामस्थांसाठी, ग्रामसेवक आणि ग्रामपंचायतीमधील लोकप्रतिनिधींसाठी, शासन व प्रशासनासाठी सूचना करण्यात आल्या आहेत.

## ६.१ निष्कर्ष:-

१) विवाहीत असणाऱ्या ग्रामस्थांचे प्रमाणग्रामसभेला सर्वांत जास्त ७०% आहे.

२) ग्रामसभेला येणाऱ्या निवेदकांपैकी ४०% निवेदक अशिक्षित आहेत.

३) १० वीच्या पुढील शिक्षण घेतलेल्या निवेदकांचे प्रमाण फक्त १६% आहे.

४) आंबेघर तर्फे धरमपूर या ग्रामपंचायतीमध्ये सहा व त्यापेक्षा जास्त माणसे असणारी ४६% कुटुंबे आहेत.

५) आंबेघर तर्फे धरमपुर या ग्रामपंचायतीमध्ये ७३ % कुटुंबे दारिद्रयरेषेखालील आहेत.

६) आंबेघर तर्फे धरमपूर या ग्रामपंचायतीच्या ग्रामसभेला येणारी ७६% लोक स्वत:ची शेती करतात.

७) २३% लोक दुसऱ्याच्या शेतावर वेठबिगारीची कामे करुन आपला उदरनिर्वाह करतात.

८) नोकरी करणारी एकही व्यक्ती ग्रामसभेला येत नाही.

९) व्यावसाय करण्याचे प्रमाण फक्त १% आहे.

१०) आबेघर या ग्रामपंचायतीमध्ये ४४% लोकांचे वार्षिक उत्पन्न २५०००/- रुपयांपेक्षा कमी आहे.

११) तसेच १३ % लोकांना आपले वार्षिक उत्पन्न किती आहे हेच माहिती नाही.

१२) ५६% ग्रामस्थांच्या मते ग्रामसभा याचा अर्थ गावातील समस्यांवर चर्चा करुन त्याच्यावर तोडगा काढणे होय.

१३) गावाच्या विकासासाठी ग्रामसभा घेतली जाते असे ८९% निवेदकांना वाटते.

१४) ग्रामपंचायतीची ग्रामसभा असल्याची माहिती ८५% लोकांना व्यक्तीगत स्वरुपाने दिली जाते. तर दवंडी पेटवून व वर्तमानपत्राचा ग्रामसभा असल्याची माहिती देण्यासाठी वापर केला जात नाही.

१५) ग्रामसभा असल्याची माहिती ४७% लोकांना ग्रामसभेच्या एक दिवस अगोदर दिली जाते.

१६) आंबेघर तर्फे धरमपूर या ग्रामपंचायतीच्या ७५% ग्रामसभा ग्रामपंचायत कार्यालयामध्येच घेतल्या जातात. तर ग्रामपंचायतीच्या पाडयांवरती ग्रामसभा घेतल्याच जात नाहीत.

१७) ग्रामसभेला येणाऱ्या २१% लोकांना ग्रामसभेची गणपूर्तीहोण्यासाठी आवश्यक असणारी संख्या माहिती नाही.

१८) ग्रामसभेला येणाऱ्या २३% ग्रामस्थांना ग्रामसभेचे अध्यक्षपद कोणाकडे असते हेच माहिती नाही.

१९) ५४% ग्रामस्थांच्या मते ग्रामसभेमध्ये कल्याणकारी योजनांची व नवीन आलेल्या कायद्यांची माहिती दिली जात नाही.

२०) घरकूल, शौचालय, कुपोषण, रोजगार, रस्ते हे विषय ग्रामसभेमध्ये ६०% प्रमाणात चर्चिले जातात.

२१) पेसा कायदा माहीती नसणाऱ्या निवेदकांची संख्या ६८% आहे.

२२) १६% निवेदकांना गौण उपज व शांतता व सुव्यवस्था राखणे हा अधिकार पेसा कायद्याअंतर्गत अनु. जमातीसाठी देण्यात आला आहे असे वाटते.

२३) पेसा कायद्यामुळे आदिवासी क्षेत्राचा विकास होण्यास मदत होईल या विधानाशी सहमत असणाऱ्या निवेदकांचे प्रमाण सर्वाधिक ४१% आहे.

२४) वनहक्काविषयी काहीही माहीती नसणाऱ्या निवेदकांचे प्रमाण ४१% आहे.

२५) घरकूल योजनेचा लाभ मिळालेला आहे अशा निवेदकांचे प्रमाण सर्वाधिक ६८% आहे.

२६) घरकूल योजनेचा लाभ घेतला परंतू किती टक्के लाभ मिळाला हे माहिती नाही अशा निवेदकांची संख्या १६% आहे.

२७) दारिद्रयरेषेखालील यादीत नाव नसल्यामुळे घरकूल योजनेचा लाभ मिळालेला नाही असे म्हणणाऱ्या निवेदकांची संख्या १९ (१९%) आहे.

२८) २७% ग्रामस्थांच्या घरी अजूनही शौचालय बांधण्यात आलेले नाही.

२९) पैसे नाहीत म्हणून शौचालय बांधले नाही असे २७% निवेदकांचे म्हणणे आहे.

३०) पाणी पिण्यासाठी विहीर या सुविधेचा ६७% ग्रामस्थ वापर करतात.

३१) पाणी आणण्यासाठी महिलांना खूप लांब जावे लागते असे ५२% निवेदकांचे म्हणणे आहे.

३२) ग्रामस्थांना एप्रिल, मे व जून या तीन महिन्यांमध्ये पिण्याच्या पाण्यासाठी खूप त्रास सहन करावा लागतो.

३३) १६%निवेदकांच्या पाडयावरती शिक्षणाची सुविधा नसल्यामुळे तेथील मुलांना गावातील शाळांमध्ये जावे लागते.

३४) सदर ग्रामपंचायतीमध्ये ८ वी पर्यंतच शिक्षणाची सुविधा आहे. आणि पुढील शिक्षणासाठी त्यांना बाहेर जावे लागते.

३५) ग्रामपंचायतीच्या हददीमध्ये आरोग्य सुविधा असून त्याचा वापर होत नाही.

३६) आरोग्याची सुविधा उपलब्ध होण्यासाठी ७७% ग्रामस्थांनी काहीच प्रयत्न केलेले नाहीत.

३७) आरोग्य सुविधेसाठी ग्रामस्थांना १०-१५ कि.मी अंतरावर जावे लागते.

३८) पावसाळयात आजारांचे प्रमाण वाढते.

३९) आंबेघर तर्फे धरमपूर या ग्रामपंचायतीच्या अंतर्गत पाडयांवरती कुपोषण आहे असे ६२% निवेदकांचे मत आहे.

४०) कुपोषणाचे प्रमाण कमी करण्यासाठी ग्रामपंचायतीने अंगणवाडी कर्मचाऱ्यांच्या मिटींग घेतल्या तसेच ग्रामसभेमध्ये कपोषण चर्चा करुन कुपोषित बालकांच्या पालकांना सुध्दा बालकांच्या आहाराकडे लक्ष देण्यास सूचविले.

४१) आंबेघर तर्फे धरमपूर या ग्रामपंचायतीमधील सर्व घरांमध्ये वीजेची सुविधा उपलब्ध आहे.

४२) वीज मोठया प्रमाणावर खंडीत करणे आणि वीज बिल खूप जास्त येणे या अडचणी येथील ग्रामस्थांच्या वीज सुविधेबाबत मोठया समस्या आहेत.

४३) १३% निवेदकांच्या पाडयांवरती अंगणवाडीची सुविधा नाही.

४४) अंगणवाडीची पाहणी ग्रामसेवक आणि सरपंच करतात असे ३५% निवेदकांच्या पाहणीत आहे.

४५) ८०% निवेदकांच्या मते अंगणवाडीची पाहणी कधी केली जाते हे माहीती नाही.

४६) ६२% लोकांच्या पाडयावरती पक्क्या रस्त्याची सुविधा आहे, तर २५% लोकांच्या पाडयावरती पक्क्या रस्त्याची सुविधा नाही. आणि १३% लोकांना आपल्या पाडयावर जाण्यासाठी पायवाटेने जावे लागते.

४७) गावातील रस्ता तयार होण्यासाठी४०% लोकांनी प्रयत्न केले. तर ६०% लोकांनी काहीच प्रयत्न केलेले नाहीत.

४८) ७२% निवेदकांच्या म्हणण्यानुसार ग्रामपंचायतीने रोजगार उपलब्ध करुन दिलेला नाही.

४९) ७२% निवेदकांच्या मताप्रमाणे ग्रामपंचायतीमध्ये रोजगार हमीची कामे उपलब्ध करुन दिली जात नाहीत. आणि दिलीच तर काही ठराविकच लोकांना काहीच दिवसांपूरतीच दिली जातात.

५०) गावामध्ये रोजगार उपलब्ध व्हावा म्हणून तहसिलदार यांना अर्ज द्यावा लागतो परंतू तसे एकाही ग्रामस्थाने केले नाही. तसेच ४६% ग्रामस्थांनी रोजगार उपलब्ध होण्यासाठी काहीच केलेले नाही.

५१) ५७% निवेदक हे प्रत्येक ग्रामसभेला उपस्थित राहतात तर ४३% निवेदक हे ग्रामसभेला कधीतरी ग्रामसभेला येतात.

५२) ६% निवेदकांच्या म्हणण्याप्रमाणे ग्रामसभेला ग्रामस्थांमध्ये मतभेद होतात असे दिसते. तसेच ग्रामसभा ग्रामस्थांच्या वेळेप्रमाणे घेतल्या जात नाहित.

५३) ३८% निवेदक ग्रामसभेमध्ये मुददा मांडत नाहीत.

५४) कोणत्याही समितीमध्ये निवड झालेली नाही अशा निवेदकांचे प्रमाण सर्वाधिक ७१% आहे. तर मादक द्रव्य नियंत्रण व कर्ज नियंत्रण या समित्याच ग्रामपंचायतीमध्ये स्थापन करण्यात आलेल्या नाहीत.

५५) १००% निवेदकांना असे वाटते की, ग्रामसभेला जास्तीत जास्त ग्रामस्थांनी उपस्थित राहावे.

५६) गावातील शिक्षण समिती विषयी काहीही माहिती नाही अशा निवेदकांची संख्या २८% आहे. तर शिक्षण समिती नेमण्यात आलेली नाही असे ८% निवेदकांचे मत आहे.

५७) ५८% निवेदकांचे पाल्य शाळेत असल्यामुळे ते शाळेला भेट देतात.

५८) तंटामुक्त समिती, पाणी पुरवठा समितीअशा समित्या माहीती आहेत असे सांगणाऱ्या निवेदकांचे प्रमाण सर्वाधिक ४८% आहे.

५९) ग्रामपंचायतीची तंटा मुक्त गाव म्हणून निवड झालेली आहे. तरीसुध्दा ग्रामपंचायतीमध्ये भांडणे - तंटे होतात.

६०) ग्रामपंचायतीमधील ७५% भांडणे ही पोलीस पाटीस, तंटामुक्त समितीचे अध्यक्ष आणि गावकरी मिळून चर्चा करुन दोंन्ही गटांची समजूत काढून सोडविली जातात.

६१) ८७% निवेदकांच्या मते ग्रामपंचायतीमध्ये अमली पदार्थांचे उत्पादन केले जाते.

६२) ९३% ग्रामस्थांना अमली पदार्थांच्या निर्मितीवर आणि सेवन करण्यावर बंदी घातली जावी असे वाटते. तर ७% ग्रामस्थांना असे वाटते अमली पदार्थांच्या निर्मितीवर आणि सेवन करण्यावर बंदी घातली जाऊ नये.

६३) अमली पदार्थांच्या निर्मितीवर आणि सेवन करण्यावर बंदी घालण्यासाठी ७२% निवेदकांना असे वाटते की, ग्रामस्थांनी एकत्रित निर्णय घेऊन दारु बंदी करायला हवी.

६४) आंबेघर तर्फे धरमपूर या ग्रामपंचायतीच्या हददीमध्ये आठवडा बाजार भरला जात नाही. त्यामुळे या ग्रामपंचायतीमधील ग्रामस्थांना साधारण १० ते १२ कि.मी अंतरावर आठवडा करण्यासाठी जावे लागते.

६५) गावात आठवडा बाजार भरण्यासाठी गावातील कोणीही काहीही प्रयत्न केलेले नाहीत.

६६) ग्रामपंचायतीमधील सर्व ग्रामस्थांना ग्रामपंचायतीचा विकास व्हावा असे वाटते.

६७) गावाच्या विकासासाठी मुलभूत सोय-सुविधांचा विकास होणे खूप गरजेचे आहे.

६८) २९% निवेदकांना ग्रामपंचायतीच्या परिसरात आढळणारी संसाधने कोणती आहेत हे सांगता येत नाही. तर ७१% लोकांनी ग्रामपंचायतीच्या परिसरात आढळणारी संसाधने सांगण्याचा प्रयत्न केलेला आहे.

६९) ६७% निवेदक ग्रामपंचायतीमध्ये निवडून दिलेल्या लोकप्रतिनिधींच्या कामांविषयी समाधानी नाहीत.

७०) ग्रामसभेला महिलांच्या प्रश्नांवर चर्चा केली जात नाही. तसेच तरुणांचे मत विचारात घेतले जात नाही.

७१) ग्रामपंचायतीमधील प्रत्येक वार्डमध्ये ग्रामसभेची बैठक होत नाही असे ५८% निवेदकांचे म्हणणे आहे.

७२) ग्रामसभेला उपस्थित राहील्यामुळे त्याचा वैयक्तिक व गावाचा विकास होण्यास फायदा झाला असे ६५% निवेदकांचे मत आहे.

७३) ६५% ग्रामस्थांना ग्रामसभेमुळे घरकूल योजनेचा लाभ मिळाला आहे. आणि २८% ग्रामस्थांना इतर योजनांचा लाभ मिळाला आहे. तर १०% ग्रामस्थांना कोणताच लाभ मिळालेला नाही.

७४) ३१% निवेदकांना असे वाटते की, ग्रामसभेमुळे गावचा विकास होण्यास मदत झालेली नाही.

## ६.२. गृहितकृत्याच्या तथ्यांची पडताळणी :-

संशोधनामध्ये गृहितकृत्ये खूप महत्त्वाचे मानले जातात. कारण गृहितकृत्यांची मांडणी केल्याशिवाय संशोधकाला निश्चित दिशा मिळत नाही. म्हणून गृहितकृत्ये हि संशोधकाला दिशा देण्याचे काम करतात. "**अनुसूचित क्षेत्रामधीलगट ग्रामपंचायतीच्या ग्रामस्थांचे ग्रामसभेतील योगदान**"या विषयावर वैज्ञानिक पध्दतीने अध्ययन करीत असताना प्रस्तुत विषयाच्या व इतर पूर्वज्ञानाच्या आधारे गृहितकृत्याची मांडणी करण्यात आलेली होती. त्या अनुषंगाने प्रस्तुत संशोधनाला योग्य दिशा मिळाली. व त्यामुळे सदर संशोधन विषयासंबंधी तथ्ये संकलन करुन त्याचे विश्लेषण व वर्गीकरण करण्यात आले. प्रस्तुत संशोधन विषयामध्ये दोन गृहितकृत्ये मांडण्यात आलेली होती. त्या गृहितकृत्यांची पडताळणी पुढीलप्रमाणे करण्यात आलेली आहे.

१) **ग्रामपंचायतीच्या ग्रामसभेमध्ये लोकसहभाग वाढल्यास गावाचा अधिक विकास होण्यास मदत होईल.**

ग्रामपंचायतीच्या ग्रामसभेतील **लोकसहभाग** व **गावचा विकास** यांचा सहसंबंध दर्शविणारी सारणी

**Correlations**

| | | Publice Participation in gramsabha | Facility of transport |
|---|---|---|---|
| Publice Participation in gramsabha | Pearson Correlation | 1 | .087 |
| | Sig. (2-tailed) | | .391 |
| | N | 100 | 100 |
| Facility of transport | Pearson Correlation | .087 | 1 |
| | Sig. (2-tailed) | .391 | |
| | N | 100 | 100 |

वरील Correlations सारणी वरुन असे दिसून येते की, आंबेघर तर्फे धरमपूर ग्रामपंचायतीच्या प्रत्येक ग्रामसभेला ५७ निवेदक सहभागी होतात तर ३४ निवेदक कधी - कधी येतात असे एकूण ९१% निवेदक हे ग्रामसभेला उपस्थित राहतात. तसेच या ग्रामपंचायतीच्या हद्दिमधील मुलभूत सोय - सुविधा लक्षात घेता यामध्ये मुख्यत: दळणवळणासाठी रस्त्यांच्या सुविधेविषयी एकूण १०० निवेदकांपैकी पक्क्या रस्त्याची सुविधा

आहे असे ६२ निवेदक म्हणतात तर २५ निवेदकांचे कच्च्या रस्त्याची सुविधा असे मत आहे. अशा पक्क्या व कच्च्या अशा एकूण ८७% रस्त्याची सुविधा उपलब्ध असल्याचे दिसून येते.

परंतू प्रत्येक ग्रामसभेला केवळ उपस्थित राहणे आणि गावाचा विकास होणे यांचा सहसंबंध **(Correlations) IBM SPSS Statistics Data Editor मध्ये लावला असता त्याची level (पातळी) ही *. Correlation is significant at the 0.05 level (2-tailed).** एवढी दर्शविली जात नसल्यामुळे ग्रामपंचायतीच्या ग्रामसभेमध्ये लोकसहभाग वाढल्यास गावाचा अधिक विकास होण्यास मदत होईल. हे गृहीतकृत्य सिध्द होत नाही.

**२) ग्रामस्थांनी ग्रामसभेमध्ये एकत्र येऊन आपल्या ग्रामपंचायतीतील समस्यांवर चर्चा करुन समस्या सोडविण्यासाठी पयत्न केल्यास गावाच्या समस्या कमी होऊ शकतात.**

**ग्रामपंचायतीतील समस्याविषययी, कायद्यांविषयी चर्चा/ जनजागृती व समस्या सोडविण्यासाठी केलेले पयत्न यांचा सहसंबंध**

**Correlations**

| | | public awareness related information given in the gramsabha | efforts of Malnutrition reduce |
|---|---|---|---|
| public awareness related information given in the gramsabha | Pearson Correlation | 1 | -.204* |
| | Sig. (2-tailed) | | .042 |
| | N | 100 | 100 |
| efforts of Malnutrition reduce | Pearson Correlation | -.204* | 1 |
| | Sig. (2-tailed) | .042 | |
| | N | 100 | 100 |

*. Correlation is significant at the 0.05 level (2-tailed).

वरील Correlations सारणीवरुन असे स्पष्ट होते की, अनुसूचित जमातीच्या विकासासाठीच्या संबंधित योजनांची व कायद्यांची माहिती ग्रामसभेमध्ये मिळते असे १०० निवेदकांपैकी ५४ निवेदकांनी सांगितले आहे. तर कुपोषणाचे प्रमाण कमी होण्यासाठी ग्रामपंचायतीने अंगणवाडीतील कर्मचाऱ्यांच्या बैठका घेतल्या असे १०० निवेदकांपैकी २४ निवेदकांना वाटते. व ग्रामपंचायतीतील सदस्यांनी अंगणवाडीला भेटी दिल्या असे १५ निवेदकांनी

सांगितले. व ५४ निवेदकांनी ग्रामसभेमध्ये पालकांना मुलांच्याकडे लक्ष देण्याबाबत जनजागृती केली असे सांगितले

ग्रामपंचायतीतील समस्याविषययी, कायद्यांविषयी चर्चा/ जनजागृती व समस्या सोडविण्यासाठी केलेले पयत्न यांचा सहसंबंध **(Correlations) IBM SPSS Statistics Data Editor मध्ये लावला असता** ***. Correlation is significant at the 0.05 level (2-tailed).** असल्यामुळे ग्रामस्थांनी ग्रामसभेमध्ये एकत्र येऊन आपल्या ग्रामपंचायतीतील समस्यांवर चर्चा करुन समस्या सोडविण्यासाठी पयत्न केल्यास गावाच्या समस्या कमी होऊ शकतात. हे गृहीतकृत्य सिध्द होते.

## ६.३ सूचना:-

- **ग्रामस्थांसाठी:-**
  १) ग्रामस्थांनी आपली जबाबदारी म्हणून प्रत्येक ग्रामसभेला उपस्थित राहीले पाहीजे.
  २) ग्रामस्थांनी ग्रामसभेला चर्चिलेल्या विषयावर चौकशी केली पाहीजे.
  ३) ग्रामस्थांनी आपल्या ग्रामपंचायतीचा विकास होण्यासाठी आपापल्या स्तरावरुन प्रयत्न केले पाहीजेत.
  ४) ग्रामस्थांनी एकोप्याने राहीले पाहीजे.
  ५) ग्रामपंचायतीमध्ये दारु बंदी घालण्यासाठी प्रयत्न केले पाहीजेत.
  ६) ग्रामस्थांनी कल्याणकारी योजनांची व पेसा कायदा, वनहक्क कायदा यांची माहीती करुन घेतली पाहीजे.
  ७) ग्रामस्थांनी नैसर्गिक संसाधनांचा वापर करुन सामुहिक स्वरुपाचा रोजगार उपलब्ध केला पाहिजे.

- **ग्रामसेवक आणि लोकप्रतिनिधींसाठी:-**
  १) जास्तीत जास्त ग्रामस्थ ग्रामसभेला उपस्थित राहतील असे प्रोत्साहन दिले पाहीजे.
  २) लोकांच्या वेळेनुसार ग्रामसभा घेतल्या पाहीजेत.

३) युवकांचे म्हणणे ग्रामसभेमध्ये ग्रामसेवक व लोकप्रतिनिधींनी एकून घेतले पाहीजे.

४) ग्रामसेवक व लोकप्रतिनिधींनी ग्रामपंचायतीच्या प्रत्येक पाडयावरती भेट दिली पाहीजे.

५) ग्रामपंचायतीला उपलब्ध झालेल्या निधींचे ग्रामसभेमध्ये वाचन केले पाहीले व कामाचे नियोजन करताना ग्रामस्थांना बरोबर घेऊन नियोजन केले पाहीजे.

६) नियोजित केलेल्या कामाचा पाठपुरावा करणे गरजेचे आहे.

७) ग्रामसेवक यांनी शासनाकडून आलेल्या योजनांची ग्रामस्थांना दिली पाहिजे.

- **शासन आणि प्रशासनासाठी:-**

१) अनुसूचीत क्षेत्रातील ग्रामस्थांच्या भूमिका व जबाबदाऱ्या यांची माहिती देण्याविषयीचे प्रशिक्षण प्रशासनाने ग्रामस्थांना दिले पाहीजे.

२) ज्या गावामध्ये आरोग्य उपकेंद्र आहेत अशा केंद्रावरती नर्स किंवा डॉक्टर २४ तास राहतील अशी सोय केली पाहीजे.

३) अनुसूचित क्षेत्रातील ग्रामस्थांकडे असणाऱ्या कौशल्यावर आधारित रोजगार उपलब्ध करुन देऊन तसेच त्यासाठी बाजारपेठ सुध्दा उपलब्ध करुन दिले पाहीजे.

४) गावात पिण्याच्या पाण्यासाठी नळ योजना राबविली पाहिजे.

५) प्रत्येक गावात एका  पेसा समन्वयक/ पेसा दूत कर्मचाऱ्याची नेमणूक केली पाहिजे.

**६.४. संशोधन विषयाचा सारांश:-** प्रस्तुत संशोधनाचा विषय हा अनुसूचित क्षेत्रातील नागरिकांना पंचायत क्षेत्र विस्तार कायदा १९९६ (पेसा) या कायद्याने दिलेले विशेष अधिकारांचा वापर करुन नागरिकांनी आपल्या ग्रामपंचायतीच्या हद्दितील सर्वंकष विकास करण्यासाठी कश्यापध्दतीने प्रयत्न केला आणि ते प्रयत्न करताना त्यांनी कोणत्या भूमिका व जबाबदाऱ्या पार पाडल्या याची मांडणी या संशोधन अभ्यासामध्ये केलेला आहे.

# परिशिष्टे

## अ) संदर्भ सूची

सदर संदर्भ सूची ही APA Format मध्ये असून ती खालीलप्रमाणे.


१. आगलावे, (डॉ.) प्रदिप. (२०००). संशोधन पध्दती. नागपूर: विद्या प्रकाशन.

२. आफळे, मुरलीधर (१९९८). आदिवासी संस्कृती: कला व कथा. औरंगाबाद: सिडको. केदार- एन ४/ सी-१९.

३. बरबळे, दत्तात्रय चं. (१९९९). स्थानिक स्वराज्य संस्थांमधील महिलांचा राजकीय सहभाग टिळक महाराष्ट विद्यापीठ. पुणे: एम.फील प्रबंध (अप्रकाशीत).

४. देवगांवकर, (डॉ) एस.जी (२०११). आदिवासी विकास प्रशासन. नागपूर: श्री साईनाथ प्रकाशन १ भगवाघर कॉम्प्लेक्स.

५. गारे, (डॉ.) गोविंद (२०१३). आदिवासी समस्या आणि बदलते संदर्भ. पुणे: सुगावा प्रकाशन चित्रशाळा इमारत. पुणे ४११०३०.

६. वरकड, तू. ता (२०००). आदिवासींच्या अस्तित्वाचे प्रश्न. नागपूर: रामदास पेठ. सेल्फ रिस्पेक्ट मूव्हमेंट ऑफ इंडिजीनस ईप्लॉइज २०३.

७. पानमंद, द.कृ. (उप.आयुक्त) योजनांची अंमजबजावणी स्थिती आणि आदिवासी जमातींचा विकास.महाराष्ट्र राज्य. आदिवासी विकास आयुक्तालय. नाशिक.

८. महाराष्ट्र शासन. आदिवासी विकास विभाग. (२०१५-१६). वार्षिक आदिवासी उपयोजना.

९. महाराष्ट्र शासन. आदिवासी विकास विभाग.(२०१२-१३).माहिती पुस्तिका.

१०. ग्रामविकास विभाग मंत्रालय. महाराष्ट शासन. मुंबई पंचायत क्षेत्र विस्तार कायदा.१९९६. (पेसा) प्रकाशक: पेसा कक्ष. राज्य ग्रामिण विकास संस्था. यशवंतराव चव्हाण विकास प्रकाशन प्रबोधीनी (यशदा). पुणे.

११. ग्रामपंचायत सदस्यांच्या पायाभूत प्रशिक्षण कार्यक्रमाची संदर्भ पुस्तिका (यशदा). ग्राम सेतू प्रकाशक: यशवंतराव चव्हाण विकास प्रकाशन प्रबोधीनी. यशदा राजभवन आवार. बाणेर रोड. पुणे. प्रकाशन. नोव्हेंबर.२०१४

१२. शासन निर्णय-क्र.व्हिआयपी- २०१२/प्र.क्र.३७/का.१६ दि.२३ जाने.२०१३.

१३. महाराष्ट्र शासन. आदिवासी विकास विभा. शासन निर्णय क्र.पेसा अ-२०१५/प्र.क्र.१६६/का.१७ दि.३० सप्टेबर २०१५.

१४. महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण भाग चार ब मार्च-४. २०१४

१५. ( social Research Association. EthicsGuidelines , 2003)

१६. www.socialresearchmethods.net/kb/ethics.php

# ब) मुलाखत अनुसूची

**टिळक महाराष्ट्र विद्यापीठ पुणे - ३७**

**समाजकार्य विभाग**

**विद्यानिष्णांत पदवी अभ्यासक्रम**

**द्वितीय वर्ष - २०१६-१७**

**संशोधन विषय:-** अनुसूचित क्षेत्रातील गट ग्रामपंचायतीच्या ग्रामस्थांचे ग्रामसभेतील योगदान विशेष क्षेत्र विक्रमगड तालुक्यातील आंबेघर तर्फे धरमपूर गट ग्रामपंचायत (जि.पालघर)

**संशोधकाचे नाव:- जानू जेठया पागी** **संशोधन मार्गदर्शक:- डॉ. देवानंद व्हि. शिंदे**

---

**वैयक्तीक व कौटुंबिक माहिती**

माहिती देणाऱ्याचे संपूर्ण नाव:-

१) लिंग :-

२) वय:-

३) पत्ता :-

४) वैवाहिक स्थिती :- अ) विवाहित ☐ ब) अविवाहित ☐

क) परितक्त्या ☐ ड) विधवा/ विधूर ☐

५) तुमचे शिक्षण झाले आहे का?

अ) होय ☐ ब) नाही ☐

६) होय, तर किती?

अ) अशिक्षित ☐ ब) प्राथमिक ☐

क) माध्यमिक ☐ ड) उच्च माध्यमिक ☐

इ) पदवी ☐ ई) पदव्यीत्तर ☐

७) तुमच्या कुटुंबात एकूण किती माणसे आहेत?

अ) तीन ☐ ब) चार ☐

क) पाच ☐ ड) सहा व त्यापेक्षा जास्त ☐

८) तुमचे कुटुंब दारिद्रयरेषेखालील आहे का?

अ) होय ☐ ब) नाही ☐

९) तुमचे उदरनिर्वाहाचे साधन कोणते?

अ) नोकरी ☐ ब) शेती ☐

क) मोल मजूरी ☐ ड) व्यवसाय ☐

१०) तुमच्या कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न किती आहे?

अ) २५००० पेक्षा कमी ☐ ब) २५००० पेक्षा जास्त ☐

क) ५०००० पेक्षा जास्त ☐ ड) १ लाख पेक्षा कमी ☐

इ) इतर ----------------------

**ग्रामसभेची कार्यपदधती**

११) ग्रामसभा म्हणजे काय?

-------------------------------------------------------------------------------------------

-------------------------------------------------------------------------------------------

१२) ग्रामसभा कशासाठी घेतल्या जातात?

अ) गावाच्या विकासासाठी ☐ ब) लोकप्रतिनिधींच्या फायद्यासाठी ☐

क) सांगता येत नाही ☐ ड) अधिकाऱ्यांच्या फायद्यासाठी ☐

१३) ग्रामसभा असल्यास त्याची माहिती तुम्हाला कश्यापदधतीने दिली जाते?

अ) पत्राने ☐ ब) दवंडी पेटवून ☐

क) वर्तमानपत्राने ☐ ड) वैयक्तीक माहिती देवून ☐

१४) ग्रामसभा असल्याचे तुम्हाला ग्रामसभेच्या अगोदर किती दिवस नोटीस दिली जाते?

अ) एक ☐ ब) सहा ☐

क) तीन ☐ ड) पाच ☐

१५) ग्रामसभा कोठे घेतल्या जातात?

अ) ग्रामपंचायत कार्यालय ☐ ब) गावाच्या मोकळया जागेत ☐

क) घरी ☐ ड) प्रत्येक पाडयावरती ☐

१६) ग्रामसभेची गणपूर्ती होण्यासाठी किती ग्रामस्थांनी सभेला हजर राहणे आवश्यक आहे?

अ) ५० ☐ ब) १०० ☐

क) १५० ☐ ड) ७५ ☐

इ) -----------

१७) ग्रामसभेला विषयसूची वाचून दाखविली जाते का?

अ) होय ☐ ब) नाही ☐

नाही, तर का नाही?

---------------------------------------------------------------------------------------

---------------------------------------------------------------------------------------

१८) होय, तर विषयसूची कोण वाचतो?

अ) ग्रामसभा अध्यक्ष ☐ ब) ग्रामसेवक ☐

क) सरपंच ☐ ड) ग्रामस्थ ☐

१९) ग्रामसभेचे अध्यक्ष कोण असतात?

अ) सरपंच ☐ ब) ग्रामसेवक ☐

क) ग्रामस्थ ☐ ड) विस्तार अधिकारी ☐

इ) सांगता येत नाही ☐

२०) पुढील ग्रामसभेच्या वेळी मागील बैठकीचा आढावा घेतला जातो का?

अ) होय ☐ ब) नाही ☐ इ) सांगता येत नाही ☐

२१) अनुसूचित जमातीच्या विकासासाठी संबंधित असणाऱ्या कल्याणाकारी योजनांची आणि नवीन आलेल्या कायद्यांची माहिती ग्रामसभेमध्ये दिली जाते का?

अ ) होय ☐ ब) नाही ☐

२२) ग्रामसभेमध्ये सर्वसाधरणपणे कोणते विषय चर्चिले जातात?

--------------------------------------------------------------------------------

--------------------------------------------------------------------------------

**ग्रामसभेतील ग्रामस्थांचे योगदान आणि विकास कामाचा आढावा**

२३) पेसा कायद्याविषयी तुम्हाला माहिती आहे का?

अ) होय ☐ ब) नाही ☐

२४) होय तर, मग पेसा कायदा म्हणजे काय?

--------------------------------------------------------------------------------

--------------------------------------------------------------------------------

२५) पेसा कायद्यातर्गंत तुम्हाला कोणते अधिकार देण्यात आले आहेत?

--------------------------------------------------------------------------------

--------------------------------------------------------------------------------

२६) पेसा कायद्यामुळे आदिवासी क्षेत्राचा विकास होण्यास मदत होईल.

अ) सहमत ☐ ब) पूर्णत: सहमत ☐

क) असहमत ☐ ड) पूर्णत: असहमत ☐

इ) सांगता येत नाही ☐

२७) वनहक्क कायदा तुम्हाला माहीती आहे का?

अ) होय ☐ ब) नाही ☐

होय तर काय?

--------------------------------------------------------------------------------

--------------------------------------------------------------------------------

२८) तुम्हाला घरकूल योजनेचा लाभ मिळला आहे का?

अ) होय ☐ ब) नाही ☐

२९) होय तर, तुम्हाला शासनाकडून किती निधी मिळाला?

अ) ५० हजार रुपये ☐ ब) ७५ हजार रुपये ☐

क) ९० हजार रुपये ☐ ड) १ लाख २० हजार रु. ☐

इ) -------------

नाही, तर का नाही?

-----------------------------------------------------------------------------------------

-----------------------------------------------------------------------------------------

३०) तुमच्या घरी शौचालय आहे का?

अ) होय ☐ ब) नाही ☐

नाही, तर का नाही?

-----------------------------------------------------------------------------------------

-----------------------------------------------------------------------------------------

३१) तुमच्या पाडयावरती पिण्याच्या पाण्याची कोणती सुविधा आहे?

अ) नळाचे ☐ ब) विहीर ☐

क) बोअरवेल ☐ ड) टँकरने ☐

३२) पिण्याच्या पाण्याच्या सुविधेविषयी आपले मत काय आहे?

-----------------------------------------------------------------------------------------

-----------------------------------------------------------------------------------------

३३) तुमच्या पाडयावरती शिक्षणाची सोय आहे का?

अ) होय ☐ ब) नाही ☐

३४) तुमच्या पाडयावरती कोणत्या इयत्तेपर्यंत शाळा आहे?

अ) १ ली ते ४ थी ☐ ब) १ ली ते ७ वी ☐

क) १ ली ते ८ वी ☐ ड) १ ली ते १० वी ☐

३५) तुमच्या ग्रामपंचायतीच्या हददीमध्ये आरोग्य केंद्राची सुविधा आहे का?

अ) होय ☐ ब) नाही ☐

३६) होय, तर त्यासाठी तुम्ही काय विशेष प्रयत्न केले?

------------------------------------------------------------------------------------------

------------------------------------------------------------------------------------------

३७) नाही, तर मग कुठे व किती अंतरावरील रुग्णालयात जाता?

------------------------------------------------------------------------------------------

------------------------------------------------------------------------------------------

३८) आरोग्य सुविधेविषयी आपले मत काय?

------------------------------------------------------------------------------------------

------------------------------------------------------------------------------------------

३९) तुमच्या पाडयामध्ये कुपोषित बालके आहेत का?

अ) होय ☐ ब) नाही ☐ क) सांगता येत नाही ☐

४०) होय, तर कुपोषणाचे प्रमाण कमी करण्यासाठी ग्रामपंचायतीने काय प्रयत्न केले?

------------------------------------------------------------------------------------------

------------------------------------------------------------------------------------------

४१) तुमच्या घरात वीजेची सोय आहे का?

अ) होय ☐ ब) नाही ☐

४२) विजेच्या सुविधेविषयी आपले मत काय?

.------------------------------------------------------------------------------------------

------------------------------------------------------------------------------------------

४३) तुमच्या पाडयावरती अंगणवाडीची सोय आहे का?

अ) होय ☐ ब) नाही ☐

४४) अंगणवाडीची पाहणी कोण करतात?

अ) ग्रामसेवक, सरपंच ☐ ब) विस्तार अधिकारी ☐

क) ग्रामस्थ ☐ ड) महिला बालकल्याणचे अधिकारी ☐ इ) सांगता येत नाही ☐

४५) अंगणवाडीची पाहणी कधी केली जाते?

---------------------------------------------------------------------------------------

---------------------------------------------------------------------------------------

४६) तुमच्या पाडयावरती कोणत्या प्रकारच्या रस्त्याची सोय आहे?

अ) पक्क्या ☐ ब) कच्च्या ☐

क) पायवाट ☐ ड) मातीचे ☐

४७) रस्ता तयार होण्यासाठी तुम्ही काय प्रयत्न केले?

---------------------------------------------------------------------------------------

---------------------------------------------------------------------------------------

४८) तुम्हाला ग्रामपंचायतीने रोजगार उपलब्ध करुन दिला आहे का?

अ) होय ☐ ब) नाही ☐

होय, तर कोणत्या ?

---------------------------------------------------------------------------------------

---------------------------------------------------------------------------------------

४९) गावात रोजगार उपलब्ध व्हावा यासाठी तुम्ही कोणते प्रयत्न केले?

अ) ग्रामसभेत मुददा मांडला ☐ ब) तहसिलदार यांच्याशी भेट ☐

क) लोकांना त्याबाबत माहिती दिली ☐ ड) काहीच नाही ☐

५०) तुम्ही ग्रामसभेला उपस्थित राहता का?

अ) होय ☐ ब) नाही ☐ क) कधी - कधी ☐

५१) नाही, तर का नाही?

---------------------------------------------------------------------------------------

---------------------------------------------------------------------------------------

५२) तुम्ही ग्रामसभेमध्ये तुमचा मुददा मांडता का?

अ) होय ☐ ब) नाही ☐

५३) तुमची ग्रामपंचायतीच्या कोणत्या समितीमध्ये निवड झाली आहे?

अ) ग्रामकोष समिती ☐ ब) शांतता/ तंटा मुक्ती समिती ☐

क) मादव द्रव्य नियंत्रण ☐ ड) नियोजन व व्यवस्थापन समिती ☐

इ) कर्ज नियंत्रण समिती ☐ ई) कोणत्याही नाही. ☐

५४) ग्रामसभेला जास्तीत जास्त ग्रामस्थांनी उपस्थित राहावे असे तुम्हाला वाटते का?

अ) होय ☐ ब) नाही ☐

५५) ग्रामसभेमध्ये झालेल्या चर्चेविषयी तुम्ही न आलेल्या ग्रामस्थांना माहिती देता का?

अ) होय ☐ ब) नाही ☐

५६) तुमच्या गावात शिक्षण समिती नेमली आहे का?

अ) होय ☐ ब) नाही ☐ क) सांगता येत नाही ☐

५७) तुम्ही कधी शाळेला भेट देता का?

अ) होय ☐ ब) नाही ☐

५८) तुम्हाला माहिती असलेल्या तुमच्या ग्रामपंचायतीमधील समित्यांची नावे सांगा?

---------------------------------------------------------------------------------------

---------------------------------------------------------------------------------------

५९) तुमच्या गावात / पाडयात भांडण, तंटे होतात का?

अ) होय ☐ ब) नाही ☐

६०) भांडण, तंटे झाल्यावर ते कशा पध्दतीने सोडविले जातात?

-----------------------------------------------------------------------------------------

-----------------------------------------------------------------------------------------

६१) तुमच्या गावात आमली पदार्थांचे उत्पादन केले जाते का?

अ) होय ☐ ब) नाही ☐

६२) आमली पदार्थांची निमिर्ती आणि सेवन करण्यावर बंदी घातली जावी का?

अ) होय ☐ ब) नाही ☐

६३) होय तर, त्यासाठी काय विशेष पयत्न केले किंवा करायला पाहिजे?

-----------------------------------------------------------------------------------------

-----------------------------------------------------------------------------------------

६४) गावात आठवडा बाजार भरण्यासाठी आपण काही विशेष प्रयत्न केले आहेत का?

अ) होय ☐ ब) नाही ☐

६५) तुम्ही आठवडा बाजार करण्यासाठी गावापासून किती अंतरावर जाता?

अ) गावातच ☐ ब) ५ कि.मी व त्यापेक्षा जास्त ☐

क) २ कि.मी व त्यापेक्षा जास्त ☐ ड) १० कि.मी व त्यापेक्षा जास्त ☐

इ) सांगता येत नाही ☐

६६) तुमच्या ग्रामपंचायतीचा विकास व्हावा असे तुम्हाला वाटते का?

अ) होय ☐ ब) नाही ☐

६७) तुमच्या मते गावाचा विकास होण्यासाठी काय करणे गरजेचे आहे?

-----------------------------------------------------------------------------------------

-----------------------------------------------------------------------------------------

६८) तुमच्या आसपासच्या परिसरात कोणकोणती संसाधने आहेत?

-----------------------------------------------------------------------------------------

-----------------------------------------------------------------------------------------

६९) तुम्ही निवडून दिलेल्या प्रतिनिधीच्या कामाविषयी तुम्ही समाधानी आहेत का?

अ) होय ☐ ब) नाही ☐

नाही तर का नाही?

---------------------------------------------------------------------------------------

---------------------------------------------------------------------------------------

## ग्रामपंचायतीकडे बघण्याचा दृष्टिकोन

७०) ग्रामसभेविषयी तुमचे मत काय?

---------------------------------------------------------------------------------------

---------------------------------------------------------------------------------------

७१) तुमच्या पाडयावरती ग्रामसभा होते का?

अ) होय ☐ ब) नाही ☐

७२) ग्रामसभेचा तुम्हाला फायदा होतो का?

अ) होय ☐ ब) नाही ☐

७३) ग्रामसभेमुळे तुम्हाला कोणता फायदा मिळला?

अ) घरकुल ☐ ब) रोजगार ☐

क) शेतीची अवजारे ☐ ड) इतर योजनाचा लाभ ☐

७४) ग्रामसभेमुळे गावाचा विकास होण्यास मदत झाली का?

अ) होय ☐ ब) नाही ☐

क) थोड्या प्रमाणात ☐

निवेदकाची सही / अंगठा संशोधक विद्यार्थ्यांची सही